# डॉन ब्रॅडमन



१९९०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. ९३९०
REFBK-0011015

रुपये

हिंदमाता प्रकाशन, मुंबई

2

क्रिकेटमधील आश्चर्य

# डॉन ब्रॅडमन

: लेखक :

शंकर लक्ष्मण चिटणीस

दा. क्र. 11015

REFBK-0011015

हिंदमाता प्रकाशन, मुंबई १२

मूल्य २ रुपये

प्रकाशक
शां. का. टांककर
२/६० पटेल टेरेस
मुंबई १२

* * *

सर्व हक्क स्वाधीन

* * *

मुद्रक
शां. का. टांककर
हिंदमाता प्रिं. प्रेस
मिस्त्रि बिल्डिंग,
मुंबई १२

# प्रास्ताविक चार शब्द

ज्यांच्या जीवनाबद्दल मला अत्यंत आकर्षक वाटतें अशा श्रेष्ठ व्यक्तीं-पैकीं प्रख्यात क्रिकेटपटु डॉन ब्रॅडमन हा आहे. सन १९३० पासून म्हणजे तो क्रिकेट क्षेत्रांत तळपत असल्यापासून मी त्याचें रोमांचकारी क्रिकेट जीवन वाचत आलो आहे आणि नभोवाणीवर ऐकत आलों आहे. दुर्दैवानें त्याला प्रत्यक्ष खेळतांना पाहण्याची संधि मिळाली नाहीं, पण डॉनच्या कर्तृत्वाची कल्पना मला प्रत्यक्ष त्याला न पाहतांहि येऊं शकली आहे.

अशा या थोर क्रिकेटपटूचें चरित्र मराठी वाचकांना सादर करावें अशी माझी कित्येक वर्षांपासून इच्छा होती व त्या दृष्टीनें त्यांच्याविषयीं जें जें मिळेल तें वाचण्याचा मला छंद लागला होता. डॉनविषयीं कोठें कांहीं आलें कीं मी तें अगत्यपूर्वक लिहून ठेवीत असे.

माझी अशी ठाम समजूत आहे कीं ज्यांच्या जीवनापासून तरुणांना आणि मुलांना खरोखरीच स्फूर्ति मिळूं शकेल, अशा लोकोत्तर व्यक्तींपैकीं डॉन ब्रॅडमन आहे. तो जन्मजात क्रिकेटपटू होता, पण बुद्धि, चिकाटी, एकाग्रता आणि त्याग यामुळें आपल्या ठिकाणच्या जन्मजात क्रिकेटला तो अत्यंत दिलखेंचक स्वरूपांत लोकप्रिय करूं शकला. डॉन ब्रॅडमन जर राजकारणांत पडला असता तर ऑस्ट्रेलियाचा पंतप्रधान झाला असता, हे नेव्हिल कार्डसचे उद्गार त्यादृष्टीनें अत्यंत मार्मिक आहेत. पण राजकारणांत न पडतां क्रिकेट हें त्यानें ध्येय आणि कला केली. "डॉन ब्रॅडमन क्रिकेट खेळत असे, क्रिकेट लिहीत असे, क्रिकेटबद्दल बोलत असे, क्रिकेटचा विचार करी आणि तो क्रिकेटच जगला." डॉन ब्रॅडमनप्रमाणें प्रत्येकानें क्रिकेटमध्येंच प्राविण्य संपादन केलें पाहिजे असें नव्हे. पण डॉन ब्रॅड-मननें ज्या तळमळीने, एकाग्रतेने आणि त्यागानें क्रिकेटमध्ये असाधारण प्राविण्य मिळविलें, तीच तळमळ, तीच एकाग्रता आणि तीच त्याग व्यक्त करून प्रत्ये-काला आपापल्या क्षेत्रांत यशस्वी होतां येईल. डॉन ब्रॅडमनच्या जीवनाचा हाच संदेश आहे.

डॉन ब्रडमनचें हें चरित्र लिहितांना मला अनेक पुस्तकांचा आणि लेखांचा उपयोग झाला. विशेषतः रॉय वेबरचें 'टेस्ट क्रिकेट,' आलथाम आणि स्वॅन्टन यांचे हिस्टरी ऑफ क्रिकेट, नेव्हल कार्डसचीं क्रिकेटवरील पुस्तकें व लेख, जॅक फिंगलटनची पुस्तकें व लेख, ए. जी. मॉईज याचे "ग्रेट ऑस्ट्रेलियन क्रिकेटीयर्स" व "डॉन ब्रॅडमन" विस्डेनची सन १९३० पासूनची वार्षिक प्रकाशनें, विशेषतः डॉन ब्रॅडमन यानें "फेअरवेल टू क्रिकेट" या शीर्षकाखालीं लिहिलेलें आत्मचरित्र यांचा मला उपयोग झाला आहे. डॉन ब्रॅडमनच्या आत्मचरित्राचा तर हे चरित्र लिहिताना मी सढळपणें उपयोग केला आहे.

या पुस्तकाचे सुंदर दुरंगी चित्र श्री. गावडे आर्टिस्ट यांनीं अगदीं थोड्या वेळात त्यांच्या नेहमींच्या आपुलकीनें काढून दिलें आहे. ज्यावेळीं डॉन ब्रॅडमननें वैयक्तिक धांवांचा उच्चांक केला, त्यावेळचें चित्र मुखपृष्ठाकरितां मी निवडलें आहे. डॉन ब्रॅडमन त्यावेळीं २२ वर्षांचा होता.

आणि पुस्तक प्रकाशनाची जबाबदारी घेतल्याबद्दल हिंदमाता प्रकाशनाचे चालक श्री. शांतारामबापू टांककर यांचे आभार मानणें हें खरोखरीच कृत्रिम औपचारिकपणाचें द्योतक ठरेल. डॉन ब्रॅडमनविषयींच्या पुस्तकाची मी त्यांना कल्पना देतांच त्यांनीं उत्साहानें पुस्तक प्रकाशित करण्याचें कबूल केलें. इतकेंच नव्हे तर मला हें चरित्र अधिक सविस्तरपणें लिहिण्यास सांगितलें.

हिंदमाता प्रेसमधील कामगार बंधूंनींहि हें पुस्तक शक्य तितक्या लौकर प्रसिद्ध झालें पाहिजे, या भावनेनें काम केलें आणि भारत व पाकिस्तान यांच्यामधील पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी पुस्तक प्रकाशित करणें शक्य केलें, याबद्दल त्यांचाहि आभारी आहे.

आपला नम्र,

३० नोव्हेंबर १९६० — **शंकर लक्ष्मण चिटणीस**



ही मुलगी नसून डॉन ब्रॅडमनचें बालपणींचें छायाचित्र आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ... ... ... ... ... वि: ...........
क्रमांक .... .................... नों: दि: ...........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११०१५

# डॉन ब्रॅडमन

## १ बौरालचा अजब मुलगा

सन १९४८ च्या ऑगष्ट महिन्यांतली गोष्ट. इंग्लंड व ऑस्ट्रेलिया यांच्यामधील पांचवा कसोटी सामना ओव्हलच्या सुप्रसिद्ध मैदानावर चालू होता. इंग्लडचा पहिला डाव लिंडवॉल याच्या अप्रतिम गोलंदाजीमुळें अवघ्या ५२ धांवांत आटोपला होता. ऑस्ट्रेलियन संघाच्या वतीनें ऑर्थर मॉरीस आणि सिड बॉर्नस यांनीं सुरुवात उत्तम करून पहिल्या विकेटवर ११७ धांवांची भर घातली होती. इतक्यांत होलीजच्या गोलंदाजीवर एम्सच्या हातांत झेल देऊन बॉर्नस परतला. डॉन ब्रॅडमन त्याच्या जागीं खेळण्याकरितां गेला. डानचा हा शेवटचा कसोटी सामना होता. या सामन्यानंतर तो क्रिकेटमधून निवृत्त होणार हें प्रेक्षकांना माहीत होतें. त्यामुळें तो खेळण्यास निघाल्यापासून तो विकेटपर्यंत जाऊन पोहोंचेपर्यंत टाळ्यांचा प्रचंड कडकडाट होत होता. याच मैदानावर सुप्रसिद्ध इंग्लिश खेळाडू जॅक हॉब्ज आपल्या जीवनांतील शेवटचा कसोटी सामना खेळण्यास निघाला होता, त्यावेळींहि असाच टाळ्यांचा कडकडाट झाला होता. डॉनला त्याची आठवण झाली. आपल्या वैभवशाली क्रिकेट जीवनावर यावेळीं शेवटचें शतक ठोकून कळस चढवावा, अशी डॉनची आकांक्षा होती. इंग्लिश संघांतील खेळाडूंनीं तो मैदानावर येऊन दाखल झाल्यावर टाळ्या वाजवून त्याला अभिवादन केलें. डॉननें हास्य मुद्रेनें त्यांच्या अभिवादनाचा

स्वीकार केला. तो खेळण्याच्या पावित्र्यांत उभा राहिला. होलीज गोलंदाजी करूं लागला. होलीजचा पहिला चेंडू त्यानें कसातरी टोलवला. होलीजचा दुसरा चेंडू सफाईदार गुगली होता. त्या चेंडूनें डॉनला साफ फसविलें व डॉनचा त्रिफळा उडविला. डॉननें आपल्या आत्मचरित्रांत या नाट्यपूर्ण प्रसंगाला उद्देशून लंडनमधील एका वृत्तपत्रांतील पुढील उतारा उधृत केला आहे:

" कालचा दिवस म्हणजे कसोटी सामन्यांतील नाट्याचा दिवस...

" जेव्हां...शेवटच्या कसोटी सामन्यांतील शेवटचा डाव खेळण्यास विकेटजवळ जाऊन पोहोंचला, तेव्हां विरुद्ध बाजूच्या खेळाडूंनीं त्याचें भव्य स्वागत केलें.

" ते त्याच्याभोंवती जमा झाले, आणि आपल्या कर्णधारानें सूचित केल्यावर त्यांनीं आपल्या टोप्या काढून त्याचा त्रिवार जयजयकार केला. प्रेक्षकांनीं गगनभेदी टाळ्यांचा कडकडाट केला. क्वचित्च कोणा क्रिकेटपटूला इतक्या टाळ्या मिळाल्या असतील.

" पण कसोटी सामन्यांतील सर्वांत भव्य अशा कारकिर्दीचा अशा रीतीनें शेवट व्हावा, हा विरोधाभास होय. तरीहि तो परत फिरला तेव्हां पुनः टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

" मात्र तो परत तंबूंत येत असतांना त्याच्या चेहेऱ्यावर खिन्नता पसरली होती. तो भारावून गेला होता. तंबूंत आल्यावर त्यानें हातांतले ग्लोव्ह काढून खालीं टाकलें आणि एखाद्या स्वप्नाळू माणसाप्रमाणें ते उचलण्यास हात खालीं केले.

" ओव्हलच्या मैदानावरील प्रेक्षकांची निराशा झाली होती. पण तरीहि त्यांनीं टाळ्या वाजवून आपल्या जुन्या मित्राला निरोप दिला. दरवाजा उघडला गेला, तो बाहेर पडला आणि कसोटी सामन्यांतून कायमचा अदृश्य झाला. "

कोणालाहि वाटावें कीं डॉन ब्रॅडमनच्या शेवटच्या कसोटी सामन्याला उद्देशून सदर वृत्तपत्रानें हें लिहिलें असावें! पण हा मजकूर जॅक हॉब्ज या दुसऱ्या महान् क्रिकेटपटुच्या निवृत्तीला उद्देशून होता. मात्र डॉनच्या क्रिकेट निवृत्तीला सुद्धां तो तितकाच लागू पडत होता. हॉब्जनें शेवटच्या कसोटी सामन्यांत निदान

नऊ धांवा केल्या होत्या, पण डॉन ब्रॅडमन तर शून्यावर बाद झाला होता. विशेष म्हणजे जिम लेकर हा खेळूं न शकल्यामुळें त्याच्या जागीं आयत्या वेळीं आलेल्या होलीजनें त्याची विकेट घेतली होती. डॉन ब्रॅडमनची कसोटी सामन्यांतील धांवांची सरासरी ९९.९ आहे. या शेवटच्या कसोटी सामन्यांत त्यानें फक्त चार धांवा केल्या असत्या तरी त्याची सरासरी धांवसंख्या शंभरवर गेली असती. पण एका रोमांचकारी क्रिकेटपटुच्या क्रिकेट जीवनाचा शेवट नाट्यमय व्हावयाचा होता.

डॉन ब्रॅडमन म्हणजे क्रिकेटमधील एक आश्चर्य समजलें जातें. नुकतेच दिवंगत झालेले ख्यातनाम क्रिकेटपटु श्री. दुलिपसिंह यांनीं ब्रॅडमनविषयीं आपल्या एका लेखांत म्हटलें आहे, " डॉ. डब्ल्यू. जी. ग्रेस, रणजितसिंह आणि व्हिक्टर ट्रंपर यांच्यानंतर जनतेचीं मनें खेंचणारा डॉन ब्रॅडमन हाच सर्वश्रेष्ठ क्रिकेटपटु झाला. ग्रेस शतकांमागून शतकें ठोकी, त्याऐवजीं ब्रॅडमन द्विशतकें आणि त्रिशतकेंहि ठोकूं लागला. त्यानें फलंदाजींतील सारे उच्चांक तोडले. एखाद्या प्रचंड कारखान्यांतून जसा माल बाहेर पडतो, त्याप्रमाणेंच त्याच्या बॅटींतून धांवा बाहेर पडत. त्याच्याइतक्या धांवा आणि त्याहि त्याच्याइतक्या वेगानें करणारा दुसरा फलंदाज झाला नाहीं."

नेव्हल कार्डस हा क्रिकेटवरील एक प्रख्यात अधिकारी तज्ज्ञ लिहितो; " चांगल्या हिरवळीवर डॉन ब्रॅडमन हा गोलंदाजांची अक्षरशः धूळधाण करी. आपल्या क्रिकेट जीवनांतील पहिल्या दर्जाच्या सामन्यांत त्यानें २८०६७ धांवा केल्या ( सरासरी ९५.१४ ). त्याकरितां त्याला ३३८ डाव खेळावे लागले. त्यांपैकीं निदान ११७ डावांत तरी त्यानें शतकें ठोकलीं असतील. त्यानें चार वेळां सामन्यांतील प्रत्येक डावांत शतक केलें असेल, आणि खुद्द कसोटी सामन्यांत त्यानें आठ वेळां २०० किंवा अधिक धांवा केल्या असतील."

पण ब्रॅडमनला क्रिकेटपटूंच्या मालिकेंत जें अद्वितीय स्थान लाभलें, तें मात्र सहजासहजीं नव्हे. दुलिपसिंह यांनीं म्हटल्याप्रमाणें त्याचा मार्ग खडतर होता. तो जगांतील ' धावांचें सर्वांत मोठें यंत्र बनला पण त्याकरितां त्याला असीम प्रयत्न करावे लागले. "

डॉनचा जन्म ता. २७ ऑगस्ट १९०८ रोजीं न्यु साऊथ वेल्समधील एका खेड्यांत झाला. डॉन पुढें "बौरालचा अजब मुलगा" म्हणून प्रसिद्धीस आला, त्या बौरालपासून हें खेडें नजिकच आहे. डॉन हा सर्वांत लहान मुलगा. त्याचा भाऊ व्हिक्टर हा त्याच्यापेक्षां चार वर्षांनीं मोठा असून आयसलेट, लिली आणि मे या तिघी बहिणी या दोघांहून मोठ्या आहेत. डॉन तीन वर्षांचा होण्यापूर्वी ब्रॅडमन कुटुंब बौराल येथें स्थायिक झालें. बौराल हें ऑस्ट्रेलियांतील एक अत्यंत रमणीय गांव आहे. समुद्रसपाटीपासून सव्वादोन हजार फूट उंच असलेल्या गांवी शहरवासीय–विशेषतः सिडने येथील लोक आठवड्याच्या शेवटीं सहलीकरितां जातात.

प्राथमिक शिक्षण पुरें झाल्यावर डॉन बौराल येथील माध्यमिक शाळेंत गेला. या शाळेंत सर्व शैक्षणिक सोयी असल्या तरी खेळांची मात्र सोय नव्हती. पण शाळेचे हेडमास्तर श्री. ए. जे. ली हे स्वतः चांगल्यापैकीं खेळाडू असल्यामुळें ते मुलांना खेळण्याच्या बाबतींत उत्तेजन देत. इतकेंच नव्हे तर ते स्वतः मुलांतून खेळत.

डॉनच्या घरीं किंवा आसपास त्याच्या वयाचे कोणी खेळगडी नसल्यामुळें त्याला स्वतःला एकट्यानें खेळावयाचे खेळ शोधून काढावे लागले. तो एकटाच फूटबॉल किंवा भींतीवर चेंडू आपटून टेनीस खेळे. पण त्याला क्रिकेटची विशेष आवड होती आणि क्रिकेट खेळण्याकरितां कोणी जोडीदार नसल्यामुळे त्यानें त्या बाबतींतहि नामी शक्कल काढली. गोल्फचा चेंडू तो भींतीवर आपटी आणि परत वेगान आलेला हा चेंडू स्टंपनें टोलवी. गोल्फचा लहान चेंडू स्टंपनें टोलविणें सोपें काम नसे. पण त्यामुळेंच त्याला चेंडू अचूक टोलविण्याची कला हस्तगत करतां आली. डॉनने चेंडू झेलण्याचाहि असाच एकट्यानें सराव केला.

डॉन आपला पहिला क्रिकेट सामना वयाच्या अकराव्या वर्षी खेळला. ज्या मैदानावर हा सामना झाला ते मैदान अत्यंत खडबडीत होतें. किंबहुना क्रिकेटला ते योग्य नव्हतेंच. पण पुढें याच मैदानाचें सुंदर क्रिकेट क्रीडांगणांत रूपांतर करण्यात येऊन त्याला 'ब्रॅडमन मैदान' असें नांव देण्यांत आलें. डॉनच्या संघानें टॉस जिंकून फलंदाजी घेतली. विरुद्ध बाजूच्या फलंदाजानें पहिल्या

व दुसऱ्या चेंडूवर लागोपाठ बळी घेतले, डॉन चौथा खेळावयास गेला. दोन खेळाडू लागोपाठ बाद झाल्यामुळें डॉनचे पाय लटपटत होते. त्याचीहि विकेट पडावयाचीच पण ती जेमतेम चुकली. डॉननें पहिला चेंडू आडवला कसा तो त्याचा त्यालाच माहीत. पण त्यानंतर मात्र त्यानें आत्मविश्वासानें खेळून नाबाद ५५ धांवा काढल्या.

या सामन्यानंतर दुसरा महत्वाचा सामना तो वयाच्या १२ व्या वर्षी खेळला. या सामन्यांत त्यानें आपल्या संघाच्या एकंदर १५६ धांवांपैकीं ११५ धांवा ( नाबाद ) काढल्या आणि अशा रीतीनें बाराव्या वर्षीच शतक झळकाविण्याचा मान मिळविला. त्याच्या या पराक्रमानेंच त्याच्या शाळेला विजय मिळाला. त्यानंतर दुसऱ्या महत्वाच्या शालेय सामन्यांतहि त्यानें उत्तम खेळून नाबाद ७२ धांवा काढल्या. अशा रीतीनें एकदांहि विकेट न देतां त्यानें तीन सामन्यांत २४४ धांवा केल्या.

वयाच्या तेराव्या वर्षी डॉनला प्रौढ लोकांच्या संघांतून खेळण्याची संधि मिळाली, पण तीहि योगायोगानेंच. डॉनचा चुलता बौराल संघाचा कर्णधार असून या संघाचा शेजारच्या गांवांतील संघाशीं सामना होणार होता. डॉनला या संघाबरोबर स्कोअरर म्हणून नेण्यांत आलें. पण आयत्या वेळीं या संघांतील एक खेळाडू आला नाहीं. तेव्हां डॉनचा संघांत समावेश करण्यांत आला.

बौराल संघांतील आठ खेळाडू बाद झाल्यावर डॉनला खेळण्याकरितां पाठविण्यांत आलें. डॉनची स्वारी अंगांत शर्ट आणि अर्धी पँट अशा थाटांत खेळावयास गेली. त्याच्या उंचीइतकीच त्याच्या हातांतली बॅट उंच होती. पण या लहान मुलानें मोठ्यांच्याविरुद्ध खेळून नाबाद ३७ धांवा केल्या. हा सामना पुढल्या शनिवारीं खेळला गेला, आणि पहिल्या डावांतील पराक्रमामुळें डॉनला दुसऱ्या डावांत आघाडीचा फलंदाज म्हणून पाठविण्यांत आलें व त्यानें पुनः नाबाद २९ धांवा केल्या.

डॉनला त्याच्या वडिलांकडून क्रिकेटचे धडे मिळाले नाहींत; पण ते स्वतः मात्र क्रिकेटचे मोठे शौकिन होते. सन १९२१ ची गोष्ट. सिडनेच्या सुप्रसिद्ध मैदानावर इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यामध्यें क्रिकेटचा पांचवा कसोटी सामना

होणार होता. डॉनच्या वडिलांनीं हा सामना पाहण्यास जावयाचें ठरविलें डॉननेंहि त्यांच्याबरोबर जाण्याचा हट्ट धरला.

क्रिकेटच्या इतिहासांतील संस्मरणीय सामन्यांपैकीं असा हा सामना होता. इंग्लंडच्या संघांत हॉब्ज, ऱ्होडस, हेन्ड्रेन, वुली, रसेल, फेन्डर, स्ट्रडविक यांसारखे नामांकित खेळाडू होते. ऑस्ट्रेलियाच्या संघांतहि कॉलिन्स, बार्डसली, मॅकार्टनी, टेलर, ग्रेगरी, आर्मस्ट्रॉंग, रायडर, मेली इत्यादि खेळाडू होते, त्यामुळें हा सामना चांगलाच रंगला. विशेषतः यापूर्वींचे चारहि कसोटी सामने ऑस्ट्रेलियानें जिंकले असल्यामुळें हा पांचवा सामनाहि ऑस्ट्रेलिया जिंकून एक नवीन उच्चांक प्रस्थापित करणार काय इकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें होतें व अखेर ऑस्ट्रेलियानें हा सामना नऊ विकेट्सनीं जिंकला व एकाच मालिकेंत पांचहि कसोटी सामने जिंकण्याचा विक्रम केला.

या सामन्यांतील ऑस्ट्रेलियाच्या वतीनें क्रिकेटचा गव्हर्नर जनरल म्हणून प्रसिद्ध असलेला मॅकार्टनी यानें संस्मरणीय खेळ खेळून १७० धांवा काढल्या. मॅकार्टनीचें सफाईदार लेग ग्लान्सीस डॉनला फार आवडले. पण मॅकार्टनीचा खेळ चांगला झाला असला तरी त्याच्यावर छाप पडली ती जॉनी टेलर या खेळाडूची. टेलर म्हणजे डॉनचा 'हिरो' होता. त्याचा जेव्हां हेंड्रेननें झेल घेतला, तेव्हां डॉनला फार वाईट वाटलें. याशिवाय या सामन्यांतील आर्मस्ट्रॉंगचा पहिल्याच चेंडूवर झेल, फ्रँक वुलीची चौफेर टोलेबाजी, टेड मॅकडोनल्डचा तालबद्ध खेळ आणि पर्कीनचा जॉनी टेलरनें घेतलेला अपूर्व झेल या गोष्टीहि डॉनच्या मनावर ठसल्या.

डॉनच्या वडिलांना तांतडीनें परत यावयाचें होतें. त्यामुळें डॉनला हा सामना शेवटपर्यंत पाहतां आला नाहीं. त्याची निराशा झाली. पण या वेळेपासून आपणहि कधींतरी कसोटी सामन्यांत खेळावयाचें असा त्यानें निर्धार केला. डॉन आपल्या वडिलांना म्हणाला, "मी या मैदानावर खेळेपर्यंत माझ्या मनाचें समाधान होणार नाहीं."

आणि उद्बोधक गोष्ट म्हणजे पुढें स्वतः डॉन हा कसोटी सामन्यांत खेळेपर्यंत सिडनेच्या मैदानावर गेला नाहीं कीं त्यानें तेथें पहिल्या दर्जाचा सामना पाहिला नाहीं. पण त्याकरितां आणखी सात वर्षें जावयाचीं होतीं.

●●●

# २ कसोटी सामन्याकरितां निवड

कोणी अशी कल्पना करूं नये कीं डॉन हा नुसता क्रिकेटमध्येंच रमलेला असे. तो एक असामान्य विद्यार्थी नसला तरी एक हुशार विद्यार्थी म्हणून गणला जाई. गणित हा त्याचा अत्यंत आवडता विषय होता. त्यानंतर त्याला शास्त्रीय विज्ञान हा विषय आवडत असे. तसेंच त्याला टेनिस, गोल्फ, पोहणें वगैरे खेळांचीहि आवड होती. धांवण्यांतहि तो पटाईत होता. त्यानें आपल्य वयाच्या मुलांकरिता ठेविलेल्या १०० यार्ड, २२० यार्ड व अर्धा मैल अशा तीनहि शर्यतींत पहिला नंबर पटकाविला होता. डॉन पुढे एक निष्णात चपळ क्षेत्ररक्षक म्हणून ओळखला जाई, त्याची पूर्वतयारी त्यानें या वयांतच केली होती.कीं काय कोण जाणे !

पण डॉनला इतर खेळ आवडत असले तरी तो क्रिकेटमध्येंच सर्वांत जास्त रमे, हें खरें.

सन १९२५ पासून डॉनला मोठमोठ्या सामन्यांतून खेळण्याचा मान मिळूं लागला. यावेळीं डॉनचें वय अवघें सतरा वर्षांचें होतें. ज्या बौराल संघांतून तो खेळे, त्या संघांतील इतर खेळाडू तिशीच्या पुढें होते.

त्या वर्षींच्या गाजलेल्या सामन्यांपैकीं एक सामना म्हणजे बौराल विरुद्ध विंगेलो हा सामना. याच सामन्यांत पुढें कसोटी सामन्यांत गाजलेला प्रख्यात ऑस्ट्रेलियन गोलंदाज बिल ओरेली याजबरोबर डॉनची गांठ पडली. ओरेलीला डॉननें यापूर्वी कधींच पाहिलें नव्हतें, पण त्याची कीर्ति मात्र ऐकली होती. गतवर्षी अंतिम सामन्यांत मॉस व्हेल या बलाढ्य संघास

ओरेलीनें आपल्या अपूर्व गोलंदाजीनें धूळधाण चारून आपल्या संघाला विजय मिळवून दिला होता. बौराल संघाचा ओरेलीच्या विंगलो संघाबरोबरचा सामना दोन शनिवारी एकदां बौराल संघाच्या आणि एकदां विंगेलो संघाच्या मैदानावर झाला. प्रथम बौराल संघाकडे फलंदाजी आली. जगांतील भावी अप्रतिम फलंदाजाची आणि भावी अप्रतिम गोलंदाजाची ही वर्चस्वाकरितां चुरसच होती. आणि ओरेलीच्या युक्त्या प्रयुक्त्यांना दाद न देतां डॉननें पहिल्या दिवशीं नाबाद २३४ धांवा केल्या. यापैकीं शेवटच्या पन्नास धांवांत सहाचे चार आणि चारांचे सहा फटके होते ! पण दुसऱ्या शनिवारीं मात्र ओरेलीनें डानवर मात केली. त्यानें पहिल्याच चेंडूवर डॉनचा त्रिफळा उडविला.

सन १९२५ चा अंतिम सामना मॉस व्हेल या संघाशी त्यांच्याच क्रीडांगणावर निर्णयात्मक खेळला जाणार होता. बौराल आणि मॉस व्हेल यांच्यामधील हा चुरशीचा सामना असल्यामुळें तो पाहण्यास प्रेक्षकांची खूप गर्दी होई.

बौराल संघाचा कर्णधार डॉनचा चुलता जॉर्ज व्हिटमन हा होता. त्यानें टॉस जिंकून डॉनला आघाडीचा फलंदाज म्हणून पाठविलें, आणि पहिल्या दिवशीं खेळ संपेपर्यंत डॉन ब्रॅडमन आणि ओ. प्रायर या जोडीनें एक बाद १३२ धांवा केल्या, त्यांपैकीं डॉनच्या नाबाद ८० धांवा होत्या. ( खेळाची वेळ दुपारीं २ ते ६ ही होती.)

दुसऱ्या शनिवारीं हा सामना पुढें चालू झाला व बौराल संघानें धांवांची संख्या आणखी एकहि विकेट न देतां ४७५ पर्यंत नेली. या वेळीं डॉनच्या जोडीला त्याचा चुलता जॉर्ज व्हिटमन हा होता. डॉनच्या नाबाद २७९ आणि व्हिटमनच्या नाबाद ११९ धांवा होत्या.

तिसऱ्या शनिवारीं ९ बाद ६७२ धांवा झाल्यावर बौराल संघाचा पहिला डाव पुरा झाल्याचें जाहीर करण्यांत आलें. या सामन्यांत डॉनचा वडील भाऊ व्हिक्टर हाहि होता, पण त्यानें फक्त एक धांव केली. हा त्याचा शेवटचाच सामना. त्यानें त्यानंतर क्रिकेट सोडून दिलें. डॉनच्या दृष्टीनें मात्र हा सामना संस्मरणीय झाला. सतरा वर्षांच्या या मुलानें या सामन्यांत तीनशें म्हणजे आपल्या संघापैकीं जवळजवळ निम्म्या धांवा केल्या. बाकीच्या धांवांत त्याच्या चुलत्याच्या

२२७ धांवा होत्या. या दोघांच्या विशेषतः डॉनच्या कर्तबगारीची कल्पना येण्या-साठीं पहिल्या डावांतील बौराल संघाच्या खेळाडूंनीं केलेल्या धांवांची संख्या खालीं देत आहे.

| | |
|---|---|
| डॉन ब्रॅडमन – झे. प्रिंग गो. रायडर | ३०० |
| ओ. प्रायर त्रि. टिकनेर | ५२ |
| जॉर्ज व्हिटमन त्रि. टिकनेर | २२७ |
| एस. क्युपिट धांवबाद | ४ |
| व्हिक्टर ब्रॅडमन त्रि. आईन्स्ली | १ |
| इ. वेने त्रि. टिकनेर | ३६ |
| जी. एस. वेनस्ली त्रि. टिकनेर | १ |
| ओ. नॉप त्रि. टिकनेर | ११ |
| एन. सिन्डेन झें. कौर्ली गो. सोडन | ५ |
| ए. स्टीफन्स नाबाद | ७ |
| इतर | २८ |
| एकूण ९ बाद = | ६७२ |

बौराल संघाच्या या दांडग्या धांवसंख्येची मॉस व्हेल संघाला बरोबरी करतां आली नाहीं. त्यांच्या दोन्ही डावांत अनुक्रमें १३४ व २०० धांवा झाल्या. बौराल संघाचा विजय झाला व डॉन ब्रॅडमन "वंडर बॉय ऑफ बौराल" म्हणून ओळखला जाऊं लागला. या सामन्यांत शतक ठोकलें तर त्याला एक बॅट बक्षीस देण्याचें त्याच्या आईने कबूल केलें होतें. डॉननें त्रिशतक ठोकून आईकडे तीन बॅटींची मागणी केली. पण आईनें त्याचा युक्तिवाद न मानून त्याला एकच बॅट बक्षीस दिली. योगायोगाची गोष्ट म्हणजे डॉननें यावेळीं विल्यम साईक्स लि. ची बॅट पसंत केली आणि हीच कंपनी पुढें त्याच्या सहीच्या बॅटी तयार करूं लागली.

सिडने येथें मॉस व्हेल संघाबरोबर पुढच्याच वर्षी बौराल संघाचा जो सामना झाला तोहि डॉनच्या दृष्टीनें उद्बोधक होता. मॉस व्हेल संघानें प्रथम फलंदाजी घेऊन ७३ धांवा केल्या. त्यानंतर बौराल संघानें फलंदाजी करून ४८० धांवा

केल्या. यांपैकीं एकट्या डॉनच्या ३२० धांवा असून, त्यांत सहाचे सहा, पांचाचा एक आणि चाराचे ४३ फटके होते!

या हंगामांत ॲलन किपॅक्स, आर्ची जॅकसन, चार्ली केलेवे या महान् क्रिकेटपटूंचा खेळहि डॉनला पाहावयास मिळाला. पण त्याबरोबरच त्याच्या प्रकृतिवरहि खूप ताण पडला. त्याला खेळण्याकरितां बौरालहून सिडनेला जावें लागे. सकाळीं सहाची गाडी पकडण्याकरितां त्याला पांच वाजतां उठावें लागे आणि सिडनेहून खेळ संपून त्याला रात्रीं नऊची गाडी मिळे आणि बौरालला पोहोंचण्यास मध्यरात्र होई. दर शनिवारीं अशा रीतीनें त्याला यातायात करावी लागे. ही यातायात टाळण्याकरितां तो पुढें सिडने येथें स्थायिक झाला.

सन १९२७–२८ चा क्रिकेटचा मोसम सुरू झाला. डॉननें पहिल्याच महत्त्वाच्या सामन्यांत आपल्या संघाच्या एकंदर २५८ धांवांपैकीं १३० (नाबाद) धांवा केल्या. विशेष म्हणजे या सामन्यांत त्याच्या विरुद्ध बाजूला जॅक ग्रेगरीसारखा विख्यात क्रिकेटपटू होता. त्याच्या या व इतर पराक्रमामुळें न्यु साऊथ वेल्स क्रिकेट असोसिएशनचें त्याला पत्र गेलें. या पत्रांत म्हटलें होतें. " राज्य निवड मंडळाचें तुझ्या गेल्या हंगामांतील खेळाकडे लक्ष होतें आणि तुझा हा खेळ लक्षांत घेऊन, तुझी चांचणी घेण्याचें ठरविलें आहे, तरी तूं सिडनेला ये. "

आणि सिडनेला डॉनच्या या चांचणीच्या वेळीं हजर तरी कोण होते? ' टरर ' म्हणून प्रसिद्ध असलेला टर्नर हा विख्यात गोलंदाज, हॅरी डोनान आणि योगायोगान रणजितसिंहहि ! या चांचणींत डॉन यशस्वी ठरला आणि दुसऱ्या दिवशीं शेफिल्ड शिल्ड सामन्याकरितां जो न्यु साऊथ वेल्सचा संघ निवडावयाचा होता, त्यासाठीं होणाऱ्या चांचणी सामन्यांत खेळण्यासाठीं त्याला नियुक्त करण्यांत आलें. इतकें होऊनहि क्विन्सलंडला शेफिल्ड सामन्याकरितां जाणाऱ्या न्यु साऊथ वेल्सच्या संघांत त्याचा समावेश करण्यांत आला नाहीं, कीं त्यानंतर द. ऑस्ट्रेलिया आणि व्हिक्टोरियाबरोबर खेळलेल्या संघातहि त्याला स्थान मिळालें नाहीं. पण पुढें जॅक ग्रेगरी आणि एच. एस. लव्ह हे दोन खेळाडू कांहीं ना कांहीं कारणानें या संघांतून गळले आणि डॉन ब्रॅडमन आणि दुसरा एक खेळाडू यांची संघांत निवड झाली. या वेळेपासून डॉन शेफिल्ड सामन्यांत जो खेळूं लागला तो कायमचाच.

न्यु साऊथ वेल्स संघाचा कर्णधार ॲलन किपॅक्स हा होता. व्हिक्टर ट्रंपर-नंतर अत्यंत आकर्षक शैलीचा खेळाडू म्हणून किपॅक्सची ख्याती होती. डॉन-शिवाय आर्ची जॅक्सन हा उमदा खेळाडूहि या संघांत होता.

या संघाचा पहिला सामना दक्षिण ऑस्ट्रेलिया संघाबरोबर झाला. विरुद्ध बाजूच्या संघांत प्रसिद्ध तुफानी गोलंदाज जॅक स्कॉट, पी. के. ली, विशेषतः अद्वितीय गुगली गोलंदाज क्लारी ग्रिमेट हे होते. ॲडेलेडच्या सुप्रसिद्ध मैदाना-वर हा सामना झाला, आणि डॉननें शेफिल्ड शिल्डच्या आपल्या या पहिल्याच सामन्यांत ग्रिमेटसारख्या जागतिक गोलंदाजाला तोंड देऊन ११८ धांवा काढल्या. अशा रीतीनें शेफिल्डच्या पहिल्याच सामन्यांत प्रथमच खेळून शतक त्यानें काढलें. ता. १७ डिसेंबर १९२७ चा हा दिवस डॉनच्या आयुष्यांतील संस्मरणीय होता. योगायोग म्हणजे याच दिवशीं "धांवांचें यंत्र" म्हणून प्रसिद्ध असलेल्या बिल पॉन्सफोर्डनें क्विन्सलँडविरुद्ध खेळतांना ४३७ धांवा करून शेफिल्ड सामन्यांतील धांवांचा उच्चांक केला. द. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या डावांतहि डॉन उत्तम खेळला. ग्रिमेटनें उत्तम गोलंदाजी टाकून ५७ धांवांत ८ खेळाडू बाद केले व सर्व न्यु सौथ वेल्स संघ १५० धांवांत कोसळला. पण त्यांतहि डॉनच्या ३३ धांवा होत्या. द. ऑस्ट्रेलियाच्या संघानें हा सामना फक्त एक विकेटनें जिंकला.

या वर्षीचा दुसरा शेफिल्ड सामना डॉन व्हिक्टोरिया विरुद्ध खेळला. डॉनच्या या वेळीं दोन्ही डावांत अनुक्रमें ३१ व ५ धांवा झाल्या. पण याच सामन्यांत त्याला व्हिक्टोरियाच्या वुडफूल आणि पॉन्सफोर्ड या सलामीच्या जोडीचा उत्तम खेळ जवळून पाहावयास मिळाला. पॉन्सफोर्डनें या वेळीं अनुक्रमें २०२ व ३८ व वुडफूलनें ९९ व नाबाद १९१ धांवा केल्या. व्हिक्टोरियाची हीच सलामीची जोडी पुढें कसोटी सामन्यांत ऑस्ट्रेलियाची सलामीची जोडी होती. पॉन्सफोर्डचा खेळ तडफदार असे, तर वुडफूल भिम्मा खेळे. डॉन त्यांच्या या खेळाला उद्देशून म्हणतो, "पहिल्या दर्जाच्या क्रिकेटपटूंचा खेळ पाहणें हें तरुण खेळाडूंच्या दृष्टीनें अजब शिक्षण होय, असें माझें प्रथमपासून मत आहे."

शेफिल्ड सामन्यापैकीं तिसरा सामना डॉन सिडनेच्या क्रीडांगणावर क्विन्सलँडविरुद्ध खेळला. हा सामना म्हणजे डॉनला एक निराळ्याच दृष्टीनें

शिक्षण होतें. ॲलन किपॅक्स व डॉन खेळत होते. किपॅक्सनें गौ या मंदगति गोलंदाजाचा एक चेंडू हळुवारपणें मिड ऑनला टोलवून एक धांव घेतली व डॉन खेळूं लागला. किपॅक्सप्रमाणें आपणहि फटका मारावा असें डॉनला वाटलें. पण चेंडू मंद गतीनें येऊन वळण्याऐवजीं सरळ स्टंपवर गेला आणि त्यानें मधली दांडी उडविली. डॉन म्हणतो, "त्या दिवसापासून चेंडू गोलंदाजाच्या हातून सुटण्यापूर्वी कसा खेळावयाचा हें अगोदर ठरविण्याचें मी सोडून दिलें. तरुण खेळाडूंनीं ही गोष्ट मुद्दाम लक्षांत ठेवावी." या सामन्यांतील किपॅक्स याचा खेळ बहारीचा झाला. त्यानें नाबाद ३१५ धांवा केल्या. डॉन म्हणतो, "या दिवशीं किपॅक्सची जी डौलदार फलंदाजी झाली, त्यापेक्षां ट्रंपर अधिक डौलदार खेळत असेल, याची मला कल्पनाच करवत नाहीं."

ऑस्ट्रेलियांतील शेफिल्ड सामने म्हणजे आपल्याकडील रणजी ट्रॉफी सामन्यांसारखे होत. डॉननें या सामन्यांतील अनेक उच्चांक खालीं आणले आहेत. उदाहरणार्थ सन १९२८–२९ या हंगामांतील त्याचा न्यु साऊथ वेल्सच्या वतीनें व्हिक्टोरियाविरुद्धचा खेळ. या वेळीं डॉननें नाबाद ३४० धांवा केल्या. यापैकीं उपहाराच्या वेळपर्यंतच त्यानें जवळजवळ २०० धांवा केल्या. या वेळीं डॉनचें वय अवघें २० वर्षांचें होतें. पहिल्या दर्जाच्या सामन्यांत त्रिशतक प्रथम ठोकणाऱ्या क्रिकेटपटूंत तोच सर्वांत लहान खेळाडू होता. डॉनपूर्वींची या बाबतींतील आंकडेवारी पुढीलप्रमाणें आहे.

१) व्हिक्टर ट्रंपरनें ससेक्सविरुद्ध ३०० धांवा केल्या तेव्हां त्याचें वय २१ होतें.

२) बिल पॉन्सफोर्डनें टास्मानियाविरुद्ध ४२९ धांवा केल्या, तेव्हां त्याचें वय २२ होतें.

३) क्लेम हिलनें साऊथ ऑस्ट्रेलियाविरुद्ध ३६५ धांवा केल्या, त्यावेळीं त्याचें वय २३ वर्षांचें होतें.

४) आर्ची मॅकलॅरीननें सॉमरसेटविरुद्ध ४२४ धांवा केल्या, तेव्हां त्याचें वय २३ होतें आणि

५) फ्रँक वुलीनें तास्मानियाविरुद्ध ३०५ धांवा केल्या तेव्हां तो २४ वर्षांचा होता.

डॉनचा शेफिल्ड सामन्यांतील यानंतरचा उल्लेखनीय पराक्रम म्हणजे सन १९३० मध्यें त्यानें ४५२ ( नाबाद ) धांवा करून पॉन्सफोर्डचा सन १९२७ चा ४३७ धांवांचा उच्चांक मोडला तो होय. डॉन या प्रसंगाला उद्देशून लिहितो, " प्रत्येक गोष्ट यावेळीं मला अनुकूल होती. विकेट छान होती, खेळ छान चालला होता, माझी प्रकृति छान होती, आणि प्रचंड धांवसंख्या करण्याच्या मनोवृत्तींत मी होतों. डॉननें ४१५ मिनिटांत या धांवा केल्या. हा उच्चांक केल्यावर एक मजेदार प्रसंग घडला. त्याच्याच कचेरींतील एका माणसानें धांवत जाऊन डॉनला खांद्यावर घेण्याचा प्रयत्न केला आणि या प्रयत्नांत दोघेहि खालीं आपटले !

डॉननें हा उच्चांक केल्यावर त्याला अनेक अभिनंदनपर संदेश आले. पण त्या सर्व संदेशांत, ज्याचा त्यानें उच्चांक मोडला, त्या पॉन्सफोर्डचा संदेश सर्वांत सुंदर व दिलदार होता. पॉन्सफोर्ड म्हणतो:

" उच्चांक हे मोडण्याकरितां करावयाचे असतात. प्रत्येक उच्चांक मोडला जातांना नवीन कसोटया निर्माण होऊन त्यामुळें खेळ सुधारण्यास मदत होते.

" उच्चांक मोडणारा डाव म्हणजे इतिहासांतील एक टप्पाच. प्रथम तुम्ही भोपळा फोडतां. त्यानंतर दोन आंकड्यांची धांवसंख्या करतां. पुढें अर्धशतक आणि त्यानंतर शतक ठोकतां. अशा वेळीं धांवफलक तुमचा मोठा शत्रु असतो.

" लोकांची अशी कल्पना असते कीं शतक पुरें झालें कीं चेंडूला फुटबॉलचा आकार येतो आणि धांवा आपोआप मिळतात. पण तें खरें नाहीं. प्रत्येक चेंडू सावधानपूर्वक खेळावा लागतो. जरा कुचराई केली कीं सदोष फटका बसून कदाचित् झेल जातो." डॉन शेफिल्ड शिल्ड सामन्यांत एकंदर नव्वद ९० डाव खेळला व त्यानें एकंदर ८९२६ धांवा ( सरासरी ११०.१९) केल्या. या सामन्यात त्यानें एकंदर ३६ शतकें, द्विशतकें आणि त्रिशतकें ठोकलीं.

सन १९२७ मध्यें शेफिल्ड सामन्यांत चांगलें खेळूनहि न्यूझीलंडला जाणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघांत डॉनचा समावेश करण्यांत आला नाहीं. त्याला या संघांत राखीव खेळाडू ठेवण्यांत आलें. हेतू हा कीं आयत्या वेळीं कोणी खेळाडू जाऊं न शकल्यास, डॉनला पाठवावें. पण तसें झालें नाहीं आणि डॉनची न्युझीलंडचा दौरा करण्याची मनिषा अतृप्त राहिली.

सन १९२८–२९मध्यें एम. सी. सी. किंवा इंग्लिश संघ कसोटी सामन्याकरितां ऑस्ट्रेलियांत गेला. इंग्लंडचा हा संघ प्रबळ असून त्यांत हॅमंड, हेंड्रेन, सटक्लिफ, हॉब्ज, जार्डाईन, लारवूड, टेट, व्हाईट, डकवर्थ, गिअरी आदिकरून खेळाडू असून चॅपमन हा या संघाचा कर्णधार होता. या प्रबळ संघाचा न्यु साऊथ वेल्सबरोबर जो सामना झाला, त्यांत डॉननें मॉरीस टेट, जॉर्ज गिअरी, जॅक व्हाईट याच्यासारखा विख्यात गोलंदाजांच्या गोलंदाजीला तोंड देऊन, ८७ व नाबाद १३२ धांवा केल्या. या सामन्यांनंतर अखिल ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यांत जो सामना झाला, त्यांतहि नाणावलेल्या गोलंदाजांना सतत तीन तास वीस मिनीटें त्यानें तोंड दिलें. या वेळीं डॉननें अवघ्या ५८ धांवा केल्या. डॉनच्या अत्यंत मंदगति खेळांपैकीं हा खेळ होता. पण त्या परिस्थितींत त्याच्या या खेळाचें महत्व होतें. दुसरें म्हणजे डॉनच्या वैयक्तिक शिक्षणाच्या दृष्टीनेंहि या खेळाला महत्व होतें. व्हाईटसारख्या फसव्या, अचूक डावखोऱ्या गोलंदाजाविरुद्ध तो या वेळीं प्रथमच खेळत होता. डॉनला आशा वाटूं लागली कीं आपल्याला इंग्लिश संघाविरुद्धच्या कसोटी सामन्याकरितां निवडण्यांत येईल. स्वतः डॉननेंच आपल्या त्यावेळच्या मनःस्थितीचें पुढील मजेदार वर्णन केलें आहे. तो म्हणतो:

" ज्या दिवशीं नभोवाणीवरून कसोटी सामन्यांतील ऑस्ट्रेलियन खेळाडूंचीं नांवें जाहीर होणार होतीं, तो दिवस उगवला. संध्याकाळ झाली. मी सिडने येथील निवासस्थानीं भोजन केलें आणि घरांतच राहवयाचें ठरविलें. ज्या वेळीं नांवें जाहीर करण्यांत येणार होतीं, त्या वेळीं नभोवाणीवरून सांगण्यांत आलें कीं संघ अद्याप निवडलेला नाहीं व पुनः थोड्या वेळानें जाहीर करण्यांत आलें कीं निवड समिती अद्यापहि नांवांचा विचार करीत आहे. मनावर ताण पडत

होता. अखेर मी घरमालकिणीला सांगितलें, मी आतां झोंपतों. मला संघांत घेण्यांत आलें तर माझें नांव सकाळच्या वर्तमानपत्रांत येईलच.

"मी बिछान्यावर पडलों. माझ्या डोळ्यांवर झोंप होती. अचानक शेजारच्या खोलींतील रेडिओंत जीव आला. मी एकदम उठून बसलों व ऐकूं लागलों.

"इंग्लंड विरुद्ध पहिल्या कसोटी सामन्याकरिता पुढील बारा खेळाडूंतून संघ निवडण्यांत येईल. आद्याक्षराप्रमाणें खेळाडूंचीं नांवें...... डी. जी. ब्रॅडमन......" डॉनची आकांक्षा फलद्रूप झाली होती.

●●●

# ३ अखेर तरुण खेळाडूंनीं मात केली !

इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यामधला हा पहिला कसोटी सामना ता. ३० नोव्हेंबर व १, ३, ४ व ५ डिसेंबर रोजीं ब्रिस्बेनच्या क्रीडांगणावर झाला. डॉनची ऑस्ट्रेलियाच्या वतीनें बारा खेळाडूंत निवड झाली होती. तरीहि पहिल्या अकरा खेळाडूंत आपली निवड होईल, अशी त्याला खात्री नव्हती. पण अखेर त्याची आकांक्षा पुरी झाली. डॉन ब्रिस्बेनच्या मैदानावर कसोटी सामन्यांतील खेळाडू म्हणून उतरला.

इंग्लंडच्या संघाचा कर्णधार चॅपमन हा असून ऑस्ट्रेलियाचा कर्णधार जॅक रायडर हा होता. चॅपमननें टॉस जिंकून फलंदाजी स्वीकारली व रायडरच्या नेतृत्वाखालीं ऑस्ट्रेलियन संघ क्षेत्ररक्षणासाठीं उतरला. डॉनचें वय या वेळीं वीस वर्षांचें होतें. तो उन्मादून गेला होता. इंग्लंडच्या दृष्टीनें हा सामना म्हणजे इतिहासच होता. हॉब्ज व सटक्लिफ ही सलामीची जोडी खेळूं लागली.

त्यांचा जम चांगलाच बसत होता, पण तेवढ्यांत सटक्लिफच्या ३८ धांवा झाल्या असतांना पॉन्सफोर्डनें ग्रेगरीच्या गोलंदाजीवर त्याचा अपूर्व झेल घेतला. आणि थोड्याच वेळांत हॉब्जच्या ४९ धांवा झाल्या असतांना डिप-मीड ऑफ-वर क्षेत्ररक्षण करीत असलेल्या डॉननें अत्यंत चपळाईनें विकेटवर अचूक चेंडू फेंकून त्याला रन-आऊट केलें. हॉब्ज हा चलाखीनें सफाईदार धांवा घेण्याबद्दल प्रसिद्ध होता. आपल्या क्रिकेट जीवनांत तो क्वचितच रन-आऊट झाला असेल, अशा स्थितींत त्याला रन-आऊट करण्यांत डॉननें मोठीच करामत केली होती. हॉब्ज, सटक्लिफ हे बाद झाल्यामुळें व पुढें हॅमंड आणि मिड हेहि लौकर बाद झाल्यामुळें इंग्लिश संघ कोसळणार असें वाटत होतें. पण त्यानंतर पॅट्सी हेन्ड्रेननें १६९ धांवा करून इंग्लंडची बाजू सांवरली. इंग्लंडच्या सर्व बाद ५२१ धांवा झाल्या. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत अवघ्या १२२ धांवा झाल्या. लारवूड व टेट या गोलंदाजांनीं ऑस्ट्रेलियाचा अक्षरशः खुर्दा केला. या १२२ धांवांत डॉनच्या १८ धांवा होत्या. डॉन पुढें शतकें, द्विशतकें आणि त्रिशतकें ठोकूं लागला. पण पहिल्याच कसोटी सामन्यांत पहिल्याच डावांत शतक झळकविण्याचें भाग्य त्याला लाभलें नाहीं.

इंग्लंडचा दुसरा डाव ८ बाद ३४२ धांवा झाल्यावर पुरा करण्यांत आल्याचें जाहीर करण्यांत आलें. त्यावेळीं ऑस्ट्रेलियांत सर्व कसोटी सामने निकालीं खेळले जात असल्यामुळें डाव पुरा झाल्याचें जाहीर करण्यांत चॅपमननें थोडें धाडसच केलें होतें. पण तें योग्यच ठरलें. पाऊस पडून विकेट खराब झाली होती. ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावांत अवघ्या ६६ धांवा झाल्या व इंग्लंडचा ६७५ धांवांनीं विजय झाला. दुसऱ्या डावांत डॉननें फक्त एक धांव केली होती. यावेळीं इंग्लंडच्या वतीनें व्हाईटची गोलंदाजी उत्तम पडली. त्यानें ६ ओव्हरींत अवघ्या ७ धांवा देऊन चार खेळाडू बाद केले.

या सामन्यांतील एक खेदजनक प्रकार म्हणजे जॅक ग्रेगरी आणि चार्ली केलवे या महान् क्रिकेट जीवनाचा अस्त. खेळ चालू असतांना केलेवेची प्रकृती बिघडली व त्याला कित्येक आठवडे बिछान्यावर पडून राहावें लागलें. पण तशा स्थितींतहि तो सामन्याचे वृत्त घरांत बसून एकें. ऑस्ट्रेलियाचा पराभव होत



डॉन ' फॉरवर्ड ड्राईव्ह'
मारण्याच्या पावित्र्यांत.



डॉननें वयाच्या सतराव्या वर्षी
पहिलें त्रिशतक ठोकलें.

असूनहि आपण कांहीं करूं शकत नाहीं, याचें त्याला वाईट वाटे. जॅक ग्रेगरीचा या सामन्यांत गुढगा दुखावला व त्यालाहि क्रिकेटमधून कायमचें निवृत्त व्हावें लागलें. डोळ्यांत आसवें आणून तो आपल्या सहकाऱ्यांना म्हणाला, " मित्रांनो, माझें क्रिकेट जीवन संपलें. हा माझा शेवटचा सामना. "

दुसरा कसोटी सामना सिडनेच्या मैदानावर ता. १४, १५, १७, १८, १९, २० डिसेंबर १९२८ रोजीं झाला.पहिल्या सामन्यांतील सणसणीत पराभवामुळें निवड समितीनें इतकी धास्ती घेतली होती कीं दुसऱ्या सामन्याकरितां जे बारा खेळाडू निवडण्यांत आले त्यांत उमद्या तरुणांपेक्षां वयस्क खेळाडूंचाच अधिक भरणा होता. जॅक रायडर ( वय ३९ वर्षें ), ग्रिमेट ( वय ३६ वर्षें ), ब्लॅकी ( वय ३३ वर्षें ), आयर्नमॉंगर ( वय ४१ वर्षें ) हे यापैकीं कांहीं खेळाडू होत. डॉन या बारा खेळाडूंत होता. पण खेळ सुरूं होण्यापूर्वीं कर्णधार जॅक रायडर यानें डॉनला सांगितलें, " तूं या सामन्याकरितां बारावा खेळाडू आहेस. " डॉनची खूप निराशा झाली. सन १९२१ मध्यें याच मैदानावर त्यानें इंग्लंड-ऑस्ट्रेलिया यांच्यामधील कसोटी सामना पाहिला होता व त्याच वेळीं आपण या मैदानावर खेळावयाचें असा त्यानें निर्धार केला होता. पण ती संधी यावेळीं आली नाहीं. दुसरी गोष्ट म्हणजे संघाच्या दर्जापर्यंत पोहोंचून वगळले जाण्याची डॉनची ही पहिलीच वेळ होती. वर्तमानपत्रांतहि डॉनला अकरा खेळाडूंत स्थान न मिळाल्यामुळें खूप टीका झाली. त्यावर्षीं शेफिल्ड सामन्यांत डॉननें ६०० धांवा ( सरासरी ८५ ) केल्या होत्या, तरीहि त्याला संघांत स्थान मिळूं नये आणि केवळ पहिल्या सामन्यांत त्याला यश मिळालें नाहीं, म्हणून त्याला वगळण्यांत यावें याची अनेकांना चीड आली.

या सामन्यांतील पहिल्या डावांत आस्ट्रेलियाच्या ५२३ धांवा झाल्या. पॉन्सफोर्डला लारवूडचा एक चेंडू लागल्यामुळें तो जखमी झाला व तो या सामन्यांत पुढें खेळूं शकला नाहीं. यामुळें या सामन्यांत डॉनला क्षेत्ररक्षण करावें लागलें, आणि डॉनला फलंदाजी करण्याइतकीच क्षेत्ररक्षण करण्याची मनापासून हौस असल्यामुळें त्याला आनंद झाला. इंग्लंडनें यावेळीं पहिल्या डावांत ६३६ धांवा केल्या. त्यापैकीं बॉल्टर हॅमंडच्या २५१ धांवा होत्या. हॅमंड हा शैलीदार

ऑफ ड्राईव्हजबद्दल प्रसिद्ध होता. डॉन म्हणतो, "हॅमंडचे बादशाही ऑफ-ड्राईव्हज जवळून पाहणें ही एक विलक्षण अनुभूति होती." ऑस्ट्रेलियाच्या वतीनें वुडफूलनें पहिल्या डावांत काढलेल्या ६८ व दुसऱ्या डावांतील १११ धांवा म्हणजे अप्रतिम चिकाटीच्या द्योतक होत्या. दुसऱ्या डावांत ऑस्ट्रेलियाच्या ३९७ धांवा झाल्या, इंग्लंडला फक्त सोळा धांवा पाहिजे होत्या. तेवढ्या धांवा इंग्लंडनें (दोन खेळाडू बाद) करून सामना आठ विकेटींनीं जिंकला.

तिसरा कसोटी सामना मेलबोर्न येथें ता. २९, ३१ डिसेंबर १९२८ व ता. १, २, ३, ४ व ५ जानेवारी १९२९ रोजीं झाला. जुने खेळाडू घेऊनहि उपयोग न झाल्यामुळें तिसऱ्या कसोटी सामन्याकरितां ऑस्ट्रेलियन संघांत कांहीं तरुण खेळाडू घेण्यांत आले व त्यांत डॉन ब्रॅडमन हाहि होता. या वेळेपासून मात्र डॉन पुढें, स्वतःची कांहीं वैयक्तिक कारणें सोडल्यास, ऑस्ट्रेलियन संघांत निवृत्त होईपर्यंत कायमचाच राहिला. डॉननें या सामन्यांत पहिल्या डावांत ७९ व दुसऱ्या डावांत ११२ धांवा केल्या. कसोटी सामन्यांतील हें पहिलेंच शतक जेव्हां डॉननें झळकविलें, तेव्हां त्याच्या बौराल गांवानें अक्षरशः आनंदोत्सव केला. सिडने येथील लोकहि आनंदानें बेहोष होऊन गेले.

हा सामनाहि अत्यंत चुरशीचा झाला. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ३९७ धांवा झाल्या. यांत डॉनच्या ७९ धांवाशिवाय किपॅक्सच्या १०० व जॅक रायडरच्या ११२ धांवा होत्या. इंग्लंडनें पहिल्या डावांत ऑस्ट्रेलियापेक्षां फक्त २० धांवा अधिक केल्या. त्यांत हॅमंडच्या २०० धांवा होत्या. दुसऱ्या डावांत ऑस्ट्रेलियानें ३५१ धांवा केल्या (वुडफूल १०७, डॉन ब्रॅडमन ११२). इंग्लंडला सामना जिंकण्याकरितां ३३२ धांवा पाहिजे होत्या. विकेट खराब झाली होती. या खराब विकेटवर इंग्लंड शंभर धांवासुद्धां करूं शकणार नाहीं, अशी ऑस्ट्रेलियाला खात्री होती. पण अशा विकेटवर हॉब्ज आणि सटक्लिफ यांनीं पहिल्या भागिदारींत १०५ धांवा करून आश्चर्यकारक फलंदाजीचा आविष्कार दाखविला. हॉब्जनें यावेळीं ४९ धांवा केल्या. पण सटक्लिफनें १३५ धांवा केल्या. डॉन म्हणतो, "हॉब्ज हा आपल्या कौशल्याबद्दल प्रसिद्ध होता. हॅमंडनें उत्कृष्ट फलंदाजी दाखविली, पण माझ्या दृष्टीनें त्यांच्यापैकीं कोणीहि त्या दिवशीं

सटक्लिफची बरोबरी करूं शकले नाहीं. त्याचें कौशल्य अजब होतें. " मात्र या सामन्यांत हॉब्जनें आपलें क्रिकेटविषयक ज्ञान किती खोल आहे, याची चुणूक दाखविली. खेळ चालू असतांनाच त्यानें पॅव्हलियनकडे खूण करून नवीन बॅट मागविली. पॅट हेन्ड्रेन दोन तीन बॅटी घेऊन धांवतच आला. हॉब्जनें नवीन बॅट निवडण्याची बतावणी केली, पण अखेरीस त्यानें जुनीच बॅट पसंत केली. पुढें असें समजलें कीं हॉब्जनें यावेळीं आपल्या कर्णधाराला असा निरोप पाठविला कीं उपहारापूर्वी पहिली विकेट पडली तर हॅमंड ऐवजीं तिसऱ्या क्रमांकाला जार्डीन यास पाठविण्यात यावें व हॅमंडला दुसऱ्या दिवसाकरितां राखून ठेवावें. अखेर हा रोमांचकारी सामना सातव्या दिवशीं इंग्लंडनें तीन विकेटींनीं जिंकला.

चौथा कसोटी सामना ॲडेलेड येथें ता. १, २, ४, ५, ६, ७ व ८ फेब्रुवारी १९२९ रोजीं झाला. सात दिवस चालेलल्या या सामन्याचें भवितव्यहि शेवट-पर्यंत हेलकावे खात होते इंग्लंडच्या या वेळीं पहिल्या डावांत ३३४ धांवा झाल्या. त्यांत हॉब्ज ७४, सटक्लिफ ६४ व हॅमंड ११९ अशा धांवा होत्या. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ३६९ धांवा झाल्या. त्यांत रायडरच्या ६३ व डॉनच्या ४० धांवा असल्या तरी ऑस्ट्रेलियाच्या वतीनें खरी कमाल केली ती आर्ची जॅकसन या १९ वर्षांच्या मुलानें. धांवफलकावर ऑस्ट्रेलियाच्या जेमतेम १९ धांवा झळकल्या होत्या, आणि वुडफूल, हेन्ड्री, किपॅक्स हे अतिरथी, महारथी बाद होऊन परतले होते. पण आर्ची जॅकसन अभिमन्यूप्रमाणें एक बाजू लढवित होता. उपहारानंतर डॉन ब्रॅडमन त्याचा जोडीदार म्हणून खेळूं लागला. जॅकसनच्या या वेळीं ९६ किंवा ९७ धांवा झाल्या होत्या. डॉन त्याच्या-पेक्षां एक वर्षानें वडील होता म्हणून वडीलकीचा आव आणून डॉननें त्याला सल्ला दिला, " घाई करूं नकोस. शतक जवळ आलेलें आहे. "

जॅकसननें मंद स्मित केलें आणि लारवूडच्या पुढच्याच चेंडूवर सणसणीत स्क्वेअर ड्राईव्ह मारून त्यानें शतक झळकविलें. डॉन ब्रॅडमन म्हणतो, " ज्यांनीं जॅकसनचा हा स्क्वेअर ड्राईव्ह पाहिला, त्या सर्वांचें एकमत झालें कीं इतका भव्य स्क्वेअर ड्राईव्ह पूर्वी कोणी मारला नसेल. " ऑस्ट्रेलियाच्या दुर्दैवानें पुढें चारच वर्षांनीं हा उमदा खेळाडू क्षयरोगाला बळी पडला.

या सामन्यांतील दुसऱ्या डावांत इंग्लंडच्या २८३ धांवा झाल्या. त्यांत हॅमंडच्या १७७ धांवा होत्या. अशा रीतीनें एकाच सामन्यांत दोन वेळां लागोपाठ शतकें ठोकून हॅमंडनें शेलक्या क्रिकेटपटूंत स्थान मिळविलें.

ऑस्ट्रेलियाला सामना जिंकण्याकरितां ३४९ धांवा पाहिजे होत्या. विकेट खराब झाली होती. पण वुडफूल आणि जॅकसन यांनीं चिकाटीनें खेळून पहिल्या विकेटीवर ६५ धांवा केल्या. पुढें दोन विकेटी अनुक्रमें ७१ व ७४ धांवावर पडल्या. पण किपॅक्स आणि रायडर यांनीं उत्तम प्रतिकार करून २११ धांवावर धांवसंख्या नेली. २२४ वर किपॅक्स बाद झाला, २५८ वर जॅक रायडरची विकेट गेली. विजयाची आशा मावळत चालली पण डॉन ब्रॅडमन आणि ब्लॅकेट यांनीं ३०० वर धांवसंख्या नेली. पुन्हां विजयाचें पारडें ऑस्ट्रेलियाच्या बाजूला कललें. तेवढ्यांत ३०८ वर आणखी एक विकेट गेली. ७ बाद ३०८ धांवा झाल्या. डॉन एका बाजूनें कडवा प्रतिकार करीत होता. ३२० वर आठवी विकेट गेली. डॉननें ओल्डफिल्डच्या मदतीनें ३३६ पर्यंत धांवसंख्या नेली, आतां फक्त तेरा धांवा पाहिजे होत्या पण तेवढ्यांत डॉन रन–आऊट झाला. शेवटची विकेटहि ३३६ वर पडली आणि ऑस्ट्रेलियाचा १२ धांवानीं पराजय झाला. यावेळीं डॉनला रन–आऊट झाल्याचें अतिशय दुःख झालें. आपल्या चुकीमुळें सामना हातचा गेला असें त्याला वाटलें. पण त्याउलट ब्लॅकी या दुसऱ्या खेळाडूनें मात्र या पराभवांतहि आपली विनोदी वृत्ति सोडली नाहीं. तो बाद होऊन परत आल्यावर एकानें त्याला विचारलें, " तूं चेंडूला फटका मारलास त्यावेळीं तुला काय वाटलें ? " ब्लॅकी म्हणाला, " सहाची ओव्हर बाऊंडरी गेल्यावर लोक टाळ्यांचा कसा कडकडाट करतील, याचा मी विचार करीत होतों ! "

इंग्लंडनें ॲशीस जिंकल्या होत्या; तरी मेलबोर्न येथील पांचव्या कसोटी सामन्याबद्दल लोकांत विलक्षण उत्साह होता. या सामन्याकरितां ऑस्ट्रेलियन संघांत डॉन ब्रॅडमन, आर्ची जॅकसन, फेअरफॅक्स, वॉल, हार्नाब्रूक वगैरे तरुण खेळाडू घेण्यांत आले होते. आणि गेल्या चार सामन्यांतील पराभवांची मालिका आपण थांबवूं अशी त्यांनीं उमेद बाळगली होती. हा सामना मेलबोर्न येथ

ता. ८, ९, ११, १२, १३, १४, १५ व १६ मार्च १९२९ रोजीं झाला. अशा रीतीनें तो सतत आठ दिवस चालला होता.

इंग्लंडच्या पहिल्या डावांत ५१९ धांवा झाल्या, त्यांत हॅम्ज व लिलॅंड यांनीं अनुक्रमें १४२ व १३७ धांवा केल्या. ऑस्ट्रेलियानें इंग्लंडला ४९१ धांवांनीं प्रत्युत्तर दिलें. त्यांत वुडफूलच्या १०२ व डॉन ब्रॅडमनच्या १२३ धांवा होत्या.

इंग्लंडच्या दुसऱ्या डावांत अवघ्या २५७ धांवा झाल्या. यावेळीं टिम वॉलनें अप्रतिम गोलंदाजी करून ६६ धांवांत पांच बळी घेतले.

सामना जिंकण्याकरितां ऑस्ट्रेलियाला २५६ धांवा पाहिजे होत्या, आणि पांच विकेटीवर २५७ धांवांची भर घालून ऑस्ट्रेलियानें हा सामना पांच विकेटींनीं जिंकला. पण सामना जिंकतांनाहि एक गंमतीदार प्रकार घडला. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार जॅक रायडर आणि डॉन ब्रॅडमन हे खेळत होते. डॉनची अशी इच्छा होती कीं या सामन्यांतील विजयी फटका मारण्याचा मान आपल्या कर्णधाराला मिळावा. सर्वजण त्याचीच वाट पाहत होते. पण अखेर चार इतर धांवांनीं सामना जिंकून दिला. जॅक रायडर यानंतर आंतरराष्ट्रीय सामन्यांतून निवृत्त झाला.

●●●

# ४ धांवांचा उच्चांक केला !

सन १९३० उजाडले. डॉनचा सन १९२८–२९ मधील पराक्रम आणि त्यानंतर सन १९२९–३० च्या क्रिकेट–हंगामांत त्यानें गाजविलेली बहादुरी यामुळें त्यावर्षी इंग्लंडला जाणाऱ्या संघांत डॉनचा समावेश होणार हें निश्चितच्य होतें. स्वतः डॉनला त्याबद्दल खात्री होती. शेफिल्ड शील्ड सामन्यांत तर त्यानें त्यावर्षी १५७, १२४, २२५, ४८, ६६, २, ८४, नाबाद ८९, २६, ३, नाबाद ४५२, ४७, ७७, २०, १३९ व २७ अशा धांवा होत्या. यापैकीं ४५२ धांवा म्हणजे पहिल्या दर्जाच्या सामन्यांतील जागतिक उच्चांक आहे. डॉनचा हा उच्चांक (पुढें भाऊसाहेब निंबाळकर व निंबाळकराचा उच्चांक महंमद हनीफ यानें मोडला.) त्याच्यापूर्वी पॉन्सफोर्डचा ४३७ धांवांचा उच्चांक होता. तो उच्चांक डॉननें यावेळीं मोडला. पण नमूद करण्याजोगी गोष्ट म्हणजे डॉननें धिम्मेपणानें खेळून हा नवा उच्चांक केला नाहीं. प्रथमपासून तो आक्रमक खेळत होता. खालील माहितीवरूनच त्याच्या या आक्रमक खेळाचें स्वरूप कळून येईल.

५४ मिनिटांत पहिल्या ५० धांवा
१०३ मिनिटांत शतक
१४० मिनिटांत १५०
१८५ मिनिटांत २००
२३० मिनिटांत २५०
२८८ मिनिटांत ३००
३३३ मिनिटांत ३५०
३७७ मिनिटांत ४००

४१४ मिनिटांत ४५०
४१५ मिनिटांत ४५२ ( नाबाद )

दुसऱ्या दिवशीं त्यानें उपहारापूर्वी १०५ धांवा आणि उपहार व चहाची वेळ यांच्या दरम्यान १४२ धांवा केल्या. पॉन्सफोर्डसारख्या झपाट्यानें धांवा करणाऱ्या क्रिकेटपटूने आपल्या ४३५ धांवांकरितां ६२१ मिनिटें घेतली होती, ही गोष्ट लक्षांत घेतां डॉननें ४१५ मिनिटांत ४५० धांवा केल्या याला विशेष महत्त्व आहे.

लौकरच इंग्लंडला जाणारा ऑस्ट्रेलियन संघ जाहीर झाला. या संघाचा कर्णधार वुडफूल असून संघांत डॉन ब्रॅडमनशिवाय पॉन्सफोर्ड, फेअरफॅक्स, किपॅक्स, स्टॅन मॅकेब, रिचर्डसन, ओल्डफिल्ड, ग्रिमेट, आर्ची जॅकसन आदिकरून खेळाडू होते. चार खेळाडू सोडून सर्व खेळाडू नवीनच होते. तुलनात्मकदृष्ट्या हा संघ नवोदित आणि अननुभवी खेळाडूंचा होता. डॉन म्हणतो, " तरुणांना साजेशा आशाआकांक्षा आणि शंका घेऊन आम्ही निघालों होतों. "

पुष्कळांची अशी कल्पना होती कीं ऑस्ट्रेलियांत डॉन जरी उच्चांकामागून उच्चांक करीत असला आणि मोडत असला तरी इंग्लंडच्या दमट हिरवळीवर तो यशस्वी ठरणार नाहीं. मॉरीस टेट या विख्यात इंग्लिश गोलंदाजानें त्याला सांगितलें, " हें पहा, डॉन,तुला जर इंग्लंडमध्यें खूप धांवा करावयाच्या असतील तर सरळ बॅटीनें खेळावयास शीक. " पर्सी फेन्डर या दुसऱ्या नामवंत खेळाडूनेंहि डॉन इंग्लंडमध्यें कितपत यशस्वी ठरेल याबद्दल शंका व्यक्त केली. दुसऱ्या एकदोघांनीं इषारा दिला, " डॉन, तुझे पुल-फटके धोक्याचे आहेत " ( आणि विशेष म्हणजे डॉनचा पुल हा आवडता फटका होता. )

पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे डॉन ब्रॅडमननें इंग्लंडचा हा दौरा गाजविला. त्यानें या दौऱ्यांत शतकें, द्विशतकें आणि त्रिशतकें ठोकलीं, एवढेंच नव्हे तर कसोटी सामन्यांतील वैयक्तिक धांवाचा उच्चांक केला. इंग्लंडकडे नामांकित फलंदाज होते, गोलंदाजी समर्थ होती. ऑस्ट्रेलियाला परत रिकाम्या हातांनीं परत पाठवून आपण " ॲशीस " आपल्याकडेच ठेवूं, अशी इंग्लंडला खात्री होती. सन १९२८-२९

च्या हंगामांत इंग्लंडने पांचपैकीं चार कसोटी सामन्यांत जय मिळविला होता. त्याच पराक्रमाची पुनरावृत्ति आपण करूं अशी इंग्लंडला आशा वाटत होती. पण क्रिकेटच्या क्षीतिजावर डॉन ब्रॅडमन हा नवीन तेजस्वी तारा उगवलेला आहे, हे इंग्लंड विसरलें. याच डॉननें इंग्लंडचे सर्व अंदाज धुळीला मिळविले. सन १९३० मध्यें तरी त्यानें ' तो आला, त्यानें पाहिलें, आणि त्यानें जिंकलें, ' अशी परिस्थिती करून टाकली. डॉनच्या फलंदाजीवरच सन १९३० च्या ऑस्ट्रेलियन संघाच्या यशाची इमारत उभारली गेली.

ऑस्ट्रेलियन संघाचा पहिला सामना वुर्सेस्टरविरुद्ध झाला. या पहिल्याच सामन्यांत डॉननें २३६ धांवा केल्या. आणि पुन्हा त्यानें लिसेस्टरशायर विरूद्ध नाबाद १८५ धांवा केल्या. इतकेंच नव्हे तर ज्या पर्सी फेंडरनें डॉन इंग्लंड-विरूद्ध कितपत यशस्वी होईल, अशी शंका प्रदर्शित केली होती, त्याच्याच सरे संघाविरूद्ध डॉननें नाबाद २५२ धांवा केल्या व लगेच हॅम्पशायर विरूद्धहि त्यानें १९१ धांवा ठोकल्या. त्यानें मे महिन्यांत १००० धांवा पुऱ्या करण्याचा कोणत्याहि खेळाडूनें यापूर्वी न केलेला दुर्मिळ पराक्रम केला.

पहिला कसोटी सामना ता. १३, १४, १६, १७ जून १९३० रोजीं नॉटिंगहॅम येथें झाला. सन १९२८-२९ मधील ऑस्ट्रेलियांत यश मिळविलेल्या इंग्लिश संघापैकीं आठ खेळाडू इंग्लंडच्या संघांत होते. ऑस्ट्रेलियन संघांत वुडफूल, पॉन्सफोर्ड, फेअरफॅक्स, डॉन ब्रॅडमन, किपॅक्स, मॅकेब, रिचर्डसन, ओल्डफिल्ड, ग्रिमेट, हार्निब्रूक व वॉल हे खेळाडू होते.

इंग्लंडनें टॉस जिंकून फलंदाजी पत्करली. पाऊस पडून विकेट खराब झाली होती. ग्रिमेटनें या परिस्थितीचा फायदा घेतला व इंग्लिश संघ अवघ्या २७० धांवांत गुंडाळला. हॉब्ज (७८), चॅपमन (५२), रॉबीन्स (नाबाद ५०) याखेरीज कोणीहि इंग्लिश खेळाडू टिकाव धरूं शकला नाहीं. ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव त्यापेक्षां कमी-म्हणजे १४४ धांवांवर कोसळला. खुद्द डॉनचीहि टेटनें आठ धांवावर विकेट घेतली. इंग्लंडच्या दुसऱ्या डावांत ३०२ धांवा झाल्या. हॉब्जनें पुनः हिंमतीचा खेळ खेळून ७४ धांवा केल्या. हॉब्जचें वय या वेळीं ४८ वर्षांचें होतें, ही गोष्ट लक्षांत घेतां त्याचा हा पराक्रम कौतुकास्पद

होता. ऑस्ट्रेलियानें आपल्या दुसऱ्या डावांत विजय मिळविण्याचा प्रयत्न केला. स्वतः डॉननें या वेळीं १३१ धांवा केल्या. त्याच्या तडफदार खेळामुळें सामन्याचा रंग पालटला होता. ऑस्ट्रेलिया तीन बाद १९८ धांवा होत्या. डॉन (८८) व मॅकेब (३३) हे खेळत होते. पण उपहारानंतर मॅकेब झेलबाद झाला. क्रिकेटच्या इतिहासांतील अपूर्व अशा झेलापैकीं या वेळचा झेल होता. मॅकेबनें टेटच्या गोलंदाजीवर सणसणीत 'पूल' ठोकला. पण कॉपले या क्षेत्ररक्षकानें अपूर्व चपळाई करून जमिनीपासून कांहीं इंचावर झेल घेतला आणि सामन्याला पुनः निराळें वळण लागलें. वेळ १९५ असून २०० धांवा करावयाच्या होत्या. पण आणखी अडतीस धांवा झाल्या आणि रॉबीन्सच्या एका फसव्या चेंडूवर डॉनची ऑफची दांडी उडाली. त्यानंतर बाकीचे ऑस्टेलियाचे खेळाडू भराभर कोसळले आणि ऑस्ट्रेलियाचा ९३ धांवांनीं पराभव झाला.

दुसरा कसोटी सामना ता. २७, २८, ३० जून व १ जुलै १९३० रोजीं सुप्रसिद्ध लॉर्डस मैदानावर झाला. लॉर्डस मैदान म्हणजे क्रिकेटपटूंची " काशी '.या सुप्रसिद्ध मैदानावर खेळण्याची आकांक्षा क्रिकेटपटू हे बाळगतातच. इंग्लंडनें या कसोटी सामन्यांकरितां जो संघ निवडला होता त्यांत सटक्लिफ, टिल्डस्ले आणि लारवूड यांऐवजीं दुलेपसिंह, व्हाईट आणि ॲलन हे आले होते. ऑस्ट्रेलियन संघांत मात्र कांहींच बदल करण्यांत आला नाहीं.

इंग्लंडनें टॉस जिंकून फलंदाजी पत्करली व पहिल्या डावांत ४२५ धांवा केल्या. यांत दुलिपसिंहाच्या १७३ धांवा होत्या. दुलिपसिंह हा एक अत्यंत आकर्षक खेळाडू होता. तो नेहमींच आकर्षक आणि तडफदार खेळे. पण लॉर्डस मैदानावरील त्याचा खेळ म्हणजे कळस होता. डॉन म्हणतो, " दुलिपसिंह प्रभुत्वानें खेळत होता. " ग्रिमेटसारख्या गोलदांजालाहि तो ज्या पद्धतीनें तोंड देत होता, ती पद्धत अवर्णनीय होती पण नवलाची गोष्ट म्हणजे १७३ धांवा झाल्यावर त्यानें आपण होऊन विकेट दिली. त्यानें असें कां केलें हें गूढच आहे.

ऑस्ट्रेलिया इंग्लंडइतकी मजल मारूं शकणार नाहीं असें वाटत होते. पण वुडफूल आणि पॉन्सफोर्ड यांनीं सुरुवात छान करून पहिल्या विकेटवर १६२

धांवा केल्या. पॉन्सफोर्ड ८१ धांवावर बाद झाल्यावर डॉन खेळावयास गेला. आणि खेळाला आणखी रंग चढला. त्यानें वुडफूलच्या मदतीनें धांवाची संख्या ३९३ वर नेली आणि वुडफूलचा ( १५५ ) रॉबीन्सनें बळी घेतला. त्यानंतर किपॅक्स आला आणि त्यानें धांवांची संख्या ३९३ वरून ५८५ वर नेली, किपॅक्सनें शैलीदार खेळून ८३ धांवा केल्या, तर डॉन ब्रॅडमननें आपली धांवसंख्या २५४ वर नेऊन भिडविली डॉन म्हणतो, " तांत्रिकदृष्ट्या माझा सर्वांत उत्कृष्ट असा हा डाव होता. " डॉननें प्रत्येक चेंडू सफाईदारपणें टोलविला. ऑस्ट्रेलियानें सहा बाद ७२९ धांवांवर आपला डाव पुरा झाल्याचें जाहीर केलें. इंग्लंडच्या दुसऱ्या डावांत ३७५ धांवा झाल्या व अखेर ऑस्ट्रेलियानें हा सामना ७ विकेटींनीं जिंकला.

या सामन्यांत ऑस्ट्रेलियानें दाखवून दिलें कीं आतां ' ब्रॅडमन ' युग सुरू झालें असून या युगांत सामना जिंकण्याकरितां ४२५ धांवा अपुऱ्या आहेत. आपल्या डावास सुरुवात केल्यापासून ऑस्टेलियन खेळाडू धांवा करण्याच्या आणि त्याहि वेगानें करण्याच्या मनःस्थितींत होते. पहिल्या तीन तासांत वुडफूल आणि पॉन्सफोर्ड यानीं १६२ धांवा केल्या, तर डॉन ब्रॅडमन आणि वुडफूल यांनीं अवघ्या पावणेतीन तासांत पुढच्या २४२ धांवा केल्या. त्यानंतर किपॅक्सच्या मदतीनें डॉननें तीन तासांत १९२ धांवा केल्या. खुद्द डॉननें आपल्या २५४ धांवांना अवघे साडेपांच तास घेतले, यावरून त्याच्या धांवा करण्याच्या वेगाची कल्पना येईल.

याच सामन्यांतील एक मजेदार प्रकार मुद्दाम नमूद करण्याजोगा आहे. पॉन्सफोर्डचा जम बसला होता व तो धांवसंख्या खूप वाढविणार, असें वाटत होतें. पण तेवढ्यांत इंग्लंडच्या राजाची स्वारी खेळ पाहण्यास आली, आणि खेळ थांबवून सर्व खेळाडूंची राजेसाहेबांशी ओळख करून देण्यांत आली. परिचय-विधि आटोपल्यावर खेळ पुनः सुरू झाला व पॉन्सफोर्ड बाद झाला. दुसऱ्या दिवशीं ब्रि टि श व र्त मा न प त्रां नीं शीर्षक दिलीं, " बादशहांच्या गोलंदाजीवर पॉन्सफोर्ड बाद ! " ' बादशहांची अपूर्व गोलंदाजी ! '

तिसरा कसोटी सामना म्हणजे डॉनच्या पराक्रमाचा कळस ! हा सामना

लीडस् येथील हेडींगली मैदानावर ता. ११, १२, १४ व १५ जुलै १९३० रोजीं झाला. इंग्लंडच्या संघांत, दुसऱ्या कसोटी सामन्यांत जखमी झाल्यामुळें खेळूं न शकलेला सटक्लिफ परत आला होता. शिवाय हॉब्ज, हॅमंड, दुलिपसिंह, लीलँड वगैरे खेळाडू होते. ऑस्ट्रेलियन संघांतील पॉन्सफोर्ड हा जखमी झाल्यामुळें आर्ची जॅकसनला त्याच्या बदली घेण्यांत आले. आर्ची जॅकसन हा एक अत्यंत उमदा खेळाडू होता त्याला पहिल्या दोन कसोटी सामन्यांत घेण्यांत आले नव्हते व त्याबद्दल डॉनला वाईट वाटले होते. डॉन त्याबद्दल त्याच्याजवळ बोललाहि होता आणि आर्चीनें खऱ्या क्रिकेट कलावंताप्रमाणेंच उत्तर दिलें होतें: "आपण सामना जिंकणें हें महत्वाचें आहे, माझा समावेश होणें हें महत्वाचें नाहीं." अशा या दिलदार खेळाडूचा समावेश झाल्यामुळें डॉन आनंदून गेला. आर्चीला मात्र या सामन्यात १९२८ चा पराक्रम करतां आला नाहीं.

ऑस्ट्रेलियानें टॉस जिंकला व वुडफूल आणि आर्ची जॅकसन यांनीं ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजीला सुरुवात केली पण ऑस्ट्रेलियाची पहिली विकेट ( आर्ची जॅकसन १ ) फक्त दोन धावावर पडली. डॉन मैदानावर उतरला, आणि प्रथमपासून त्यानें पूर्वी कोणीहि कधींहि पाहिला नसेल असा आक्रमक खेळ खेळून इंग्लिश गोलंदाजाचा घाम गाळला आणि इंग्लिश क्षेत्ररक्षकांना धांवतां धांवतां पुरेवाट केली. त्यानें वुडफूलच्या मदतीनें १५५ मिनिटांत १९२ धांवा केल्या. त्यांत वुडफूलच्या ४९ धांवा होत्या तर डॉनच्या १४३ धांवा होत्या. १९४ धांवा झाल्या असतांना ऑस्ट्रेलियाची दुसरी विकेट पडली ( वुडफूल ५० ) आणि किपॅक्स खेळावयास आला. डॉननें त्याच्या मदतीनें १६५ मिनिटांत आणखी २२९ धांवा करून धांवांचा आंकडा ४२३ वर नेला. यापैकीं किपॅक्सच्या ७७ धांवा होत्या, तर डॉनच्या १५२ धांवा होत्या. या वेळपावेतों डॉननें सन १९०३-०४ चा आर. इ. फॉस्टरचा वैयक्तिक २८७ धांवांचा उच्चांक मोडला होता! त्यानंतर त्यानें मॅकेब्रच्या मदतीनें धांवांची संख्या ४८६ पर्यंत नेली ( मॅकेब्र ३० ) व डॉननें ३०० ची मर्यादा ओलांडली. अशा रीतीनें डॉननें ता. ११ जुलै १९३० या संस्मरणीय दिवशीं स्वतःच्या वैयक्तिक धांवांचा उच्चांक केलाच. पण त्याशिवाय एकाच दिवसांत उपहारापर्यंत पहिलें शतक,

उपहारापासून चहाच्या वेळेपर्यंत दुसरें शतक आणि चहाच्या वेळेपासून खेळ संपेपर्यंत तिसरें शतक झळकविण्याचा पराक्रम केला.

डॉनला बाद करण्याकरितां इंग्लंडनें पंचवीस वेळां गोलंदाजींत बदल केले, पण डॉनला त्याची दाद नव्हती. टेटनेंच डॉनला इंग्लंडमध्यें यशस्वी होण्याकरितां 'खेळाचें तंत्र' बदल असा इषारा दिला होता. तो आठवून डकवर्थ या इंग्लिश यष्टिरक्षकानें टेटला खिजविलें, "अरे, तूं या आडव्या बॅटीनें खेळणाऱ्या पोऱ्याला ताबडतोब बाद करशील असें वाटलें होतें..." पण टेट कांहीं बोलला नाहीं. डॉननेंच आपल्या खेळानें परस्पर उत्तर दिलें होतें!

ता. १२ जुलै रोजीं जेव्हां डॉन खेळावयास निघाला, त्यावेळीं कोणीतरी वात्रटानें केलेली "युवर हौस इज ऑन फायर ॲन्ड युवर गर्ल वॉंटस यू!" ही तार त्याच्या हातांत ठेवण्यांत आली. ही तार खोडसाळपणाची होती. पण त्या मागोमाग दुसरीहि एक तार त्याला मिळाली. डॉनच्या वैयक्तिक पराक्रमावर खूष होऊन त्याला एक हजार पौंड देणगी दिल्याची ऑर्थर व्हाईट लॉ नांवाच्या व्यापाऱ्याची ती तार होती!

डॉन दुसऱ्या दिवशीं ३३४ धांवावर बाद झाला. ऑस्ट्रेलियन संघाच्या सर्व बाद ५६६ धांवा झाल्या. याचा अर्थ आपल्या संघाच्या एकंदर धांवांपैकीं जवळजवळ दोनतृतीयांश धांवा त्यानें केल्या होत्या!

इंग्लंडच्या पहिल्या डावांत ३९१ धांवा झाल्या. त्यापैकीं हॅमंडचें शतक होतें. इंग्लंडच्या दुसऱ्या डावांत तीन बाद ९१ धांवा झाल्या व सामना वेळेच्या अभावी अनिर्णित राहिला.

चौथा कसोटी सामना ता. २५, २६, २८ व २९ जुलै १९३० रोजीं होणार होता. पण पावसामुळें पहिलें दोन दिवस व तिसऱ्या दिवशीं फक्त ४५ मिनिटेंच खेळ होऊं शकला व सामना अनिर्णित राहिला.

एक सामना इंग्लंडनें जिंकला होता, एक ऑस्ट्रेलियानें जिंकला होता. दोन सामने अनिर्णित राहिले होते. त्यामुळें ओव्हल मैदानावरील पांचव्या कसोटी सामन्याबद्दल विलक्षण औत्सुक्य होतें. हा सामना ता. १६, १८, १९, २०, २१ व २२ ऑगस्ट १९३० रोजीं झाला. जॅक हॉब्जचा हा शेवटचा सामना

होता, त्या दृष्टीनें प्रत्येकाचें त्याच्याकडे लक्ष होतें. हॉब्जनें पहिल्या डावांत ४७ धांवा केल्या. पण इंग्लंडतर्फे कोणाची सर्वोत्कृष्ट फलंदाजी झाली असेल तर ती हर्बर्ट सटक्लिफ याची. डॉन म्हणतो, "सटक्लिफचा हा डाव अपूर्व होता. त्यानें आपल्या १६१ धांवांत एकदांहि झेल दिला नाहीं. इंग्लंडच्या पहिल्या डावांत ४०५ धांवा झाल्या."

ऑस्ट्रेलियानें आपल्या पहिल्या डावास छान सुरुवात केली. वुडफूल आणि पॉन्सफोर्ड यांनीं पहिल्या विकेटवर १५९ धांवांची भर घातली. पहिली विकेट पडल्यावर डॉन आला. दुसरी १९० वर पडली व किपॅक्स खेळण्यास आला. किपॅक्स २६३ धांवा झाल्या असतां बाद झाला व आर्ची जॅकसन आला. आणि मग डॉन व जॅकसन यांनीं चौफेर टोलेबाजी करून धांवांचा आंकडा २६३ वरून ५०६ वर नेला. आर्ची जॅकसन ७३ धांवा करून बाद झाला आणि ५७० धांवा झाल्या असतांना डॉनहि २३२ धांवांवर बाद झाला. पण यावेळपर्यंत डॉननें ऑस्ट्रेलियन संघाला विजयाच्या जवळ आणून सोडले होते. डॉन आपल्या क्रिकेट जीवनांत जे सामने जिंकून देणारे डाव खेळला होता, त्यापैकीं हा एक डाव होता. ऑस्ट्रेलिया सर्व बाद ६९५ धांवा झाल्या.

इंग्लंडनें दुसऱ्या डावास सुरुवात केली. हॉब्जनें आपल्या या शेवटच्या डावांत शतक ठोकावे, अशी इंग्लिश खेळाडूंचीच नव्हे तर आस्ट्रेलियन खेळाडूंचीहि इच्छा होती. तो खेळण्यास आल्यावर ऑस्ट्रेलियन खेळाडूंनीं टाळ्या वाजवून त्याचें अभिनंदन केले. पण शतकामागून शतकें ठोकणारा हॉब्ज आपल्या शेवटच्या डावांत अवघ्या ९ धांवावर बाद झाला. त्यानंतर सटक्लिफ, दुलिपसिंह आणि हॅमंड यांनीं चिकाटीनें खेळून सामना वाचविण्याचा प्रयत्न केला. पण उपयोग न होऊन सर्व संघ २०१ धांवांत बाद झाला व ऑस्ट्रेलियाचा एक डाव व ३९ धांवांनीं विजय झाला. ऑस्ट्रेलियन संघानें ॲशीस परत मिळविल्या.

हॉब्ज व सटक्लिफ ही इंग्लंडची गाजलेली सलामीची जोडी होती. हॉब्ज निवृत्त झाल्यामुळें ही जोडी फुटली. त्या दोघांनीं ऑस्ट्रेलियाविरुद्ध २९ डावांत आणि सर्व कसोटी सामन्यांत मिळून अडतीस वेळां प्रारंभ केला. ऑस्ट्रेलिया-

विरुद्ध त्यांनीं ११ वेळां आणि सर्व कसोटी सामन्यांत १५ वेळां पहिल्या विकेटवर शंभरवर धांवा नेल्या. सरासरी अनुक्रमें ८४ व ८७. कोणत्याहि देशाच्या सलामीच्या जोडीनें क्वचितच इतकी उल्लेखनीय कामगिरी केली असेल !

खुद्द डॉनची सन १९३० मधील कामगिरी अभिमानास्पद होती. ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजीचा तोच मुख्य आधारस्तंभ आणि शिल्पकार होता. या दौऱ्यांत त्यानें वैयक्तिक धांवांचा उच्चांक केलाच, पण त्याशिवाय पांचहि कसोटी सामन्यांत ९७४ धांवा करून एक नवा उच्चांक केला. याशिवाय इंग्लंडच्या या दौऱ्यांत २९६० धांवा करून तिसरा उच्चांक केला. कसोटी सामन्यांतील डॉनची सरासरी १३९.१४ होती. तर इंग्लिश संघांतील सर्वांत जास्त सरासरी सटक्लिफ याची ८७.२० होती. डॉनच्या फलंदाजींतील यशाची यावरून कल्पना येते.

ऑस्ट्रेलियांतील पहिल्या दर्जाच्या क्रिकेटचा हंगाम संपल्यावर डॉननें ॲलन किपॅक्सच्या संघांतून उत्तर विभागांत दौरा केला. या दौऱ्याच्या आरंभीच त्यानें ६४५ धांवा करून ३३ विकेटी घेतल्या. पण एका सामन्यांत धांवतांना त्याचा घोटा दुखविला गेला व त्याला अठरा दिवस इस्पितळांत राहावें लागलें.

याच दौऱ्यांतील स्टॅन मॅकेबचा एक पराक्रम उल्लेखनीय आहे. त्यानें एका सामन्यांत १७३ धांवा केल्या, आणि त्यांत १८ षट्काचे फटके होते !

सन १९३० च्या सप्टेंबर महिन्यांत ऑस्ट्रेलियन संघ परत आला. ॲशीस जिंकून परत आलेला संघ म्हणून संघाचें व विशेषतः या विजयाचा मुख्य शिल्पकार म्हणून डॉन ब्रॅडमन याचें यावेळीं ऑस्ट्रेलियांत भव्य स्वागत झालें. हें स्वागत ऑस्ट्रेलियन पंतप्रधानांच्या तोडीचें आणि नामांकित सिनेमा-नटनटींच्या लोकप्रियतेलाहि लाजविणारें होतें. विशेषतः तरुणांत डॉन फारच लोकप्रिय झाला होता.

संघ ॲडेलेड येथें मैदान दाखल झाल्यावर वैमानिक शॉर्टीज यानें आपल्या “सदर्न क्लॉऊड” या विमानांतून डॉनला मेलबोर्न येथें नेलें. त्यावेळीं विमानाचा प्रवास इतका रुळलेला नव्हता. तरीहि डॉननें शॉर्टीजबरोबर विमानानें जावयाचें धाडस केलें. प्रतिकूल हवेला तोंड देऊन शॉर्टीजनें डॉनला मेलबोर्न येथें

सुरक्षित पोहोंचविलें. दुर्दैवानें हा वैमानिक पुढें सिडनेहून मेलबोर्नला विमान घेऊन निघाला आणि तो, त्याचें विमान आणि आंतील सर्वच प्रवासी नाहिंसे झाले. त्यापैकीं कोणाचाच पत्ता लागला नाहीं व त्यांचें पुढें काय झालें हें गूढ अद्यापपर्यंत उकललेलें नाहीं. स्वतः डॉनने मात्र या शूर वैमानिकाबरोबर काढून घेतलेला आपला फोटो आठवण म्हणून मोठ्या काळजीपूर्वक जतन करून ठेविला आहे.

मेलबोर्न येथें अपूर्व स्वागताचा स्वीकार करून डॉन सिडने येथें परतला. पण त्याला विश्रांती अशी फारशी मिळालीच नाहीं. शेफिल्ड शील्ड सामने सुरू झाले होते डॉन त्यावर्षी शेफिल्ड शील्ड सामन्यांत सहा डाव खेळला व त्यांत त्यानें अनुक्रमें ६१, १२१, २५८, २, ३३, २२० अशा धांवा केल्या. यापैकीं दक्षिण ऑस्ट्रेलिया विरुद्ध त्यानें केलेल्या २५८ धांवा बहारीनें खेळून २८५ मिनिटांत केल्या होत्या, व्हिक्टोरिया विरुद्धच्या २२० धांवा करतांना त्यानें अभूतपूर्व टोलेबाजी केली होती. एकदां तर त्यानें वेन्डेल बिल याच्या जोडीनें १३५ मिनिटांत २३४ धांवांची भर घातली होती.

सन १९३०-३१ मध्यें वेस्ट इंडिजचा संघ ऑस्ट्रेलियांत गेला. डॉन इंग्लंडहून दोनच महिन्यापूर्वी परत आल्यामुळें व त्यांतच शेफिल्ड सामन्यांचा ताण पडलेला असल्यामुळें त्याला खूप शीण आला होता. जी गोष्ट डॉनची, तीच जवळ जवळ सर्व ऑस्ट्रेलियन संघाची होती. वेस्ट इंडिजच्या संघांत जॉर्ज हेडली, लिअरी कॉन्स्टन्टाईन यांच्यासारखे खेळाडू असले तरी एकंदरींत वेस्ट इंडिजच्या मानानें ऑस्ट्रेलियाचा संघ फारच प्रबळ होता, त्यामुळें ऑस्ट्रेलियाला वेस्ट इंडिजचा पराभव करणें जड गेले नाहीं.

पहिला कसोटी सामना ता. १२, १३, १५, १६ डिसेंबर १९३० रोजीं ॲडेलेड येथें झाला. या सामन्यांत वेस्ट इंडिजच्या दोन्ही डावांत मिळून २९६ व २४९ धांवा झाल्या.

ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ३७६ धांवा झाल्या. डॉन ब्रॅडमन, पॉन्सफोर्ड व आर्ची जॅकसन यांच्या विकेटी पडून अवघ्या ६४ धांवा झाल्या होत्या. पण त्यानंतर किपॅक्स (१४६) व स्टॅन मॅकेब यांनीं आकर्षक खेळून

चौथ्या विकेटीवर १८४ धांवांची भर घातली. ऑस्ट्रेलियाची धांवसंख्या ३७६ झाली. दुसऱ्या डावांत पॉन्सफोर्ड (नाबाद ९०) व आर्ची जॅक्सन (नाबाद ७०) यांनीं आवश्यक तेवढ्या १७२ धांवा करून ऑस्ट्रेलियाला दहा विकेटींनीं सामना जिंकून दिला.

दुसरा कसोटी सामना सिडने येथें ता. १, २, ३ व ५ जानेवारी १९३१ रोजीं झाला. ऑस्ट्रेलियानें टॉस जिंकून ३६९ धांवा केल्या. त्यांत पॉन्सफोर्डच्या १८९ धांवा होत्या. पण डॉन फक्त २५ धांवावर बाद झाला. वेस्ट इंडिजच्या दोन्ही डावांत अनुक्रमें १०७ व ९० धांवा होऊन ऑस्ट्रेलियानें हाहि सामना एक डाव आणि १७२ धांवांनीं जिंकला.


तिसरा कसोटी सामना ब्रिस्बेन येथें ता. १६, १७, १९ व २० जानेवारी १९३१ रोजीं झाला. ऑस्ट्रेलियानें टॉस जिंकून ५५८ धांवा केल्या. पण त्यानें पॉन्सफोर्ड (१०९) व किपॅक्स (८४) यांच्या मदतीनें दुसऱ्या व तिसऱ्या विकेटीवर अनुक्रमें २२९ व १९३ धांवांची भर घातली. वेस्ट इंडिजच्या दोन्ही डावांत १९३ व १४८ धांवा होऊन ऑस्ट्रेलियाचा एक डाव २१७ धांवांनीं विजय झाला.

चौथा कसोटी सामना मेलबोर्न येथें झाला. हा कसोटी सामना ता. १३ व १४ फेब्रुवारी १९३१ असे फक्त दोन दिवस चालला. वेस्ट इंडिजनें टॉस जिंकून फलंदाजी पत्करली. पण अवघ्या ९९ धांवांत वेस्ट इंडिज संघ कोसळला. त्यानंतर ऑस्ट्रेलियानें आठ बाद ३२८ धांवांवर आपला पहिला डाव पुरा झाल्याचें जाहीर केलें. त्यांत डॉनच्या १५२ धांवा होत्या. वेस्ट इंडिजच्या दुसऱ्या डावांत १०७ धांवा झाल्या व पुनः एक डाव व १२२ धांवांनीं वेस्ट इंडिजचा पराभव झाला.

पांचवा कसोटी ता. २७ व २८ फेब्रुवारी व २, ३ व ४ मार्च १९३१ रोजीं सिडने येथें झाला. क्रिकेटमध्यें " अद्भुत अनिश्चितता " कशी असते, याचा यावेळीं अनुभव आला व बलाढ्य आस्ट्रेलियाचा पराभव व तोहि दुबळ्या वेस्ट इंडिज संघानें केला.



विजयी कर्णधार डॉन
ब्रॅडमन



प्रत्येक चेंडू तडकावला पाहिजे
हें डॉनचें सूत्र होतें.

वेस्ट इंडिजनें टॉस जिंकून फलंदाजी पत्करली व पहिल्या डावांत ३५० धांवा केल्या. त्यानंतर पाऊस पडून विकेट फिरकी गोलंदाजांना अनुकूल झाली व ऑस्ट्रेलियन संघ २२४ धांवांत बाद झाला. वेस्ट इंडिजनें खराब विकेटचा फायदा घेण्यासाठीं पांच बाद १२४ धांवांवर आपला दुसरा डाव पुरा झाल्याचें जाहीर केलें. ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावांत २२० धांवा होऊन वेस्ट इंडिजचा ९६ धांवांनीं विजय झाला. डॉनच्या बाबतींत उल्लेखनीय गोष्ट म्हणजे तो दुसऱ्या डावांत आणि कसोटी सामन्यांत प्रथमच शून्यावर बाद झाला.

वेस्ट इंडिजच्या संघापैकीं जॉर्ज हेडली व लिअरी कॉन्स्टन्टाईन या दोन निग्रो खेळाडूंचीच डॉनवर छाप पडली. हा हेडलीच ' ब्लॅक ब्रॅडमन ' म्हणून प्रसिद्ध होता. डॉन म्हणतो, " इंग्लंड व ऑस्ट्रेलिया यांच्यामधील नामांकित फलंदाजांबरोबरच हेडलीचा उल्लेख केला पाहिजे. मला जर आज जगाचा क्रिकेट संघ काढावयास सांगितले तर मी त्यांत हेडलीचा समावेश करीन...त्याच्या फलंदाजींत मला कसलाच दोष आढळला नाहीं. "

लिअरी कॉन्स्टन्टाईन याची तर क्रिकेटच्या इतिहासांत आतांपर्यंत झालेल्या सर्वोत्कृष्ट सर्वांगिण खेळाडूंत गणना करतात. डॉन त्याच्याविषयीं म्हणतो, " त्याचा प्रत्येक फटका सणसणीत आणि निर्दोष असे. त्याचे फटके पहात असतांना आम्ही थक्क होत असूं.

" तसेंच तो किती कुशल गोलंदाज होता ! त्यानें एकदां टाकलेल्या एका चेंडूनें मला बेमालूम फसवून माझी साफ दांडी उडविली. "

" आणि क्षेत्ररक्षणाच्या बाबतींत तर त्याला कोणी वरचढ नव्हता. त्याच्या तोडीचा क्षेत्ररक्षक क्वचितच असेल. आमच्याविरुद्ध एका कसोटी सामन्यांतच त्यानें थक्क करणारे तीन झेल घेतले होते. "

डॉन यावेळीं तितकासा फॉर्ममध्यें नसला तरी त्यानें सर्व कसोटी सामन्यांत मिळून सरासरी ५८ धांवा केल्या, हे विशेष आहे.

वेस्ट इंडिजनंतर १९३१–३२ मध्यें द. आफ्रिकेचा संघ ऑस्ट्रेलियांत गेला. पण हा संघ जाण्यापूर्वी ऑगस्ट १९३१ मध्यें डॉनला लँकशॉयर लीगमध्यें

खेळण्यासाठीं ॲक्रींग्टन क्लबनें आकर्षक अटींवर बोलाविलें. आणि डॉननें ऑस्ट्रेलिया सोडण्याचा आपला विचार नाहीं, असें जाहीर करूनहि वर्तमान-पत्रांत तो लँकेशायर लीगमध्यें खेळावयास जाणार, अशा बातम्या प्रसिद्ध होऊन त्याच्यावर खूप टीका झाली. ऑस्ट्रेलियन पार्लमेंटच्या एका सभासदाला या टीकेचें वाईट वाटलें व त्यांनीं डॉनला पुढील पत्र लिहिलें:

"प्रिय मित्रा, तुझ्यावर जी टीका होत आहे, तिचें मला फार वाईट वाटतें. अनेक आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटुंनीं ऑस्ट्रेलियाला किर्ति मिळवून दिली, पण त्यांना म्हातारपण दारिद्र्यांत कंठावें लागलें, आणि कित्येकांना क्रिकेटचें सामने पाहण्या-करितां पदरचे पैसे द्यावे लागले. या परिस्थितींत तूं ॲक्रींग्टन क्लबचें निमंत्रण स्वीकारावेंस असें मला वाटतें."

याउलट त्यावेळचे ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान डॉ. इव्हॅट यांनीं डॉनला सुंदर पत्र लिहून त्यानें ऑस्ट्रेलिया सोडूं नये, अशी विनंति केली.

एका वृद्ध बाईनेंहि त्याला पत्र लिहिलें. "पोरा, माझं म्हातारीचं जरा ऐक. लोखंड तापलें आहे तोपर्यंतच त्यावर घणाचे घाव घाल. जा आणि एखाद्या धनाढ्य मालकिणीशी लग्न कर. तुझा चेहेरा आणि तुझा पराक्रम पाहून ती नक्कीच तुला माळ घालील."

पण सर्व दृष्टींनीं विचार करून त्यानें ऑस्टेलियांतच राहण्याचें ठरविलें.

वेस्ट इंडिज विरुद्ध डॉन तुलनात्मकदृष्ट्या अयशस्वी ठरला होता. पण पुनः द. आफ्रिकेविरुद्ध त्याच्या फलंदाजीला विलक्षण धार आली. किंबहुना इंग्लंडमध्यें त्यानें ३३४ धांवांचा उच्चांक केला ही गोष्ट सोडली तर द. आफ्रिके-विरुद्ध त्यानें सरासरी अधिक धांवा केल्या. एकच वैगुण्य म्हणजे डॉनचा द. आफ्रिकेविरुद्धचा खेळ तितका निर्दोष झाला नाहीं व स्वतः डॉननेंच ही गोष्ट मोकळेपणानें कबूल केली आहे.

द. आफ्रिकेविरुद्धचा पहिला सामना ब्रिस्बेन येथें ता. २७, २८, ३० नोव्हेंबर व १, २, ३ डिसेंबर १९३१ रोजीं झाला. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ४५० धांवा झाल्या त्यापैकीं डॉनच्या २२६ धांवा होत्या. द. आफ्रिकेच्या

दोन्ही डावांत अनुक्रमें १७० व ११७ धांवा होऊन द. आफ्रिकेचा एक डाव व १६३ धांवांनीं पराभव झाला.

दुसरा कसोटी सामना मेलबोर्न येथें फक्त तीन दिवस – ता. १८, १९ व २१ डिसेंबर १९३१ रोजीं झाला. द. आफ्रिकेच्या दोन्ही डावांत अनुक्रमें १५३ व १६१ धांवा झाल्या. ऑस्ट्रेलियाला एकच डाव खेळावा लागला व त्यांत ४६९ धांवा झाल्या. यापैकीं डॉन ब्रॅडमनच्या ११२ व रिगच्या १२७ धांवा होत्या. हा सामनाहि ऑस्टेलियानें एक डाव १५५ धांवांनीं जिंकला.

तिसरा सामना ३१ डिसेंबर १९३१ व १, २, ४, ५ व ६ जानेवारी १९३२ रोजीं झाला. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत १९८ धांवा झाल्या. त्यांत डॉनच्या फक्त २ धांवा होत्या. द. आफ्रिकेच्या पहिल्या डावांत ३५८ धांवा झाल्या. पण दुसऱ्या डावांत ऑस्ट्रेलियानें ५५४ धांवा केल्या. त्यांत डॉनच्या १६७ व वुडफूलच्या १६१ धांवा असून त्या दोघांनीं मिळून दुसऱ्या विकेटीवर २७४ धांवांची भर घातली. द. आफ्रिकेच्या दुसऱ्या डावांत फक्त २२५ धांवा होऊन ऑस्ट्रेलियाचा १६९ धांवांनीं विजय झाला.

चौथा कसोटी सामना ॲडेलेड येथें २९, ३० जानेवारी व १, २ फेब्रुवारी १९३२ रोजीं झाला. द. आफ्रिकेच्या पहिल्या व दुसऱ्या डावांत अनुक्रमें ३०८ व २७४ धांवा झाल्या. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ५१३ धांवा झाल्या. त्यांत डॉन ब्रॅडमनच्या नाबाद २९९ धांवा होत्या. ऑस्ट्रेलियानें दुसऱ्या डावांत नाबाद ७३ धांवा करून हा सामना दहा विकेटींनीं जिंकला.

पांचवा कसोटी सामना मेलबोर्न येथे १२, १३, १५ फेब्रुवारी १९३२ रोजीं झाला. या सामन्याचें वैशिष्ट्य म्हणजे डॉन ब्रॅडमननें फलंदाजी केली नाहीं व ऑस्ट्रेलियाचा महान् गोलंदाज ग्रिमेट यानें गोलंदाजी केली नाहीं. डॉनला जखम झाल्यामुळें त्यानें फलंदाजी केली नाहीं, तर या सामन्यांत ग्रिमेटच्या गोलंदाजीची गरज लागली नाहीं. हा सामना म्हणजे अगदीं कमी धांवांचा सामना होता. द. आफ्रिकेच्या दोन्ही डावांत अनुक्रमें ३६ व ४५ धांवा झाल्या. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत १५३ धांवा झाल्या व ऑस्ट्रेलियानें हा सामना एक डाव ७२ धांवांनीं जिंकला.

द.आफ्रिकेविरुद्ध डॉनला फक्त एकाच सामन्यांत दोन वेळां खेळावें लागलें. तो पांच डाव खेळला, त्यापैकीं चार डावांत त्यानें शतकें आणि द्विशतकें ठोकून एकंदर ७९६ धांवा केल्या. सरासरी १५९.२ धांवा !

एकाच हंगामांतील द. आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी सामन्यांतील हा उच्चांक होता. डॉनप्रमाणेंच ऑस्ट्रेलियन गोलंदाज आयर्नमाँगर यानें केलेला पराक्रमहि अपूर्व होता. त्यानें सरासरी ९.६७ धांवा देऊन पांचहि कसोटी सामन्यांत ३१ विकेटी घेतल्या !

द. आफ्रिकेबरोबरचे सामने चालू असतांना एका वर्तमानपत्रानें डॉनच्या मृत्यूची बातमी देऊन मोठीच खळबळ उडविली होती. क्विन्सलँडमधील कूक-टाऊन इन्डिपेन्डट या वर्तमानपत्रांत ही बातमी आली होती, व ती पुढील-प्रमाणें होती—

### डॉन ब्रॅडमनचा मृत्यू

जगांत आतांपर्यंत होऊन गेलेल्या फलंदाजांतील सर्वश्रेष्ठ फलंदाजाच्या मृत्यूची दुःखद छाया आज ऑस्ट्रेलियावर पडली आहे. ब्रिस्बेन येथें ऑस्ट्रेलिया-विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यामधील तिसरा कसोटी सामना चालू असतां ब्रॅडमन अमांशानें मरण पावला ! ”

ही बातमी एकाच वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली होती. पण डॉननें म्हटल्याप्रमाणें ‘ जगांत काय घडतें ’ याची ती एक नमुना होती.

याच हंगामांतील एक सामना उल्लेखनीय आहे. हा सामना दुय्यम दर्जाचा होता, पण डॉनच्या टोलेबाजीमुळें तो गाजला. या सामन्यांत तीनच ओव्हरींमध्यें ( आठ चेंडूंची एक ओव्हर ) डॉननें शतक ठोकलें होतें. डॉननें यावेळीं पुढीलप्रमाणें फटके मारले.

पहिली ओव्हर— ६, ६, ४, २, ४, ४, ६, ४.

दुसरी ओव्हर— ६, ४, ४, ६, ६, ४, ६ ४.

तिसरी ओव्हर— १, ६, ६, १, १, ४, ४, ६.

# ६ अमेरिकेचा विनोदी दौरा !

ऑस्ट्रेलियांत ऑर्थर मेली या नांवाचा एक नामांकित गोलंदाज आहे. त्यानें बरेच कसोटी सामने गाजविले होते. त्यानें कसोटी सामन्यांत ९९ विकेटी घेतल्या होत्या. तो रसिक आणि आनंदी असून गोलंदाजी मंदगतीनें टाकी, पण स्वभावानें धाडशी आहे. त्यानें एकदां अशी टूम काढली कीं अमेरिका आणि कानडा या देशांत क्रिकेटचा संघ घेऊन जावयाचें. अखेर त्यानें चिकाटीनें प्रयत्न करून आणि कानडियन पॅसिफीक रेल्वेकडून कांहीं सवलती मिळवून हा दौरा मुक्रर केला.

ऑर्थर हा दौरा मुक्रर होण्यापूर्वी डॉनला भेटला होता. “ तूं या दौऱ्यांत असल्याशिवाय आर्थिकदृष्ट्या हा दौरा यशस्वी होणार नाहीं, ” असेंहि त्यानें डॉनला सांगितलें होतें. डॉनला विचार पडला. अखेर हा दौरा आपण दवडला तर पुनः अमेरीकेला जाण्याची संधी मिळणार नाहीं, असा विचार करून त्यानें जावयाचें ठरविलें. डॉन यावेळीं विवाहबद्ध झाला होता. त्याच्या पत्नीचें नांव जेसी मेन्झीडा. लहानपणापासून डॉन व ती एकत्र खेळलीं होतीं. डॉनचा रोमांचकारी खेळ तिनें अनेक वेळां पाहिला होता. लहानपणाच्या मैत्रीचें पुढें प्रणयांत रूपांतर होऊन त्यांचा विवाह झाला. डॉननें तिलाहि आपल्याबरोबर घेऊन जावयाचें ठरविलें. मेलीच्या संघाबरोबर गेलेली जेसी ही एकटीच स्त्री होती.

ऑर्थर मेलीच्या या संघांत डॉनशिवाय स्टॅन मॅकेब, ॲलन किपॅक्स आदिकरून इतर कांहीं अव्वल दर्जाचे खेळाडू होते.

ऑर्थर मेली–डॉन ब्रॅडमन कंपनीचा अमेरिका आणि कानडा या देशांतील

हा दौरा म्हणजे क्रिकेट क्षेत्रांतील एक मोठा विनोद होता. अगोदरच अव्वल दर्जाचे खेळाडू हे ज्या देशांत क्रिकेट फारसें खेळलें जात नव्हतें, अशा देशांतील नवशिक्या किंवा अधूनमधून हौसेखातर क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंशीं सामने देण्याकरितां जात होते, हा पहिला विनोद आणि दुसरी गोष्ट म्हणजे हा दौरा अथपासून इतिपर्यंत करमणुकींनीं भरलेला होता.

ता. २६ मे १९३२ रोजीं हा संघ सिडनेहून एस. एस. नायगरा या बोटीनें अमेरिकेस जाण्यास निघाला. ( हीच बोट दुसऱ्या महायुद्धांत जपानी लोकांनीं न्युझीलंडच्या किनाऱ्याजवळ बुडाविली.) प्रथम हा संघ फिजी बेटांत गेला. फिजी बेटांत सुवा येथें या संघाचा सामना होणार होता. पण पाऊस पडल्यामुळें सामना रद्द करावा लागला. पण ऑस्ट्रेलियन संघांत डॉन ब्रॅडमन नांवाचा जागतिक विक्रम केलेला एक फलंदाज आहे, ही बातमी कळल्यामुळें फिजी बेटांतील एडवर्ड थॅकवो या नांवाचा जलद गति गोलंदाज ब्रॅडमनला पाहण्यास आला. त्यानें आपल्याबरोबर शरीरसंरक्षक म्हणून एक पोलिसमन आणला होता. हा थॅकवो सहा फूट तीन इंच होता तर त्याचा शरीरसंरक्षक पांच फूट होता ! जागतिक उच्चांक करणारा डॉन ब्रॅडमन हाच, अशी जेव्हां त्याच्याशी डॉनची ओळख करून देण्यांत आली तेव्हां त्यानें पोट धरधरून हंसावयास सुरवात केली. त्यानें डॉनचे हातपाय, खांदे चाचपडून पाहिले. या ठेंगू पोऱ्यानें जागतिक उच्चांक केला असेल, यावर त्याचा विश्वासच बसेना. दुसरी उद्बोधक गोष्ट म्हणजे सुवा येथील सामना पाहण्यास एक म्हातारा दोन दिवस पायीं चालत आला होता. पण सामना नाहीं, असें कळतांच, तो त्याच पावलीं परत पायीं जाण्यास निघाला !

फिजीनंतर होनोलुलू घेऊन हा संघ व्हॅंकोंर बेटांतील व्हिक्टोरिया येथें पोहोंचला. ज्या मैदानावर या संघाचा सामना झाला तें मैदान म्हणजे निसर्ग-सौंदर्याचें रम्य स्थान होतें. सुंदर हिरवळ असलेलें क्रिकेट क्रीडांगण आणि सभोंवार रंगीबेरंगी झाडें ! क्रिकेट खेळण्याकरितां इतकें सुंदर क्रिकेट मैदान कोठेंच मिळालें नसेल.

व्हिक्टोरिया येथील हा सामना अपूर्व झाला. विरुद्ध बाजूच्या संघांत

१८ खेळाडू होते त्यांनीं १९४ धांवा केल्या. ऑस्ट्रेलियन संघानें ८ बाद ५०३ धांवा केल्या. एकदां तर डॉन ब्रॅडमन आणि व्हिक्टर रिचर्डसन यांनीं ७ मिनिटांत ५० धांवा केल्या. स्टॅन मॅकचेनें तुफानी टोलेबाजी करून १५० धांवा केल्या. एक चेंडू तर त्यानें इतक्या जोरानें तडकावला कीं प्रेक्षकांत बसलेल्या एका बाईला लागून, तिच्या पायाचें हाड मोडलें ! नंतर असें कळलें कीं ती विरुद्ध बाजूच्या एका खेळाडूची बायको होती. या सामन्यांत त्या दिवशीं झाडाझुडपांत सहा चेंडू हरवले. त्यांपैकीं चार चेंडू प्रेक्षकांनीं शोधून काढून खेळाडूकडे फेकले. अशा रीतीनें एकाच वेळीं चार चेंडू खेळांत होते. यामुळें पुनः चेंडू हरवला तरी खेळ थांबवावा लागत नसे.

दुसरा सामना व्हिक्टोरिया संघाबरोबर झाला. या सामन्यांत डॉननें एका ओव्हरींत ६ विकेटी घेतल्या. ( आठ चेंडूंची एक ओव्हर. ) पण सहा विकेटी घेऊनहि हॅटट्रिक किंवा ओळीनें तीन विकेटी घेण्याचें भाग्य मात्र त्याला लाभलें नाहीं !

व्हिक्टोरियाहून हा संघ ब्रॉकटन पॉईंट येथें गेला. येथील मैदानहि अत्यंत सुंदर होतें. तेथेंहि या संघाचें एकेक दिवसाचे असे तीन सामने झाले. एका सामन्यांत तर स्थानिक संघानें अद्‌भूत क्षेत्ररक्षण करून पहिल्या डावावर बलाढ्य ऑस्ट्रेलियन संघाला १८ धांवांनीं पराभूत कलें. या तीनहि सामन्यांत ऑर्थर मेलीनें खूप विकेटी घेतल्या. ऑर्थर मेली हा विनोदी होता. एक खेळाडू खेळावयास आला तेव्हां त्यानें ओळखलें कीं हा खेळाडू टोलेबाज आहे. ऑर्थर त्याला म्हणाला, " तूं जर सहाचा फटका ठोकशील तर मी चिरूट देईन." त्यानें तात्काळ सहाचा फटका ठोकला. ऑर्थरनें त्याला ठरल्याप्रमाणें चिरूट दिला. ऑर्थरनें त्याला त्यानंतर सांगितलें कीं तूं जितके सहाचे फटके मारशील तितके चिरूट तुला मी देईन. त्यानें दुसरा सहाचा फटका मारला व पुनः एक चिरूट मिळविला. पण तिसरा चेंडू ऑर्थरनें खूप वळविला. फलंदाजाला तें कळलें नाहीं. त्यानें फटका मारला आणि सीमेवर क्षेत्ररक्षण करीत असलेल्या क्षेत्ररक्षकाच्या हातांत झेल दिला !

व्हँकूव्हरहून हा संघ कानडाकडे रवाना झाला. कानडांत पोहोंचल्यावर हा संघ पूर्व कानडाकड आगगाडीनें निघाला. या प्रवासांत डॉनची एका हमालाशीं खूप दोस्ती जमली. एका क्रिकेट संघाचें सामान उचलण्यास मिळतें, याचा त्याला अभिमान वाटे. तो डॉनला " मॅसाडॉन " म्हणे. वास्तविक त्याला क्रिकेट-मधलें कांहीं कळत नसे. पण एकदां एका नियतकालिकांत डॉनची बेब रुथ या प्रख्यात फूटबॉल खेळाडूशी तुलना करण्यांत आली होती. आणि बेब रुथ हा त्याचा आवडता खेळाडू असल्यामुळें त्याला डॉनविषयींहि अभिमान वाटूं लागला.

कानडामध्यें मॉन्ट्रील येथील एक सामना उल्लेखनीय झाला. या सामन्यांत डॉननें तुफान फलंदाजी करून २०० धांवा केल्या. विरुद्ध बाजूचा एक वेस्ट इंडियन गोलंदाज ही फलंदाजी पाहून सर्दच झाला. त्यानें डॉनजवळ कांहीं जादूटोणा आहे कीं काय हें पाहण्याकरितां त्याचे खिसे चाचपून पाहिले !

त्यानंतर टोरोन्टो येथें चार सामने खेळून ऑस्ट्रेलियन संघ ग्युलेप येथे आला. तेथील एक दिवसाच्या सामन्यांत स्थानिक संघाच्या अठरा खेळाडूंच्या संघानें ३३ धांवा केल्या. ऑस्ट्रेलियानें ७ बाद ४७९ धांवा केल्या. त्यांत डॉननें २६० धांवा केल्या. आणि स्टॅन मॅकेबनें विरुद्ध बाजूच्या ३३ धांवांत ११ विकेटी घेतल्या !

टोरोन्टो येथ ओटावा संघाशी सामना झाला. कानडामध्यें फ्रेंच लोकांची मोठी संख्या आहे. त्यांना क्रिकेटचा षोक नाहीं. पण तेथील इंग्लिश लोकांना क्रिकेटची आवड आहे. कानडाचे त्यावेळचे गव्हर्नर क्रिकेटचे मोठे भोक्ते असल्यामुळें त्यांनीं हा सामना खुद्द आपल्या बंगल्याजवळच्या पटांगणांत घडवून आणला. या सामन्यांत फ्लिवूड स्मिथ यानें ९ धांवांत सात विकेटी घेतल्या !

कानडांतून अमेरिकत जाण्यापूर्वीं जगांतील प्रेक्षणीय स्थळांपैकीं एक असा नायगरा धबधबा पाहून डॉन आणि त्याचे सहकारी यांनीं आपल्या डोळ्यांचें पारणें फेडलें. विशेषतः रात्रीं या धबधब्यावर सर्चलाईटमधून निरनिराळ्या रंगांचा प्रकाश पाडला जातो, तेव्हांचें दृश्य अद्‌भुतरम्य असतें असें म्हणतात. डॉन हा निसर्गसौंदर्याचा अत्यंत भोक्ता आहे. त्याच्या आत्मचरित्रांत त्यानें पाहिलेल्या अनेक निसर्गरम्य स्थळांचीं आटोपशीर पण सुंदर वर्णनें आढळून येतात.

अमेरिकेंत हा संघ प्रथम न्युयॉर्क येथें येऊन दाखल झाला. न्युयॉर्क येथें जे कांहीं क्रिकेट होते, ते फक्त तेथील वेस्ट इंडियन लोकांत आणि त्यांनीं ऑस्ट्रेलियन संघाशी त्यांच्या मानानें चांगलाच सामना दिला. न्युयॉर्कच्या सामन्यांतहि कांहीं प्रसंग उल्लेखनीय होते.

एका सामन्यांत दुसऱ्या डावांत डॉन ब्रॅडमन शून्यावर बाद झाला. डॉनला बाद केलेला गोलंदाज ताबडतोब मैदानाच्या कुंपणाजवळ धांवतच गेला आणि कांहीं सेकंदांतच त्यानें हर्षानें बेहोष झालेल्या प्रेक्षकांकडून टोपी भरून डॉलर गोळा केले ! या प्रेक्षकांना गोलंदाजी करतांना यॉर्कर पडला कीं मनापासून आनंद होई. फलंदाजानें मारलेल्या बाऊंड्री किंवा ओव्हर-बाऊंड्रीपेक्षाहि त्यांना यॉर्करमुळें अधिक हर्ष होई. यॉर्कर पडला कीं सारे प्रेक्षक हवेंत टोप्या उडवीत.

एकंदरींत हा सामना विदुषकी थाटाचा झाला.स्केअरलेगचा अंपायर बारंवार सीमेवर जाऊन गप्पा झोडी व तितक्या लांबूनहि ओरडून निकाल देण्याची त्याची तयारी असे.

तेथील दुसऱ्या एका सामन्यांत भेटलेला अंपायरहि विचित्र होता. एकदां विरुद्ध बाजूचा खेळाडू खेळत होता. चेंडू स्टॅंप्सना लागून बेल्स खालीं पडल्या, तरी त्यानें नाबाद असा निकाल दिला, आणि बेल्स वाऱ्यानें खालीं पडल्या, असें त्यानें स्पष्टिकरण केलें. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यावेळीं वातावरणांत इतकी स्तब्धता होती कीं वाऱ्यानें झाडाचें पानहि किंचित थरथरतांना दिसत नव्हतें. पण या सामन्यांत एक दुर्दैवी घटना घडली. मॅकेब गोलंदाजी करीत असतांना यष्टिरक्षक सॅमी कार्टर याच्या डोळ्याला चेंडू लागून त्याचा एक डोळा निकामी झाला.

ऑस्ट्रेलियांत न्युयॉर्कसारख्या गगनचुंबी इमारतीं नसल्यामुळें ऑस्ट्रेलियन खेळाडूंना न्युयॉर्कच्या गगनचुंबी इमारती म्हणजे एक विलोभनीय दृश्य होतें. विशेषतः न्युयॉर्कची एम्पायर बिल्डिंग ही इमारत म्हणजे या गगनचुंबी इमारतींचा कळसच होय. ही इमारत १०२ मजली असून तींत ८०,००० वर लोक राहतात. ही इमारत मार्च १९३० मध्यें सुरू करून सहा महिन्यांत पुरी करण्यांत आली ! असाधारण वेग आणि कार्यक्षमता यांचा समन्वय !

न्युयॉर्कच्या दौऱ्यांत ऑस्ट्रेलियन संघाला प्रसिद्ध वॉटरमन फौन्टनपेनचे जनक डॉ. फँक वॉटरमन यांनीं थाटाची मेजवानी दिली. त्याप्रमाणेंच महान् निग्रो गायक पॉल रॉब्सन याचा “ शोबोट ” हा गाजलेला प्रयोग त्यांनीं पाहिला.

न्युयॉर्क येथून डिट्रॉईट यथें गेल्यावर या संघाचा जो एक सामना झाला, तोहि विनोदी होता. या सामन्यांत दोन तऱ्हेवाईक अंपायर भेटले. एक अंपायर सहा चेंडूंची ओव्हर देई व दुसरा आठ चेंडूंची ओव्हर देई. रिचर्ड-सननें याबद्दल चौकशी केल्यावर असें कळलें कीं किती चेंडूंची ओव्हर द्यावी, याबद्दल त्या दोघांत मतभेद झाला. म्हणून त्यांनीं अशी तडजोड केली कीं ज्यानें त्यानें आपापल्या मनाप्रमाणें ओव्हर द्यावी.

डिट्रॉईट येथून ऑस्ट्रेलियन संघ शिकागो येथें गेला. शिकागो हे अमेरिकन बोलपटांनीं दरोडेखोरांचे शहर म्हणून गाजविलें असल्यामुळें त्या शहराविषयीं ऑस्ट्रेलियन खेळाडू तीच कल्पना मनांत बाळगून होते. पण प्रत्यक्ष पाहिल्यावर शिकागो हें अत्यंत मोठ्या पण सुंदर शहरांपैकीं एक शहर आहे असें त्यांना आढळून आलें.

शिकागो येथें एक सामना झाला. किपॅक्सनें एका फलंदाजाला चेंडू टाकून झेल घेतला. फलंदाज बाद झाला होता, पण गंमत करण्यासाठीं तो क्रीजबाहेर आहे हें पाहून त्यानें चेंडूनें दांड्या उडविल्या व अंपायरकडे अपील केलें. अंपायरनें उत्तर केलें, “ मला माहीत नाहीं. काय झालें तें मला कळलेंच नाहीं ! ”

शिकागो येथील सामन्यानंतर विनिपेग येथें सामना झाला. जेथें हा सामना झाला त्या मैदानावर टोळांचें अक्षरशः राज्य होतें. चेंडू गोलंदाजाच्या हातांतून सुटला कीं एकतरी टोळ मरून पडावयाचा आणि चेंडू भलताच वळावयाचा !

विनिपेग येथे संघाला प्रख्यात हडसन बे कंपनीनें थाटाची मेजवानी दिली व यावेळीं मेजवानीच्या पदार्थांची नांवें एका लांकडी नक्षीदार तबकावर छापलीं होतीं !

विनीपेग येथून संघ परत व्हॅंकौव्हर येथें आला. तेथील स्थानिक संघाबरोबर जो सामना झाला, त्यांत स्थानिक संघाच्या दोन्ही डावांत अनुक्रमें ३७ व ९६ धांवा झाल्या. ऑस्ट्रेलियन संघानें तीन बाद ३३७ धांवा केल्या. दुसऱ्या एका

सामन्यांत ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी मजा केली. पहिल्या दिवशीं स्थानिक खेळाडूंचें नेतृत्व ऑर्थर मेली यानें केलें तर दुसऱ्या दिवशीं ॲलन किपॅक्स यानें त्याच संघाचें नेतृत्व केलें.

व्हॅकौंरहून संघ सॅन फ्रॉन्सिस्को येथें आला, ७०००० लोक बसतील अशा भव्य स्टेडियमवर या संघाचा स्थानिक संघाशी सामना ठेविण्यांत आला होता. पण सामना पाहण्यास पांचशे लोकसुद्धां हजर नव्हते. स्थानिक संघांत पंधरा खेळाडू असून, त्यांनीं वीस धांवा केल्या. यापैकीं पर्सीव्हल नांवाच्या एका खेळाडूच्या दहा धांवा असून, तीन धांवा इतर होत्या ! यावेळीं क्षेत्ररक्षण करतांना डॉनचा नऊ वेळां चेंडूला हात लागला. त्यापैकीं तीन वेळां झेल घेण्याकरितां व चार वेळां रन–आऊट करण्याकरितां ! ऑस्ट्रेलियानें २ बाद २६८ धांवा केल्या. स्थानिक संघाचा दुसरा डावहि असाच कोसळला. स्टॅन मॅकेबनें दोन्ही डावांत २६ धांवा देऊन १५ खेळाडू बाद केले.

या स्थानिक संघांतील सलामीचा एक खेळाडू शिष्ट होता. दुसऱ्या बाजूला विकेटी भराभर पडूं लागल्या, तेव्हां तो वैतागानें उद्गारला, " मला कसले हे रद्दी सहकारी दिले आहेत ! " पण त्याची खेळण्याची पाळी आली तेव्हां पहिल्याच चेंडूला त्याची दांडी उडाली व एक चकार शब्दहि न बोलतां तो परतला !

या सामन्याचे स्थानिक वर्तमानपत्रांत जें वर्णन आलें होतें, त्यांत " शेअर बाजारांत भाव जसे भराभर घसरतात, तशा विकेटी पडत होत्या. " असें वर्णन करून वार्ताहरानें आपल्या शेअर बाजाराबाबतच्या ज्ञानाची चुणूक दाखविली होती. डॉन ब्रॅडमन व कीथ टॉलहर्स्ट यांनीं ३४ मिनिटांत १६८ धांवा केल्या, या घटनेला उद्देशून त्याच वार्ताहरानें लिहिलें, " त्यानें कॅलिफोर्नियांतील गोलंदाजांना झिजविलें ! "

सॅन फ्रॉन्सिस्को येथून हा संघ लॉस एंजलीस येथें गेला. लॉस एंजलीस येथेंच गाजलेलें हॉलीवूड आहे. येथें त्यांचा मेरी ॲस्टर, जीन होर्लो, मर्ना लॉय, बोरीस कारलॉफ, क्लार्क गेबल व सी. ऑब्रे स्मिथ या नामांकित चित्रपट-नटनटींशीं परिचय झाला. हॉलीवूड येथें स्थानिक संघाशी ऑस्ट्रेलियाचा जो सामना

झाला त्याचें नेतृत्व सी. ऑब्रे स्मिथ यानें स्विकारलें होते. सी. ऑब्रे स्मिथ ही एक मजेदार व्यक्ति होती. तो पूर्वी एक नामांकित क्रिकेटपटू असून क्रिकेटपटू या नात्यानें त्यानें इंग्लंडतर्फे ऑस्ट्रेलियाचा दौरा केला होता. त्यानंतर तो राज-कारणांत पडला. पुढें राजकारण सोडून तो रंगभूमीवर गेला. व रंगभूमीवरचा नामांकित नट अशी कीर्ति संपादन करून तो हॉलीवूड येथें चित्रपटसृष्टींत गेला व पुढें तहाहयात तो चित्रपटसृष्टींतच होता.

हॉलिवूड येथें त्यांना प्रख्यात सिनेमानट लेस्ली हॉवर्ड यानें थाटाची मेजवानी दिली. या मेजवानीस मौरीन ओसुलिव्हॅन, नॉर्मा शिअरर या नामांकित चित्रपटचंद्रिका उपस्थित होत्या. लेस्ली हॉवर्ड हा पुढें मोटार अपघा-तांत ठार झाला.

क्रिकेटच्या दृष्टीनें ऑस्ट्रेलियन संघाचा हा दौरा वादळी होता. दहा आठ-वड्यांत ऑस्ट्रेलियन संघानें ६००० मैलांचा प्रवास केला. या काळांत डॉननें ५१ डावांत खेळून ३७७९ धांवा केल्या (सरासरी १०२). स्टॅन मॅकेब्रने २३६१ धांवा करून १८९ विकेटी घेतल्या. मेलीनें २०० विकेटी घेतल्या.

अमेरिकेचा दौरा हा ऑस्ट्रेलियन संघाला एक रोमांचकारी अनुभव होता. डॉन म्हणतो, “या दौऱ्यामुळें जेसीला व मला नवीन जग पाहवयास मिळालें.”

डॉन हा दौरा आटपून परत आला, पण थोड्याच दिवसांनीं त्याला आणि साऱ्या ऑस्ट्रेलियन संघाला क्रिकेटच्या इतिहासांतील एका अभूतपूर्व वादळाला तोंड द्यावे लागले.

●●●

# ७ क्रिकेटला रणक्षेत्राचें स्वरूप !

सन १९३२-३३ मध्यें इंग्लंडचा संघ ऑस्ट्रेलियांत गेला. या संघाचा कर्णधार डग्लस जार्डाइन हा असून त्याच्या संघांत सटक्लिफ, वॅट, हॅमंड, पतौडीचा नबाब, लीलँड, ऍम्स, व्हेरिटी आणि विशेषतः लारवूड, बौज आणि होस हे गोलंदाज होते. इंग्लंडचा ऑस्ट्रेलियांतील हा दौरा चांगलाच गाजला व या दौऱ्यानें जें कडवट वातावरण निर्माण केलें होतें तें निवळण्यास दीड दोन वर्षें जावीं लागलीं.

डॉन ब्रॅडमन हा अमेरिकेहून परत आला तेव्हां त्याची प्रकृति चांगली नव्हती. शिवाय त्याच वेळीं ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्ड ऑफ कंट्रोलशी त्याचा मतभेद झाल्यामुळे त्याचें मानसिक स्वास्थहि बरोबर नव्हते. तरीहि कर्तव्य म्हणून इंग्लिश संघाविरुद्ध संयुक्त ऑस्ट्रेलियन एलेव्हन या संघांतून पर्थ येथें खेळण्याचें त्यानें निमंत्रण स्वीकारलें. पण नंतर डॉनला असें वाटूं लागलें कीं या सामन्याकरितां खेळण्यांत आपण चूक केली. कारण या सामन्याकरितां त्याला सिडनेहून पर्थ येथें जाण्याकरितां पांच रात्री आगगाडींत काढाव्या लागल्या आणि तेथें गेल्यावर प्रथम तब्बल दोन दिवस क्षेत्ररक्षण करावे लागले. यावेळीं डॉनला गोलंदाजीहि बराच वेळ करावी लागली. त्यांतच ऑस्ट्रेलियन एलेव्हनला दोन वेळां पाऊस पडलेल्या विकेटवर फलंदाजी करावी लागून सणसणीत पराभव खावा लागला यावेळीं डॉनच्या दोन्ही डावांत अनुक्रमें ३ व १० धावा झाल्या. जार्डाइननें या सामन्यांकरितां लारवूड, बोंज व होस या जलद गति गोलंदाजांचा संघांत मुद्दाम समावेश केला नव्हता. त्यामुळें आगामी घटनांची कांहींच कल्पना येण्यासारखी नव्हती.

या सामन्यानंतर डॉन लागलीच शेफिल्ड सामन्यांत न्यू साऊथ वेल्सतर्फे व्हिक्टोरियाविरुद्ध खेळला, आणि प्रकृति बरी नसतांहि व प्रवासाचा शीण झालेला असतांहि त्यानें या सामन्यांतील पहिल्या डावांत १९५ मिनिटांत २३८ धांवा केल्या. यापैकीं पहिलें शतक त्यानें ७० मिनिटांत झळकविलें. सिडने रेफरी या पत्रानें लिहिलें, "सिडनेच्या मैदानावर क्वचितच असा खेळ पाहवयास मिळाला."

मध्यतरी डॉनचे क्रिकेट बोर्डाबरोबरचे मतभेद वाढत गेले. बोर्डाचें असें म्हणणें होत कीं डॉननें वर्तमानपत्रांत लेख लिहितां कामा नये. ज्यांचा वृत्तव्यवसाय हा धंदा आहे त्यांच्याशिवाय इतर कोणत्याहि खेळाडूंनीं लेख लिहूं नये. डॉनचें म्हणणें असें कीं लेख लिहिणें व नभोवाणीवर बोलणें हा आपल्या धंद्याचाच एक भाग आहे. या वादाला जाहीर स्वरूप आलें. याच वेळीं लंडन येथील एका वर्तमानपत्रानें त्याला लेख लिहिण्याबद्दल भली मोठी रक्कम देऊं केली. डॉन द्विधा मनःस्थितींत होता.

मेलबोर्न येथ ऑस्ट्रेलियन एलव्हेनचा इंग्लिश संघाशी सामना झाला. या सामन्यांत जार्डाईननें 'बॉडीलाईन' गोलंदाजीचा वापर करणाऱ्या तिघांहि गोलंदाजांना घेतले होते. डॉनला जार्डाईनचा उद्देश तात्काळ कळून आला, तो त्याबद्दल जबाबदार क्रिकेट अधिकाऱ्यांशी बोललाहि. पण त्या वेळीं त्याचा कोणी विचार केला नाहीं. डॉनच्या या सामन्यांत अनुक्रमें ३६ व १३ धांवा झाल्या व दोन्ही वेळां त्याची विकेट-लारवुड या गोलंदाजानें घेतली. ऑस्ट्रेलियातर्फे नॅगेल यानें १० ओव्हरीमध्यें फक्त ३२ धांवा देऊन ८ इंग्लिश खेळाडू बाद केलें!

पुढचा सामना न्यू साऊथ वेल्स आणि इंग्लिश संघ यांच्यांत झाला. क्रिकेट, प्रवास व चर्चा यांचा परिणाम म्हणूनच कीं काय डॉनचा खेळ निर्जीव झाला. पहिल्या डावांत तो फक्त १ धांवेवर बाद झाला. आणि दुसऱ्या डावांत जेमतेम ७१ धांवांची त्यानें मजल मारली. या सामन्यांत टेट यानें उत्कृष्ट गोलंदाजी टाकली. स्वतः टेट 'बॉडीलाईन' गोलंदाजीच्या विरुद्ध असल्यामुळें या सामन्यांतील जार्डाईनचे डावपेंच त्याला आवडल नाहींत.

पहिला कसोटी सामना ता. २, ३, ५, ६ व ७ रोजीं सिडने येथ झाला. डॉन ब्रॅडमन-ऑस्ट्रेलियाचा आधारस्तंभ-या सामन्यांत खेळूं शकला नाहीं. या अप्रतिम फलंदाजाला या सामन्यांत प्रेक्षकाची भूमिका करावी लागली.

पण डॉनच्या गैरहजेरींत हा सामना स्टॅन मॅकेबनें गाजविला. ऑस्ट्रेलियानें या सामन्यांत टॉस जिंकला. पण विकेटी भराभर पडूं लागल्या. वुडफूल ७ धांवा करून बाद झाला. दुसरी विकेट ६५ वर, तिसरी विकेट ८२ वर व चौथी विकेट ८७ वर पडली. स्टॅन मॅकेब क्रीडांगणावर उतरला आणि त्यान आपल्या आयुष्यांतील अवर्णनीय फलंदाजीचा आविष्कार दाखविला. दोन तासांत त्यानें व्हिक्टर रिचर्डसनच्या मदतीनें १२९ धांवा केल्या. त्या दिवशीं खेळ संपेपर्यंत ऑस्ट्रेलियाच्या ६ बाद २९० धांवा होत्या. स्टॅन मॅकेब त्या दिवशीं नाबाद होता. लारवूड, होस आणि बौज यांच्या तुफानी माऱ्याची पर्वा न करतां सहजसुंदर आणि आर्कषक धडाडीनें त्यानें दुसऱ्या दिवशीं आपल्या स्वतःच्या ( नाबाद ) १८७ धांवा केल्या. यांत चाराचे २५ फटाके होते. विशेष म्हणजे शेवटच्या ७० धांवांत त्यानें एकट्यानें सर्व जबाबदारी आपल्यावर घेऊन साठ धांवा केल्या. आणि त्यांतहि अभिमानाची गोष्ट म्हणजे शेवटच्या खेळाडूच्या मदतीनें त्यानें ५५ धांवा केल्या. त्यांत त्याच्या स्वतःच्या ५१ धांवा होत्या ! क्रिकेटच्या इतिहासांतील अद्वितीय पराक्रमापैकीं हा पराक्रम होता. मॅकेब खेळ संपवून परत आल्यावर डॉनने त्याला मिठी मारली. त्याच्या तोंडातून शब्द निघेना. अखेर तो सद्गतित होऊन म्हणाला, “ किती भव्य खेळलास ! तुझ्या आजच्या खेळासारखें मला खेळतां आलें तर मी स्वतःला धन्य समजेन ! ” सर्वश्रेष्ट फलंदाजानें केलेल्या या गौरवापेक्षां स्टॅन मॅकेबचा अधिक समर्पक गौरव कोण करूं शकणार होता !

या सामन्यांत इंग्लंडच्या वतीनें सटक्लिफ, हॅमंड व पतौडीचा नबाब हेहि सुंदर खेळले व त्यांनीं अनुक्रमें १९४, ११२, १०२ धांवा केल्या, आणि इंग्लंडला अखेर दहा विकेटनीं विजय मिळवून दिला. पण मॅकेबच्या वैभवशाली खेळाच्या पार्श्वभूमीवर त्यांचा खेळ तितकासा उठावदार दिसला नाहीं.

दुसऱ्या सामन्याकरितां जो संघ निवडला गेला, त्यांत डॉनचा समावेश

करण्यांत आला, आणि या दुसऱ्या सामन्यांतच 'बॉडीलाईन' गोलंदाजीचा प्रथम प्रयोग करण्यांत आला. ही 'बॉडीलाईन' गोलंदाजी म्हणजे काय चीज होती?

खुद्द इंग्लंडचा अग्रगण्य फलंदाज वॉल्टर हॅमंड यानें 'बॉडीलाईन' गोलंदाजीचें थोडक्यांत पुढीलप्रमाणें वर्णन केलें होतें:

(१) यांत तुफानी गोलंदाज गोलंदाजी करतो.

(२) विकेटवरून चेंडू उंच जातील, अशा रीतीनें टप्पे केले जातात.

(३) या गोलंदाजीचा रोख खुद्द फलंदाजाविरुद्धच असतो.

(४) या गोलंदाजीच्या वेळीं लेगकडे ६ ते ८ क्षेत्ररक्षक असतात.

पुढे कसोटी सामन्यांतून निवृत्त झाल्यावर हॅमंडनें बॉडीलाईन गोलंदाजी-विरुद्ध पुढील विचार व्यक्त केले :

" या गोलंदाजीचा मी कडक निषेध करतो. बॉडीलाईन गोलंदाजी घातक आहे. या गोलंदाजीमुळें मैदानावर कोणी मेला नाहीं, हें नशीब! मला या प्रकारच्या गोलंदाजीला तोंड द्यावें लागलें व ती तशीच चालू राहिली असती तर मी क्रिकेटमधून निवृत्त झालों असतो."

सन १९३० मध्यें इंग्लंडमध्यें डॉन ब्रॅडमननें अभूतपूर्व फलंदाजी करून अनेक उच्चांक मोडले होते... विकेट जर चांगली असेल तर डॉन ब्रॅडमन हा तुफानी, मध्यम, मंदगति फसव्या अशा सर्व प्रकारच्या गोलंदाजांना पिटून काढल्याशिवाय राहणार नाहीं व ॲशीस परत मिळविणें अशक्य होईल अशी खात्री असल्यामुळें व केवळ डॉनसाठीं ही गोलंदाजी शोधून काढण्यांत आली होती. म्हणूनच कांहींजणांनीं बॉडीलाईन गोलंदाजीचा ब्रॅडमनलाईन गोलंदाजी असा उल्लेख केला! हॅमंडनेंच पुढे असा गौप्यस्फोट केला कीं लंडन येथील एका हॉटेलमध्यें जार्डाइन, ऑर्थर कार, होस आणि लारवूड हे एक रात्रीं जमले. त्यावेळीं पर्सी फेंडरनें जार्डाईनला " डॉन ब्रॅडमनला काबूंत ठेवावयाचें असेल तर बॉडीलाईन गोलंदाजी हाच एक उपाय आहे, " असें सांगितलें. डॉननें मारलेल्या फटक्यांच्या स्कोअरर फर्ग्युसन यानें तयार केलेल्या आकृत्या घेऊन जार्डाईननें त्यांचा अभ्यास केला. यानंतर जार्डाईन एम. सी. सी. चे फॉस्टर यांच्याकडे गेला आणि त्यानें लेगकडे क्षेत्ररक्षक कसे

टेवावयाचे याचा आराखडा केला. बिचाऱ्या फॉस्टरना मात्र आपल्या या क्षेत्ररचनेचा ' बॉडीलाईन ' करितां उपयोग करण्यांत येईल याची कल्पनाहि नव्हती.

दुसरा कसोटी सामना मेलबोर्न येथें ३०, ३१ डिसेंबर १९३२ व २, ३ जानेवारी १९३३ रोजीं झाला. ऑस्ट्रेलियानें टॉस जिंकला. पहिली विकेट पडल्यावर डॉन खेळावयास निघाला. क्रीडांगणावरील पन्नास हजार प्रेक्षकांनीं टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. क्षेत्ररक्षण करीत असलेला इंग्लंडचा हर्बर्ट सटक्लिफ डॉनला म्हणाला, " डॉन, केवढें हें प्रचंड स्वागत ! " डॉन उत्तरला, " हो, पण मी परत फिरेन तेव्हांहि टाळयांचा असाच कडकडाट होईल कां ? "

आणि डानच्या उत्तराची लागलीच प्रचिति आली. बौजच्या पहिल्याच चेंडूवर डॉनचा त्रिफळा उडाला. डॉन परत फिरला. क्रीडांगणावर भीषण शांतता पसरली. हर्बर्ट सटक्लिफजवळून डॉन गेला, पण दोघांनीं एक चकार शब्दहि काढला नाहीं. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत २२८ धांवा झाल्या. त्यांत लढवय्या फिंग्लटनच्या ८३ धांवा होत्या. पण ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनीं कमाल करून बलाढ्य इंग्लिश संघ १६९ धांवांत बाद केला. वॉलनें ५२ धांवांत ४ व ओरेलीनें ६३ धांवांत ५ खेळाडू बाद केले. दुसऱ्या डावांत ऑस्ट्रेलियाच्या १९१ धांवा झाल्या. त्यांत डॉनच्या एकट्याच्या नाबाद १०३ धांवा होत्या. लारवूडच्या गोलंदाजीला तो यशस्वीपणें निर्धारानें तोंड देत होता विशेष म्हणजे पट्टीचे ऑस्ट्रेलियन फलंदाज भराभर बाद झाले असतां शेवटचा खेळाडू आयर्नमाँगर यानें त्याला १९१ पर्यंत धांवसंख्या नेऊन भिडविण्यास मदत केली. डॉनला धागधूग वाटत होती. पण " पोरा, घाबरूं नकोस. मी तुला दगा देणार नाहीं, " असा आयर्नमाँगरनें त्याला धीर दिला. दुसऱ्या डावांत ऑस्ट्रेलियातर्फे ओरेलीनें पुनः अप्रतिम गोलंदाजी टाकली व ६६ धांवांत पांच खेळाडू बाद केले. इंग्लंडचा संघ १३९ धांवांत बाद झाला व ऑस्ट्रेलियानें १११ धांवांनीं सामना जिंकला.

पुढील तीनहि कसोटी सामने इंग्लंडनें जिंकले, व ते पुढीलप्रमाणें :

तिसरा कसोटी सामना अॅडेलेड येथें ता. १३, १४, १६, १७, १८ व

१९ रोजीं झाला. इंग्लंडच्या अनुक्रमें ३४१ व ४१२ धांवा झाल्या. ऑस्ट्रेलियाच्या २२२ व १९३ धांवा होऊन ऑस्ट्रेलियाचा ३३८ धांवांनीं पराभव झाला.

चौथा कसोटी सामना ब्रिस्बेन येथें ता. १०, ११, १३, १४, १५ व १६ फेब्रुवारी १९३३ रोजीं झाला. ऑस्ट्रेलियाच्या ३४० व १७५ धांवा झाल्या. इंग्लंडच्या ३५६ व ४ बाद १६२ धांवा होऊन इंग्लंडचा सहा विकेटीनीं जय झाला.

पांचवा कसोटी सामना सिडने येथें होऊन ता. २३, २४, २५, २७ व २८ फेब्रुवारी १९३३ मध्यें झाला. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात ४३५ व १८२ धांवा झाल्या. इंग्लंडच्या ४५२ व दोन बाद १६८ धांवा होऊन इंग्लंडचा ८ विकेटनीं जय झाला. इंग्लंडनें अशा रीतीनें बॉडीलाइन गोलंदाजीचा प्रयोग करून पांचांपैकीं चार सामने जिंकले व अॅशीस परत मिळविल्या.

पण हे तीनहि सामने म्हणजे लारवूडच्या बॉडीलाईन गोलंदाजीचें भीषण प्रात्यक्षिक होते. एका कसोटी सामन्यांत ओल्डफील्ड हा जखमी झाला तर एका सामन्यांत स्वतः कर्णधार वुडफूल याला सणसणीत मार बसला. पॉन्सफोर्डला तर पहिल्याच सामन्यांत इतका मार लागला कीं तो पुढच्या चारहि कसोटी सामन्यांत खेळूं शकला नाहीं. पण डॉननें तशा परिस्थितींतहि बॉडीलाईन गोलंदाजीला तोंड देण्याचें एक तंत्र काढलें व धैर्यानें खेळून या पुढच्या तीनहि कसोटी सामन्यांत ८, ६६, ७६, २४, ४८ आणि ७१ अशा धांवा केल्या. एकंदर सरासरी ५६.५७ धांवा. टीकाकारांनीं टीका केली. डॉन अपेशी ठरला. पण हें अपेश खुद्द डॉन ब्रॅडमनच्या पूर्वीच्या स्टॅंडर्डप्रमाणेंच होतें. अपेशी ठरलेला डॉन तरीहि फलंदाजींत अग्रगण्य होता! इंग्लंडचे सटक्लिफ व हॅमंड यांची सरासरीहि त्याच्या खालीं होती!

बॉडीलाईन गोलंदाजीमुळें क्रिकेटचें खिलाडू स्वरूप जाऊन क्रिकेटच्या मैदानाला एखाद्या रणक्षेत्राचें स्वरूप आलें होतें. दुसऱ्या कसोटी सामन्यापासून दोन्ही संघांतील खेळाडू एकमेकाशीं बोलेनासेहि झाले. डॉन एकदां फलंदाजी करण्यास निघाला. इंग्लिश यष्टिरक्षक लेस्ली एम्स याच्याजवळ आल्यावर तो म्हणाला,

" गुड मॉर्निंग लेस."

" गुड मॉर्निंग डॉन."

त्यानंतर इंग्लिश आणि ऑस्ट्रेलियन खेळाडूंची एकमेकांबरोबरची बातचीत बंद झाली ती इंग्लिश संघाचा हा दौरा संपेपर्यंत कायम होती.

११०९५

## ८ आणखी दोन जागतिक विक्रम !

सन १९३४ मध्यें वुडफूलच्या नेतृत्वाखालीं ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडला गेला. या संघांत वुडफूलशिवाय डॉन ब्रॅडमन, पॉन्सफोर्ड, स्टॅन मॅकेब, ब्राऊन, चिपरफिल्ड, ओरेली, ओल्डफील्ड, डार्लिंग, ग्रिमेट, वॉल आदिकरून खेळाडू होते. या वेळीं 'बॉडीलाईन' गोलंदाजीचें वादळ शमलें होतें. या गोलंदाजीचा कल्पक जार्डाईन निवृत्त झाला होता. आणि अशी गोलंदाजी टाकणारा लारवूड यानेंहि आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम ठोकला होता. जार्डाईनच्या जागीं आतां सिरील वॉल्टर्स हा इंग्लंडचा कर्णधार झाला होता.

इंग्लंडच्या या दौऱ्यांतहि डॉन सन १९३० च्या वैभवानें तळपला. इंग्लंडला जाण्यापूर्वी त्यानें शेफिल्ड शील्ड सामन्यांत ११ डावांत अनुक्रमें २००, १, ७६, नाबाद १८७, ७७, २५३, १२८, ५५, १०१, २२ व ९२ धांवा केल्या होत्या. त्याच्या या सतत पराक्रमामुळें तो इंग्लंडमध्यें गेल्यावर कदाचित् आपल्या १९३० च्या पराक्रमावर ताण करील असें वाटत होतें. तें झालें नाहीं तरी याच दौऱ्यांत त्यानें पुनः एकदां कसोटी सामन्यांत ३०० धावांची मर्यादा ओलांडली.

इंग्लंडमध्यें गेल्यावर डॉननें सन १९३० प्रमाणेंच वुर्सेस्टरविरुद्ध द्विशतक ठोकून आपल्या दौऱ्याचा प्रारंभ केला. त्यानंतर लिसेस्टरशायरविरुद्ध ६५, मिडलसेक्सविरुद्ध १६०, सेरेविरुद्ध ७७ अशा धांवा केल्या.

पहिला कसोटी सामना नॉटिंगहॅम येथें ता. ८, ९, ११ व १२ जून १९३४ रोजीं झाला. हा कसोटी सामना रोमांचकारी झाला. या कसोटी सामन्यांत दोन्ही बाजूनीं एकाचेंहि शतक लागलें नाहीं ! ऑस्ट्रेलियाच्या दोन्ही डावांत अनुक्रमें ३७४ व २७३ धांवा झाल्या व इंग्लंडच्या २६८ व १४१ धांवा होऊन हा सामना ऑस्ट्रेलियानें जिंकला. डॉननें दोन्ही डावांत अनुक्रमें २९ व २५ धांवा केल्या असल्या तरी त्या परिस्थितींत या धांवांचें महत्व होतें. पण या सामन्यांतील दुर्दैवी खेळाडू कोण असेल तर तो ऑस्ट्रेलियाचा चिपर-फिल्ड होय. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत उपहारापर्यंत खेळून त्यानें ९९ धांवा केल्या होत्या. उपहारानंतर आपण शतक पुरें करूं असा त्याला आत्मविश्वास वाटत होता. पहिले दोन चेंडू तो छान खेळला, पण तिसऱ्या चेंडूवर आपला आवडता स्क्वेअरकटचा फटका मारावयास तो गेला आणि त्याचा यष्टिरक्षक एम्स यानें झेल घेतला. चिपरफिल्ड अक्षरशः जड अंतःकरणानें आणि खिन्न मुद्रेनें परतला. एम्स म्हणतो, " चिपरफिल्डचा झेल घेतला नसता तर बरें झालें असतें, असें मला क्षणभर वाटलें." खेळ संपावयास अवघीं दहा मिनिटें असतांना ऑस्ट्रेलियानें हा सामना जिंकला. डॉन लिहितो, " दुसऱ्या डावांत शेवटचा इंग्लिश खेळाडू खेळावयास आला. पंधरा मिनिटें उरलीं होतीं. मी सिलीलेगवर क्षेत्र-रक्षण करीत होतों. माझ्या मनांत विचार आला कीं आतां जर झेल आला व तो माझ्या हातांतून सुटला तर सामना गमाविल्याचा दोष माझ्यावर येईल. माझें डोकें सून्न झालें. साहजिकच सदर खेळाडू जेव्हां एल. बी. डब्ल्यू. बाद झाला, तेव्हां मी अक्षरशः सुटकेचा निश्वास सोडला." या सामन्यांत नवीनच उदयास आलेल्या फार्नेस या इंग्लिश गोलंदाजानें ऑस्ट्रेलियाच्या दोन्ही डावांत मिळून दहा विकेटी घेतल्या. दुर्दैवानें फार्नेस पुढें दुसऱ्या महायुद्धांत मारला गेला.

दुसरा कसोटी सामना हा अक्षरशः हेडले व्हेरिटी या इंग्लिश गोलंदाजाचा

होता. हा सामना लॉर्डस् मैदानावर ता. २२, २३ व २५ जून १९३४ रोजीं झाला. इंग्लंडनें टॉस जिंकून ४४० धांवा केल्या. त्यांत लीलँड व एम्स यांच्या अनुक्रमें १०९ व १२० धांवा होत्या. त्यानंतर दुसऱ्या दिवशीं ऑस्ट्रेलियानें आपल्या पहिल्या डावास सुरुवात केली. पाऊस पडून विकेट दमट झाली होती. तरीहि त्या दिवशीं ऑस्ट्रेलियानें २ बाद १९२ धांवा केल्या होत्या. त्यांत ब्रॅडमनच्या ३६ धांवा होत्या. डॉनला ओलसर विकेटवर खेळतां येत नाहीं, असा एक समज होता. पण त्या दिवशीं त्यानें व्हेरिटीलाहि सतत तीन तास ओलसर विकेटवर तोंड दिलें. व्हेरिटीनें उद्गार काढले, " डॉनला ओलसर विकेटवर खेळतां येत नाहीं, असें कोण म्हणतो ? " पण तिसऱ्या दिवशीं मात्र डॉनची व्हेरिटीनें आल्यावर विकेट घेतली. त्यानंतर बाकीच्या ऑस्ट्रेलियन संघाची वाताहात होऊन सर्व ऑस्ट्रेलियन संघ २८४ धांवांत कोसळला. व्हेरिटीनें ६१ धांवांत ७ विकेटी घेतल्या.

ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव लागलीच सुरू झाला. पण हा दुसरा डावहि व्हेरिटीनें आपल्या अप्रातिम गोलंदाजीनें अवघ्या ११८ धांवांत गुंडाळला. अशा रीतीनें त्या दिवशीं १८ ऑस्ट्रेलियन विकेटी पडल्या व त्यापैकीं १४ विकेटी व्हेरिटीनें घेतल्या होत्या. डॉन म्हणतो, " त्या दिवशीं व्हेरिटीची गोलंदाजी इतकी भेदक आणि अचूक पडत होती कीं, जगांतील कोणताहि संघ त्याला तोंड देऊं शकला नसता. " दुसऱ्या डावांत डॉनच्या फक्त १३ धांवा होत्या.

तिसरा कसोटी सामना मँचेस्टर येथें ता. ६, ७, ९ व १० जुलै १९३४ रोजीं झाला. या सामन्याच्या सुमारास ऑस्ट्रेलियन खेळाडूंत आजाराची साथच आली होती. डॉनला तर घटसर्प ( डिप्थेरिया ) झाला आहे, असें समजून त्याची तपासणी करण्यांत आली. पण सुदैवानें कांहीं गंभीर आजार नाहीं असें आढळून आलें व कसोटी सामन्यांत खेळण्यास तो सिद्ध झाला.

मँचेस्टरचें मैदान फलंदाजांना अनुकूल असून कोरडें ठणठणीत असल्यामुळें तिसरा कसोटी सामना निकाली होणार नाहीं असा अंदाज होता व तो खरा ठरला.

इंग्लंडनें टॉस जिंकून फलंदाजीला सुरुवात केली. वॉल्टर्स आणि सटक्लिफ

यांनीं फलंदाजीस सुरुवात केली. ऑस्ट्रेलियन गोलंदाज प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते, पण विकेट पडत नव्हती. इंग्लिश खेळाडू चिवटपणें प्रतिकार करीत होतें. लोक कंटाळले, वार्ताहरांनींहि असें ठरविलें कीं आतां विकेट न पडतां खेळ असाच रेंगाळणार, आपण बाहेर जाऊन चहा पिऊन यावें. पण क्रिकेटचा खेळ केव्हां आणि कसें वळण घेईल याचा नेम नसतो. आणि तोच अनुभव यावेळीं आला. वार्ताहर बाहेर गेले आणि ओरेलीनें पहिल्याच चेंडूवर वॉल्टर्सची विकेट घेतली. त्यानंतर दुसऱ्या चेंडूवर त्यानें वॅटची दांडी उडविली आणि पुनः चौथ्या चेंडूवर हॅमंडचा त्रिफळा उडविला. पण पुढें हेंड्रेन आणि लीलँड यांनीं अनुक्रमें १३२ व १५३ धांवा करून इंग्लंडचा घसरलेला डाव पुनः सावरला. इंग्लंडची धांवसंख्या ६२७ वर गेली. ऑस्ट्रेलियानें पहिल्या डावांत ४९१ धांवा केल्या. स्टॅन मॅकेबनें सुंदर शतक (१३७) ठोकून आपल्या १९३२ च्या खेळाची पुनः चुणूक दाखविली. पण डॉनच्या अवघ्या ३० धांवा झाल्या. अखेर वेळेच्या अभावी हा सामना अनिर्णित राहिला.

चौथा कसोटी सामना ता. २०, २१, २३ व २४ जुलै १९३४ रोजीं लीड्स येथें झाला.

इंग्लंडनें टॉस जिंकला, पण विकेट चांगली असूनहि पहिल्या दिवशीं ५-३० वाजेपर्यंत इंग्लंडचा डाव फक्त २०० धांवांत आटोपला. ऑस्ट्रेलियानें ब्राऊन व पॉन्सफोर्ड यांना सलामीचें फलंदाज म्हणून पाठविलें. अवघ्या सदतीस धांवा फळ्यावर लागल्या व ब्राऊन बाद झाला. संध्याकाळची वेळ होती, म्हणून डॉनला खेळण्यास न पाठवितां बर्ट ओल्डफिल्डला "रात्रींचा पहारेकरी" म्हणून पाठविण्यांत आलें. पण दोन धांवांची भर पडली नाहीं तोंच ओल्डफिल्ड बाद झाला. त्याची जागा स्वतः कर्णधार वुडफूल यानें घेतली. पण त्याचाहि त्रिफळा उडाला. तीन बाद ३९ धांवा! शेवटीं खेळ संपावयाच्या वेळीं स्वतः डॉन आला. जोडीला अर्थातच पॉन्सफोर्ड हा होता. आणि शुक्रवारी संध्याकाळीं खेळावयास सुरुवात केलेल्या या जोडीनें सारा शनिवार इंग्लिश गोलंदाजांना पिटून काढलें. या दिवशीं त्यांनीं उपहारापर्यंत १४५ मिनिटांत १२९ व उपहारापासून चहाचे वेळेपर्यंत

१२५ मिनिटांत १६१ धांवा केल्या व याच वेगानें त्यांनीं साडेपांच तासांत ३८८ धांवांची भर घालून चौथ्या विकेटवरील धांवांचा जागतिक उच्चांक निर्माण केला. खेळ संपावयास कांहीं वेळ असतांना पॉन्सफोर्ड १८१ धांवांवर बाद झाला. डॉनच्या त्यावेळीं नाबाद २७१ धांवा होत्या. सोमवारी खेळ सुरू झाल्यावर डॉननें त्रिशतक ओलांडले व ३०४ धांवांवर तो बाद झाला. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ५८४ धांवा झाल्या. इंग्लंडनें दुसऱ्या डावांत सहा बाद २२९ धांवा केल्या. पण वेळेच्या अभावी हा सामनाहि अनिर्णितच राहिला.

पांचवा कसोटी सामनाहि डॉन ब्रॅडमन आणि पॉन्सफोर्ड या जोडीनें गाजविला. हा सामना ओव्हल मैदानावर ता. १८, २०, २१ व २२ ऑगष्ट १९३४ रोजीं झाला. ऑस्ट्रेलियान टॉस जिंकला व पॉन्सफोर्ड आणि ब्राऊन या जोडीनें इंग्लंडच्या खेळास सुरुवात केली. पण २१ धांवावर ऑस्ट्रेलियाची पहिली विकेट पडली (ब्राऊन १०) आणि डॉन खेळावयास आला. आणि त्यांनीं लीडस् येथील चौथ्या कसोटी सामन्यांतील पराक्रमाची पुनरावृत्ति केली. पण लीडस्पेक्षांहि त्याच्या धांवांचा वेग अधिक होता. त्यांनीं त्या दिवशीं साडेपांच तासांत ४५१ धांवांची भर घातली! त्या दिवशीं खेळ संपण्याच्या वेळीं डॉन बाद झाला. त्यावेळीं त्याच्या २४४ धांवा झाल्या होत्या. पण पॉन्सफोर्ड व डॉन ब्रॅडमन यांनीं त्या दिवशीं केलेल्या ४५१ धांवा म्हणजे दुसऱ्या विकेटीवरील जागतिक विक्रम होता व तो अद्यापहि कायम आहे. पॉन्सफोर्ड दुसऱ्या दिवशीं २६६ धांवांवर बाद झाला. पॉन्सफोर्डचा हा शेवटचा कसोटी सामना होता. आणि हाब्ज किंवा डॉन यांना न लाभलेलें असें शेवटच्या सामन्यांत शतकच नव्हे तर द्विशतक करण्याचें भाग्य त्यानें संपादन केलें!

पॉन्सफोर्ड बाद झाल्यावर वुडफूल (४९), किपॅक्स (२२), ओल्डफील्ड नाबाद ४२ यांनीं धिम्मेपणानें खेळून धांवांची संख्या ७०१ पर्यंत नेऊन भिडविली. इंग्लंडच्या पहिल्या डावांत ३२१ धांवा झाल्या. त्यांत लीलँडच्या ११० धांवा होत्या. ऑस्ट्रेलियाच्या इंग्लंडपेक्षां ३८० धावा अधिक असूनहि ऑस्ट्रेलियानें पुनः फलंदाजी करून ३२७ धांवा केल्या. त्यांत डॉन (७७) व मॅकेब (७०) यांनीं ९० मिनिटांत १५० धांवा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या सर्व बाद ३२७ धांवा

झाल्या. इंग्लंडच्या दुसऱ्या डावांत ग्रिमटेच्या अपूर्व गोलंदाजीमुळें (६४ धांवांत ५ बाद) फक्त १४५ धांवा होऊन ऑस्ट्रेलियाचा ५६२ धांवांनीं विजय झाला व अशीस परत ऑस्ट्रेलियानें मिळविल्या.

या पांचव्या कसोटी सामन्यांतील दुसऱ्या डावांत इंग्लंडच्या क्लार्कस् या गोलंदाजानें पुनः एकदां बॉडीलाईन गोलंदाजीचा प्रयोग करून पहिला. आणि तो प्रथम यशस्वी होऊन त्याला ब्राऊन व पॉन्सफोर्ड यांच्या विकेटीहि मिळाल्या. पण त्यानंतर डॉन ब्रॅडमन आणि स्टॅन मॅकेब यांनीं तडफदारपणें खेळून त्याची गोलंदाजी फोडून काढली व क्लॉर्कला आपल्या गोलंदाजीचें तंत्र बदलावे लागलें.

या कसोटी सामन्यानंतर डॉन इसेक्स आणि अखिल इंग्लड संघाविरुद्ध खेळला व त्यांत त्यानें अनुक्रमें १४५ व १३२ धांवा केल्या. इंग्लंडच्या या दौऱ्यांत डॉननें २०२० धांवा केल्या. सन १९३० च्या दौऱ्यांत त्यानें २९६० धांवा केल्या होत्या. पण त्याकरितां तो २७ सामन्यांतील ३६ डावांत खेळला होता. पण १९३४ मध्यें आजारीपणामुळें तो २२ सामन्यांतील २७ डावांत खेळला. म्हणजे सन १९३४ मध्येंहि त्याची जवळजवळ १९३० चीच तडफ कायम होती.

ऑस्ट्रेलियन संघाचा इंग्लंडमधील दौरा संपत आला व परत ऑस्ट्रेलियाला जाण्याकरितां हा संघ लंडन येथें येऊन दाखल झाला. आणि तेवढ्यांत डॉन आजारी झाला. डॉन ठरल्याप्रमाणें आपल्या एका बालमित्राकडे चहासाठीं गेला होता. तेथेंच त्याचा आजार वाढला व डॉक्टरांना बोलवावें लागलें. डॉक्टरांनीं प्रख्यात ऑस्ट्रेलियन सर्जन सर डग्लस शिल्ड यांचा सल्ला घ्यावा असें सुचविलें. त्यांनीं ॲपेन्डीसायटीस आहे असें सांगून शस्त्रक्रिया केली पाहिजे असें सांगितलें. डॉनचें सहकारी टीम वॉल आणि ऑर्थर चिपरफिल्ड यांनीं घाईघाईनें डॉनचें सामानसुमान आवरून त्याला शिल्ड यांच्या इस्पितळांत पोहोंचविलें आणि त्याच्या बाकीच्या सहकाऱ्यांना कळण्यापूर्वी त्याच्यावर शस्त्रक्रियाहि करण्यांत आली. डॉनची पत्नी जेसी हिला पुढील विद्युत्संदेश पाठविण्यांत आला:

"सर डग्लस शिल्ड यांच्या इस्पितळांत डॉन ब्रॅडमन याच्यावर ॲपेन्डिसायटीसच्या विकारावर शस्त्रक्रिया करण्यांत आली."

तिला असेंहि कळविण्यांत आलें कीं, शस्त्रक्रिया समाधानकारक पार पडली असली तरी त्याची प्रकृति काळजी करण्यासारखी आहे.

हा संदेश आल्यावर प्रख्यात वैमानिक सर चार्लस किंग्जफर्ड स्मिथ यानें जेसीला ताबडतोब विमानांतून लंडनला नेण्याची तयारी दाखविली. जेसी सिडनेहून लंडनला जाण्यासाठीं मेलबोर्न येथें आलीहि. तेवढ्यांत "डॉनचें देहावसान झालें," अशीहि बातमी तिच्या कानांवर आली. जेसीच्या मनाची यावेळीं काय अवस्था झाली असेल याची कल्पनाच केलली बरी. पण तरीहि धीर करून लंडनला जाण्याचें तिन ठरविलें. वाटेंत तिला कळलें कीं डॉन हयात असून त्याची प्रकृति समाधानकारकपणें सुधारत आहे. जेसी लंडनला जाऊन पोहोंचली आणि त्यापूर्वीं एकच दिवस डॉनला इस्पितळांतून मुक्त करण्यांत आले होते. डॉनला या आजारांतून बरे होण्यास तीन महिने लागले डॉनचा हा आजार काळजीचा होता, पण एका दृष्टीनें तो पथ्यावर पडला. दगदगीच्या क्रिकेटवर तो एक उताराच होता. त्याला सक्ताची विश्रांति मिळाली होती.

इंग्लंडमध्यें डॉन व जेसी यांनीं अनेक स्थळें पाहिली. त्याकरितां एक खास मोटार त्यांच्या तैनातीस देण्यांत आली होती. लंडन येथें त्यांना एक मजेदार अनुभव आला. त्यांना जॉन् बर्नस या नांवाचा एक वाटाड्या देण्यांत आला होता. हाच वाटाड्या पुढें ब्रिटिश मंत्रिमंडळांत एक मंत्री झाला!

● ● ●

# ९ डॉनच्या नेतृत्वानें यश !

सन १९३४ च्या शेवटीं डॉन इंग्लंडहून आपल्या पत्नीसह परत ऑस्ट्रेलियांत आला. आतांपर्यंत डान सिडने येथें असून न्यू साऊथ वेल्सकडून खेळत असे. पण इंग्लंडहून परत आल्यावर त्यानें धंद्यानिमित्त द. ऑस्ट्रेलियांत स्थलांतर केलें व तो ॲडेलेड येथें राहवयास गेला. मध्यंतरी १९३४-३५ मध्यें ऑस्ट्रेलियन संघाचा द. आफ्रिकेंत दौरा झाला. डॉन प्रकृतिस्वास्थ्याभावीं द. आफ्रिकेंत गेला नाहीं. पण डॉनच्या गैरहजेरींत मॅकेब, फिंग्लटन, ओरेली, वगैरे ऑस्ट्रेलियन खेळाडूंनीं उत्तम खेळून पांच कसोटी सामन्यांपैकीं चार सामने जिंकले व एक अनिर्णित ठेवला.

क्रिकेटमधील विश्रांतीचा हा काळ डॉननें ॲडेलेड येथें आपला जम बसाविण्यांत घालविला. ब्रॅडमन पतीपत्नीला हाच काळ काय तो जास्तींत जास्त सहवासाचा गेला. तसें पाहिलें तर डॉन व जेसी यांना परस्परांविषयीं अतिशय ओढ असे. जेसी म्हणे, "डॉनसारखा नवरा मिळायला भाग्य लागते. तो अगदीं आदर्श नवरा आहे. त्याला काय वाटेल तें करून खायला घाला. खायची त्याची तयारी असते. तो अगदीं बेफिकीर आहे. उद्यां कसोटी सामना म्हणून त्याला झोंप येत नाहीं असें कधींच होत नाहीं." डॉनलाहि आपल्या पत्नीचें खूप कौतुक वाटे, "जेसी म्हणजे माझी स्फूर्तिदेवता" असें तो नेहमीं अभिमानानें सांगतो. फुलबागेंत हंसतमुखानें उभ्या राहिलेल्या जेसीचा फोटो हा त्याचा आवडता फोटो आहे.

सन १९३६ च्या शेवटीं शेफिल्ड शील्ड सामने सुरू झाले. डॉन आतां

द. ऑस्ट्रेलियाचा रहिवाशी होता आणि द. ऑस्ट्रेलियाचा पहिलाच सामना न्यू साऊथ वेल्सशी झाला. या सामन्यांत डॉननें ११७ धांवा केल्या. पण त्याकरितां डॉनला खूप ताण पडला नेहमीं दोन आणि चारचे फटके मारणाऱ्या डॉननें या सामन्यांत एकेक धांवाच जास्त प्रमाणांत घेतल्या.

पण पुढच्याच क्विन्सलँडबरोबरच्या सामन्यांत डॉन पुनः पूर्वीच्या फॉर्मात आला व त्यानें २३३ धावा केल्या. व्हिक्टोरियाबरोबरच्या सामन्यांत तर त्यानें द. ऑस्ट्रेलियाच्या एकंदर ५६९ धांवांपैकीं ३५७ धांवा केल्या.

डॉन शेफिल्ड शील्ड सामन्यांपैकीं शेवटचा सामना तास्मानियाबरोबर खेळला व त्यांत त्यानें अक्षरशः फटक्यांची आतषबाजी करून ३६९ धांवा केल्या. यावेळीं डॉनच्या धांवांचा वेग पुढीलप्रमाणें होताः

४० मिनिटांत पहिल्या ५० धांवा
३० मिनिटांत दुसऱ्या ५० धांवा
२६ मिनिटांत तिसऱ्या ५० धांवा
४७ मिनिटांत चौथ्या ५० धांवा
२१ मिनिटांत पांचव्या ५० धांवा
१९ मिनिटांत सहाव्या ५० धांवा
२९ मिनिटांत सातव्या ५० धांवा
फक्त ११ मिनिटांत शेवटच्या १९ धांवा
एकूण २३३ मिनिटांत ३६९ धांवा

शेफिल्ड शील्ड सामने चालू असतांच गब्बी ॲलन याच्या नेतृत्वाखालीं इंग्लिश संघ आस्ट्रेलियांत येऊन दाखल झाला.

या संघांत ॲलनशिवाय हॅमंड, लीलँड, एम्स, हार्डस्टाफ, व्हेरिटी, सिम्स, रॉबीन्स, होस आदिकरून खेळाडू होते. ज्या दिवशीं हा संघ ॲडेलेड येथें दाखल झाला, त्याच दिवशीं डॉनची पत्नी प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. डॉनला पितृपद लाभलें ही बातमी वाऱ्याप्रमाणें पसरली व त्याच्यावर शेकडों अभिनंदन संदेशांचा वर्षाव झाला. इंग्लिश संघाच्या स्वागतार्थ जो समारंभ ठेविला होता, त्यांतहि या घटनेचा उल्लेख करण्यांत आला व डॉनचें

अभिनदन करण्यांत आलें. पण डॉनला हें अभिनंदन स्वीकारतांना मानसिक वेदना होत होत्या. कारण डॉक्टरनीं सांगितलें होतें कीं हें मूल जगणार नाहीं. डॉनला डॉक्टरांचा हा इषारा जाहीर करण्याचें धैर्य झालें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं डॉनला दवाखान्यांत बोलावून घेऊन मूल मरण पावल्याचें वृत्त त्याच्या कानांवर घालण्यांत आलें. तरुण मातापित्याच्या जीवनांतील दारूण दुःखाचा पहिलाच मोटा अनुभव ब्रॅडमन पतीपत्नींना मिळाला. डॉन या प्रसंगाला उद्देशून लिहितो, " बापाच्या आपल्या मुलाविषयींच्या उदात्त आकांक्षा आणि आईचें नितांत प्रेम यांची इतिश्री झाली. " डॉननें हें व्यक्तिगत दुःख आवरलं आणि इंग्लंडबरोबरच्या आगामी कसोटी सामन्यांत खेळण्यांची सिद्धता केली. त्यांतच वुडफूल त्यावर्षीं आंतरराष्ट्रीय कसोटी सामन्यांतून निवृत्त झाल्यामुळें ऑस्ट्रेलियन संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी डॉनवर टाकण्यांत आली.

सन १९३६ मध्यें ऑस्ट्रेलियाला गेलेला हा इंग्लिश संघ समतोल होता. पण उणीव होती ती हर्बर्ट सटक्लिफची. त्याला या संघांतून कां गाळले हें एक गूढच होते. याउलट डॉन ब्रॅडमन हाच ऑस्ट्रेलियन फलंदाजीचा मुख्य आधारस्तंभ होता. पण त्याच्यावर कर्णधारपदाची जबाबदारी पडल्यामुळें त्याचा खेळ कसा काय होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिलें होते. लोकांना विचार पडला कीं कर्णधार ब्रॅडमन हा फलंदाज ब्रॅडमनच्या मार्गांत येणार कीं काय ?

पहिला कसोटी सामना ब्रिस्बेन येथें ता. ४, ५, ७, ८ व ९ डिसेंबर १९३६ रोजीं झाला. डॉनच्या पत्नीनें त्याला टॉस करण्याकरितां " लकी " चार पेन्सचें नाणें दिलें होतें. पण हें लकी नाणें कांहीं उपयोगी पडलें नाहीं. डॉन टॉस हरला व इंग्लंडचा कर्णधार गबी ॲलन यानें फलंदाजी पत्करली.

इंग्लंडची सुरुवात गचाळ झाली. पहिली विकेट ० धांवावर, दुसरी २० वर पडली, आणि वीसवरच हॅमंड ( ० ) बाद होऊन तीन बाद २० धांवा असा आंकडा झळकला. पण त्यानंतर लीलँड यानें तडफदार खेळून १२६ धांवा केल्या व त्याला बार्नेट, एम्स, रॉबिन्स, हार्डस्टाफ, ॲलन या खेळाडूनीं योग्य साथ देऊन धांवसंख्या ३५८ वर नेली. इंग्लंडनंतर ऑस्ट्रेलियाचा डाव

दुसऱ्या दिवशीं सुरू झाला. पण आदल्या रात्रीं पाऊस पडल्यामुळें ऑस्ट्रेलियाचा डाव २३४ धांवांत आटोपला. यापैकीं फिंग्लटन १००, डॉन ब्रॅडमन ३८ व मॅकेब ५१ अशा धांवा होत्या. इंग्लंडचा गोलंदाज होस यानें ४१ धांवांत ६ खेळाडू बाद केले.

त्यानंतर इंग्लंडचा दुसरा डाव होऊन इंग्लंडच्या २५६ धांवा झाल्या. ऑस्ट्रेलियाच्या दुर्दैवानें पुनः रात्रीं पाऊस पडून विकेट दमट झाली व ॲलन आणि होस या गोलंदाजांनीं सर्व ऑस्ट्रेलियन संघ अवघ्या ५८ धांवांत गुंडाळला व ऑस्ट्रेलियाचा ३२२ धांवांनीं पराभव झाला. दुसऱ्या डावांत तर डॉन शून्यावर बाद झाला.

या दणदणीत पराभवामुळें संघाच्या निवडीबद्दल खूप टीका झाली. विशेषतः डॉनला कर्णधार केलें यावर टीकेचा रोख होता.

दुसरा कसोटी सामना सिडने येथें ता. १८, १९, २१, २३ डिसेंबर १९३६ रोजीं झाला. या सामन्यातहि डॉननें जेसीनें दिलेलें 'लकी' नाणें टॉसकरितां वापरलें, तरीहि तो टॉस हरला. इंग्लंडनें फलंदाजी घेतली. या सामन्यांत इंग्लंडचा वाल्टर हॅमंड यानें बहारीनें खेळून २३१ धांवा केल्या. इंग्लंडचा खेळ दुसऱ्या दिवशींहि चालू झाला पण पाऊस पडल्याचा फायदा घेऊन इंग्लंडचा कर्णधार ॲलन यानें ६ बाद ४२६ धांवांवर आपला पहिला डाव पुरा झाल्याचें जाहीर केलें. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत फक्त ८० धावा झाल्या. आणि गंमत ही कीं ऑस्ट्रेलियाचे मोठमोठे फलंदाज कोसळले असतांना ओरेली या गोलंदाजानें धिम्मेपणानें खेळून नाबाद ३७ धांवा केल्या! डॉन ० धांवांवर बाद झाला. ऑस्ट्रेलियाला परत खेळण्यास लावण्यात आलें. यावेळीं डॉन (८२), मॅकेब (९३) व फिंग्लटन (७३) हे ऑस्ट्रेलियाचे खेळाडू हिंमतीनें खेळले. ऑस्ट्रेलियाच्या ३२४ धांवा झाल्या व एक डाव आणि २२ धांवांनीं पराभव खावा लागला.

लागोपाठ दोन सामने हरल्यामुळें डॉनवर चौफेर हल्ले सुरू झाले. डॉनला नेतृत्वपदावरून दूर करून रिचर्डसनला कर्णधार करावें अशी मागणी करण्यांत येऊं लागली. पण निवड समिति खंबीर राहिली. डॉनचें नेतृत्व कायम राहिलें.

दोन कसोटी सामन्यांत पराभव झाला होता. अशा स्थितींत ऑस्ट्रेलियाला ॲशीस आपल्याकडे राखण्यासाठीं पुढचे तीन सामने जिंकणें अवश्य होतें. निदान दोन सामने जिंकून एक अनिर्णित राखणें भाग होतें. सर्वांना ही गोष्ट अशक्यप्राय वाटत होती. इंग्लंड यावेळीं ॲशीस परत नेणार असें वाटत होतें.

तिसरा सामना मेलबोर्नच्या क्रीडांगणावर ता. १, २, ४, ५, ६ व ७ जानेवारी १९३७ रोजीं झाला. तुफान गर्दी जमली होती. डॉननें टॉस जिंकला व फलंदाजी पत्करली. पण विकेट ठणठणीत असूनहि भराभर विकेटी पडूं लागल्या. पहिली विकेट ७ वर पडली, दुसरी ३३ वर पडली, तिसरी ६९ वर पडली. डॉन ब्रॅडमन १३ वर बाद झाला. चौथी विकेट ७९ वर पडली. त्यानंतर फिंग्लटन आणि मॅकेब यांनीं चिकाटीनें खेळून धांवांची संख्या १२२ वर नेली व पांचवी विकेट पडली. सहावी विकेट १३८ वर पडली. त्यानंतर पाऊस पडला व खेळ थांबवावा लागला. दुसऱ्या दिवशीं ९ बाद २०० धांवा झाल्यावर डॉननें आपला खेळ थांबविला.

इंग्लंडचा पहिला डाव सुरू झाला. इंग्लंडला आपण जय मिळविण्याइतक्या धांवा सहज गोळा करू असें वाटत होते. विशेषतः त्या दमट विकेटवर हॅमंड छान खेळत होता. आणि त्याला लीलँड उत्तम साथ करीत होता. पण ऑस्ट्रेलियाचा डार्लिंग याने ओरेलीच्या गोलंदाजीवर अद्भुत झेल घेतला व सामन्याला निराळें वळण लागलें. डार्लिंगनें हॅमंडचाहि सिव्हर्सच्या गोलंदाजीवर प्रेक्षणीय झेल घेतला. हॅमंडनंतर बाकीचे इंग्लिश खेळाडूहि भराभर बाद होऊं लागलें. जवळजवळ स्मशानयात्राच सुरू झाली. ४ बाद ६८, ५ बाद ७१, ६ बाद ७१, ७ बाद ७६, ८ बाद ७६, ९ बाद ७६, ॲलननें आपला डाव पुरा केल्याचें जाहीर केलें. विकेटची त्यावेळची परिस्थिति लक्षांत घेतां, ॲलननें त्यापूर्वी लौकर आपला डाव पुरा न करण्यांत चूक केली होती.

डॉननें दुसऱ्या डावाच्या सुरुवातीला नेहमींच आघाडीची जोडी न पाठवितां फ्लिटवूड स्मिथ आणि ओरेली या गोलंदाजांना पाठविलें. त्या गोलंदाजांनाहि आश्चर्याचा धक्का बसला. आणि ओरेली पहिल्याच चेंडूवर बाद झाल्यामुळें डॉनचा बेत ढांसळणार असें वाटूं लागलें पण नंतर वॉर्ड या खेळाडूनें

दमदार खेळून विकेट दिली नाहीं. तिसरे दिवशीं ऑस्ट्रेलियाच्या ५ बाद ९७ धांवा झाल्या असतांना डॉन ब्रॅडमन फिंग्लटनच्या जोडीला खेळावयास गेला आणि पुनः एकदां डॉन ब्रॅडमननें आपल्या फलंदाजीची रोमांचकारी तडफ दाखवून दिली. त्यानें फिंग्लटनच्या मदतीनें सहाव्या विकेटवर ३४६ धांवांचा उच्चांक केला. चौथ्या दिवशीं डॉन २७० धांवा काढून व फिंग्लटन १३६ धांवा काढून बाद झाला. ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावांत ५६४ धांवा झाल्या.

इंग्लडला सामना जिंकण्याकरितां ६८९ धांवा पाहिजे होत्या. पण इंग्लिश संघ ३२३ धांवांत आटोपला व ऑस्ट्रेलियानें हा कसोटी सामना ३६५ धांवांनीं जिंकला.

हा रोमांचकारी सामना ३५०,००० लोकांनीं पाहिला. एके दिवशीं तर तो पाहण्यास ८८ हजार लोक होते. या एकाच सामन्याचें उत्पन्न २९६६७ पौंड ( ४५५००५ रुपये ) झालें !

चौथा कसोटी सामना ॲडेलेड येथें ता. २९, ३० जानेवारी व १, २, ३ व ४ फेब्रुवारी १९३७ रोजीं झाला. या सामन्यालाहि विलक्षण रंग चढला.

डॉननें टॉस जिंकला. पण पहिल्या डावांत ऑस्ट्रेलियाला त्याचा फायदा घेतां आला नाहीं. ऑस्ट्रेलियाच्या २८८ धांवा झाल्या. त्यांत डॉनच्या २६ धांवा होत्या. इंग्लंडनें पहिल्या डावांत ३३० धांवा केल्या. त्यांत बार्नेटनें सुंदर शतक झळकाविलें. ऑस्ट्रेलियाचा पराभव होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं.

पण पुनः एकदां डॉन ब्रॅडमननें आपल्या वैयक्तिक फलंदाजीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाला पराभवाच्या धास्तींतून बाहेर काढलें. इतकेंच नव्हे तर विजय मिळवून दिला. त्यानें २१२ धांवा केल्या. ऑस्ट्रेलियन संघाच्या ४३३ धांवा झाल्या. डॉनचा हा खेळ त्याच्या मानानें मंदगति होता. त्यानें त्याकरितां ४३७ मिनिटें घेतलीं ( अर्थात् आजच्या आक्रमक खेळापेक्षांहि डॉनचा हा खेळ अधिक वेगाचा होता ). दुसऱ्या डावांत हॅमंड व लीलँड ही जोडी चांगली खेळत होती. ऑस्ट्रेलियाची आशा मावळत चालली होती. डॉननें आपल्या फिलटवूड स्मिथ या गोलंदाजाजवळ जाऊन म्हटलें, “ पहा मित्रा, सामना तुमच्या हातांत आहे.” स्मिथनें मनावर घेतलें आणि एक उत्कृष्ट चेंडू टाकून चांगलाच जम बसलेल्या

हॅमंडचा त्रिफळा उडविला. खेळाचा रंग बदलला. इंग्लंडचा दुसरा डाव २४३ धांवांत आटोपला व ऑस्ट्रेलियाचा १४८ धांवांनीं जय झाला.

पांचवा कसोटी सामना २६, २७ फेब्रुवारी व १, २ व ३ मार्च १९३७ रोजीं मेलबोर्न येथें झाला. यावेळींहि डॉननें टॉस जिंकला. हा सामना जिंकण्यास ऑस्ट्रेलियाला अडचण पडली नाहीं. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ६०४ धांवा झाल्या. दुसरी विकेट पडली तेव्हां ऑस्ट्रेलियाच्या फक्त ५४ धांवा झाल्या होत्या. पण त्यानंतर डॉन ब्रॅडमन (१६९) व स्टॅन मॅकेब (११२) यांनीं तिसऱ्या विकेटवर २४९ धांवांची भर घालून धांवांचा आंकडा ३०३ वर नेला. डॉननें फक्त साडेतीन तासांत या धांवा केल्या. बॅडकॉक यानेंहि ११८ धांवा केल्या.

इंग्लंडच्या पहिल्या व दुसऱ्या डावांत अनुक्रमें २३९ व १६५ धांवा झाल्या आणि ऑस्ट्रेलियानें सामना एक डाव व २०० धांवांनीं जिंकला.

कसोटी सामने संपल्यावर डॉन शेफिल्ड शील्डपैकीं कांहीं सामन्यांत खेळला व त्यांत त्यानें १९२, १२३, नाबाद २४, ३८, ३१, ८ अशा धांवा केल्या.

अशा रीतीनें पहिलें दोन कसोटी सामने हरले असतांहि डॉनच्या नेतृत्वाखालीं शेवटचे तीन सामने जिंकण्याचा ऑस्ट्रेलियानें हा अपूर्व पराक्रम केला होता. या यशामुळें डॉनची लोकप्रियता इतकी वाढली कीं, त्याला ठिकठिकाणाहून नोकरीकरितां आमंत्रणें आलीं. द. आफ्रिकेनें तर त्याला साप्ताहिक एक हजार डॉलर पगार देऊन शिवाय ब्रॅडमन दांपत्याचा प्रवासखर्च देण्याचीहि तयारी दर्शविली. पण डॉनचा आपल्याच देशाकरितां खेळावयाचें हा निर्धार असल्यामुळें त्यानें साभार नकार दिला.



डॉनचा 'लेट-कट' चा फटका आकर्षक असे.



प्रचंड धांवसंख्या करणाऱ्या डॉनचा शून्यावर असा त्रिफळाहि उडे !

## १० डॉनचा उच्चांक मोडला !

सन १९३७-३८ च्या क्रिकेट मोसमाचीहि डॉननें दणकेबाज सुरुवात केली. न्यू साऊथ वेल्सविरुद्ध त्यानें ९१ व ६२ धांवा केल्या. त्यानंतर त्यानें क्विन्सलँडविरूद्ध नाबाद २४६ धांवा केल्या ! डॉनच्या इतर शेफिल्ड साम-न्यांतील धांवा पुढीलप्रमाणें होत्याः ३९, ५४, ३५, १०७, ११३, नाबाद ४४, १०४, ३, ८५, १७, १०१, ११, ७९, १४४ व १०२.

ता. २५ फेब्रुवारी १९३८ रोजीं ऑस्ट्रेलियन संघ डॉनच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडला जाण्याकरितां निघाला. या संघांत फिंग्लटन, ब्राऊन, मॅकेब, हॅसेट, वॉर्ड, बार्नेट, बॅडकॉक, ओरेली, मॅकॉर्मिक, फ्लिटवूड स्मिथ इत्यादि खेळाडू होते. यावेळीं आंतराष्ट्रीय वातावरण तंग झालें होतें. आगामी महायुद्धाची छाया सर्वत्र दिसत होती. ऑस्ट्रेलियन संघ नेपल्स येथें जाऊन पोहोंचल्यावर डॉननें आपल्या एका मित्राला कळविलें, " आमच्या बोटीच्या डेकवरून आम्ही ३३ विनाशिका, ८ युद्धनौका आणि ७२ पाणबुड्या मोजल्या. मला वाटतें, पाण्यांत गजून जाण्याकरितां कांहीं त्या बांधण्यांत आलेल्या नाहींत."

या ऑस्ट्रेलियन संघाबरोबर डॉ. रोलँड पोप होता. पोप हा क्रिकेटचा वेडा होता. ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडला किंवा इतरत्र कोठें हे जायला निघो, ही स्वारी संघाबरोबर स्वतःच्या खर्चानें जात असे. जातांना तो पदरचे पैसे खर्च करून भारी किंमतीचीं औषधें बरोबर घेत असे. तसेंच खास खेळाडूंसाठीं पुस्तकांचा भला मोठा गठ्ठाहि बरोबर घेई. याशिवाय सामन्याच्या काळांत तो खेळाडूंना भरपूर फळफळावळांचाहि पुरवठा करी.

इंग्लंडमध्यें ऑस्ट्रेलियनांचा पहिला सामना वुर्सेस्टरशी झाला व यावेळीं डॉननें सन १९३० व १९३४ प्रमाणें या संघाविरूद्ध द्विशतक (२५८) ठोकलें. त्यानंतर केंब्रिज विद्यापीठाविरुद्ध १३७ धांवा करून त्यानें एम. सी. सी. विरुद्ध २७८ धांवा झळकाविल्या, पुढील सरेविरुद्धच्या व हॅम्पशायर विरुद्धच्या सामन्यांतहि त्यानें अनुक्रमें १४३ व नाबाद १४५ धांवा केल्या.

मिडलसेक्सबरोबरच्या सामन्यांत डॉनच्या ५ व नाबाद ३० धांवा झाल्या. या सामन्यांच्या वेळीं एम. सी. सी. तर्फे लॉर्डस मैदानावर ऑस्ट्रेलियन संघाला मेजवानी देण्यांत आली. यावेळीं डॉननें कर्णधार या नात्यानें सुंदर व समयोचित भाषण केलें. परदेशी जाणाऱ्या संघाच्या कर्णधारानें आपल्या राष्ट्राच्या वकिलाची जबाबदारी पार पाडली पाहिजे असें डॉनचें मत आहे व त्याचाच अनुभव त्यानें यावेळीं दिला. या मेजवानीचे वेळीं ब्रिटनचे माजी पंतप्रधान मि. स्टॅन्ले बाल्डवीन हे मुख्य पाहुणे होते. ते आपल्या विनोदी भाषणांत म्हणाले, "मी तरुण असतांना लोहार होण्याची माझी महत्वाकांक्षा होती." उत्तरादाखल भाषण करतांना डॉन म्हणाला, "माझीहि लहानपणी रंगारी होण्याची महत्वाकांक्षा होती. आपल्या दोघांच्याहि महत्वाकांक्षा अशा रीतीनें अमूर्त राहिल्या आहेत. पण मला वाटतें आपली महत्वाकांक्षा साध्य झाली नाहीं म्हणून माझ्याप्रमाणें तुम्हांलाहि आतां वाईट वाटत नसावें."

नॉर्थम्पटनशायर येथें ऑस्ट्रेलियन संघाचें यावेळीं वेगळ्याच रीतीन स्वागत करण्यांत आलें. मुलींचा बँड लावून संघाला स्टेशनपासून मुक्कामापर्यंत मिरवणुकीनें नेण्यांत आलें!

पहिला कसोटी सामना ता. १०, ११, १३ व १४ जून १९३८ रोजीं नॉटिंगहॅम येथें झाला. इंग्लिश संघाचा कर्णधार हॅमंड हा होता.

या सामन्यांत प्रथमच खेळत असलेला लेन हटन आणि बार्नेट यांनीं सुरुवात उत्तम करून पहिल्या विकेटवर २१९ धांवा केल्या. हटननें पहिल्याच कसोटी सामन्यांत शतक झळकविण्याचा पराक्रम केला पण त्यापेक्षांहि विशेष आकर्षण म्हणजे बार्नेटची फलंदाजी. त्यानें चमकदार खेळून उपहारापूर्वी ९९ धांवा केल्या. उपहारापूर्वी शतकें झळकविण्याचा मान आतांपर्यंत फक्त ऑस्ट्रेलियन

खेळाडूंनींच मिळविला होता. बार्नेटचा हा मान फक्त एका धांवेनें हुकला. लेन हटननंतर डेनिस कॉम्प्टन यानेंहि आपल्या या पहिल्याच कसोटी सामन्यांत शतक झळकाविण्याचा मान संपादन केला व पेंटर या खेळाडूनें नाबाद २१६ धांवा केल्या. इंग्लिश संघाचा पहिला डाव ६५८ धांवांवर पुरा झाल्याचें जाहीर करण्यांत आले.

यानंतर ऑस्ट्रेलियन खेळले व त्यांनीं ४११ धांवा केल्या. स्टॅन मॅकेब यानें पुनः आपल्या आयुष्यांतील संस्मरणीय खेळ खेळून चार तासांत २३२ धांवा केल्या. एकदां तर लागोपाठ तीन ओव्हरींत त्यानें ४४ धांवा केल्या. डॉन-च्या या डावांत ५१ धांवा झाल्या. ऑस्ट्रेलियाला पुन परत खेळण्याची पाळी आली. पण ब्राऊन १३३ आणि डॉन ब्रॅडमन १४४ यानीं दुसऱ्या विकेटवर १७० धांवा केल्या व ऑस्टेलियाला पराभवांतून निभावून नेले. ब्रॅडमनला या १४४ धांवा करण्यास सहा तास लागले. पण रॉय वेबरनें नमूद केल्याप्रमाणें त्या परिस्थितींत त्याच प्रकारच्या खेळाची आवश्यकता होती. दुसऱ्या डावांत ऑस्ट्रेलियाच्या सहा बाद ४२७ धांवा झाल्या व सामना अनिर्णित राहिला.

या सामन्यांतील एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे फ्रॅंक चेस्टर या अंपायरनें दिलेला एक निर्णय. क्रिकेटच्या इतिहासांत हा निर्णय गाजलेला आहे. पहिल्या डावांत डॉनच्या ५१ धांवा झाल्या असताना चेस्टरनें त्याला झेलबाद दिलें यावेळीं सिनफिल्ड हा गोलंदाजी करीत होता. लेस्ली एम्स हा यष्टीरक्षक होता. सिनफिल्डनें टाकलेला एक चेंडू ऑफकडून वळला. या चेंडूचा ब्रॅडमनच्या बॅटीला कळत न कळत स्पर्श झाला व नंतर तो ब्रॅडमनच्या पॅडला लागून स्टंपवरून गेला आणि एम्सने तो झेलला. डॉनची त्रेधा [illegible], त्याचा तोल गेला व तेवढ्यांत एम्सनें बेल्स उडवून गोलंदाजाच्या बाजूला [illegible] असलेल्या चेस्टरकडे अपील केलें, काहीं ना वाटलें कीं एल. बी डब्ल्यू करिता हें अपील आहे, तर काहींना वाटलें कीं एम्सनें ब्रॅडमनला "स्टंपड" [illegible] आहे. पण चेस्टरनें शांतपण झेलबाद असा निर्णय दिला डॉन लिहितो, "[illegible] आश्चर्यकारक असा हा निकाल होता. चेस्टर हा जगांतील सर्वश्रेष्ठ अंपायर आहे, अशी त्यामुळें माझी खात्री झाली डॉनचा झेल गेल्यानें स्वतः ते [illegible] यांच्याशिवाय इतर कोणीच पाहिलें नव्हतें."

दुसरा कसोटी सामना ता. २४, २५, २७ व २८ जून १९३८ रोजीं लॉर्डस मैदानावर झाला. इंग्लंडच्या दोन्ही डावांत अनुक्रमें ४९४ व २४२ धांवा असून त्यापैकीं हॅमंडच्या पहिल्या डावांतील २४० धांवा हें आकर्षण होतें ऑस्ट्रेलियानें दोन्ही डावांत अनुक्रमें ४२२ व सहा बाद २०४ धांवा केल्या. पहिल्या डावांत ब्राऊननें नाबाद २०६ धांवा केल्या, तर दुसऱ्या डावांत डॉन ब्रॅडमननें नाबाद १०२ धांवा केल्या. हा सामनाहि अनिर्णित झाला.

मँचेस्टरचा तिसरा कसोटी सामना पावसामुळें होऊंच शकला नाहीं.

चौथा कसोटी सामना लीडस येथें ता. २२, २३ व २५ जुलै १९३८ रोजीं झाला. हा सामना अत्यंत खळबळीचा झाला व शेवटपर्यंत त्याचा निकाल झोंके खात होता. लीडसचें मैदान आतांपर्यंत डॉनला फलदायी ठरलें होतें. याच मैदानावर त्यानें १९३० मध्यें ३३४ व १९३४ मध्यें ३०४ धांवा केल्या होत्या. पण आतां अनुभव उलटा येणार असें वाटूं लागलें

या सामन्यांत इंग्लंडनें टॉस जिंकला व फलंदाजी घेतली. पण ओरेलीनें गोलंदाजीची कमाल करून २२३ धांवांत सर्व इंग्लिश संघ संपाविला. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत २४२ धांवा झाल्या. त्यापैकीं डॉनच्या नाबाद १०३ धांवा होत्या. दुसऱ्या डावांत पुनः ओरेलीनें उत्कृष्ट गोलंदाजी टाकून १२३ धांवात इंग्लिश संघाचा खुर्दा केला. त्यानें इंग्लंडच्या दोन्ही डावांत १२२ धांवा देऊन १० विकेटी घेतल्या.

ऑस्ट्रेलियाला सामना जिंकण्याकरितां फक्त १०६ धांवा पाहिजे होत्या. पण पाऊस पडण्याचीं चिन्हें दिसत होतीं आणि विकेटी भराभर पडत होत्या. पहिली १७ वर पडली. दुसरी ३२ वर पडली, तिसरी ५० वर, चौथी ६१ वर, पांचवी ९१ वर पडली. डॉन ब्रॅडमन फक्त १६ धांवावर बाद झाला होता. ऑस्ट्रेलियन खेळाडू अत्यंत अस्वस्थ झाले होते. ओरेली पॅड बांधून बसला होता, पण आपणांस खेळण्यास जाण्याची पाळी न येवो, असा तो धांवा करीत होता. डॉनला नको तो खेळ पाहणें असें झाले होतें. आणि ऑस्ट्रेलियन संघाचा मॅनेजर खेळ पाहणें अशक्य होऊन बाहेर गेला होता. प्रेक्षक डोळ्याचें पातेंहि लवूं न देतां खेळ पाहात होतें आणि

क्रीडांगणाबाहेरहि लोकांचा मोठा जमाव जमला होता. अखेर हॅसेटनें अप्रतिम टोलेबाजी करून ऑस्ट्रेलियाला सामना जिंकून दिला. हॅसेटनें यावेळीं ३३ धांवा काढल्या, पण त्या अत्यंत मोलाच्या होत्या. ॲशीस हरण्याची भीति-नाहिशी झाली. हा अपूर्व विजय साजरा करण्याकरितां आस्ट्रेलियन संघानें त्या दिवशीं खाजगी मेजवानीचा कार्यक्रम केला. डॉन म्हणतो, "माझ्या क्रिकेट-जीवनांतील हा सर्वांत रोमांचकारी सामना होता."

पांचवा कसोटी सामना २०, २२, २३ व २४ ऑगस्ट १९३८ रोजीं ओव्हल मैदानावर झाला. या सामन्याकरितां दोन्ही संघ पुढीलप्रमाणें होते.

इंग्लंड–हटन, एड्रिच, लीलॅंड, हॅमंड, पेन्टर, कॉम्प्टन, हार्डस्टाफ, वूड, व्हेरिटी, फार्नेस, बॉज.

ऑस्ट्रेलिया–ब्रॅडकॉक, फिंग्लटन, ब्राऊन, ब्रॅडमन, मॅकेब, हॅसेट, बार्नेस, बार्नेट, वेट, ओरेली, फ्लीटवूड स्मिथ.

ऑस्ट्रेलियानें या सामन्यांत आपला वेगवान गोलंदाज मॅकॉर्मिक याला त्याची तब्येत बरी नसल्यामुळें वगळलें होतें. यामुळें मॅकेब आणि वेट यांना या सामन्यांत सलामीचे गोलंदाज म्हणून गोलंदाजी टाकावी लागली.

इंग्लंडचा कर्णधार वॉल्डर हॅमंड यानें टॉस जिंकून फलंदाजी स्वीकारली व लेन हटन व एड्रिच यांनीं इंग्लंडच्या पहिल्या डावास सुरुवात केली. पहिली विकेट २९ वर पडली. आणि हटनच्या जोडीला लीलॅंड आला. त्या दिवशीं खेळ संपेपर्यंत इंग्लंडच्या १ बाद ३४७ धांवा झाल्या. त्यापैकीं हटन १६० व लीलॅंड १५६ धांवा होत्या.

दुसऱ्या दिवशीं धांवांचा आंकडा ४११ वर गेला आणि लीलॅंड १८७ धांवांवर रन-आऊट झाला. त्यानंतर हॅमंड आला.त्यानें हटनला तिसऱ्या विकेटवर १३५ धांवांची भर घालण्यास मदत केली. धांवांचा आंकडा ५४६ वर गेला आणि हॅमंड (५९) बाद झाला. पेंटर आला, पण तो ० धांवांवर उडाला. ४ बाद ५४७ धांवा झाल्या. डेनीस कॉम्प्टन आला, पण त्याची एक धांव झाली असतांना वेटनें त्याचा त्रिफळा उडविला. ५ बाद ५५५ धांवा झाल्या. हटनच्या जोडीला हार्डस्टाफ आला, त्यानें हटनला दुसऱ्या दिवशीं खेळ संपेपर्यंत धांवांचा आंकडा

६३४ वर नेण्यास मदत केली. यापैकी हटनच्या ३०० धांवा होत्या.

तिसऱ्या दिवशीं आस्तेकदम हटन डॉन ब्रॅडमनच्या ३३४ च्या उच्चांका-जवळ आला. त्याच्या ३३१ धांवा झाल्या. हटनची त्यावेळीं काय मनस्थिति होती? स्वतः त्यानेंच एक ठिकाणीं तिचें वर्णन केलें आहे. " त्यावेळीं डॉन सिली मिड–ऑफला क्षेत्ररक्षण करीत होता. माझ्या ३३१ धांवा झाल्या होत्या. तो अवघा चार पांच यार्डांवर उभा होता. मी अगदीं नाउमेद झालों होतो. तो तेथून दूर जाईल तर बरें असें वाटत होतें. अखेर मी दमदारपणें एक चाराचा फटका मारून त्याचा उच्चांक मोडला."

हटननें हा उच्चांक मोडल्यावर स्वतः डॉननें पुढें होऊन त्याचें अभिनंदन केलें आणि सर्व ऑस्ट्रेलियन खेळाडूंनींहि टाळ्या वाजविल्या. हटननें यावेळीं ३६४ धांवा केल्या. तो बाद झाल्यावर हॅमंडनें ७ बाद ९०३ धांवावर आपला पहिला डाव पुरा झाल्याचें जाहीर केलें.

इंग्लंडच्या या दमदार खेळामुळें ऑस्ट्रेलियन गोलंदाज थकून गेले. तेव्हां मध्यंतरी स्वतः डॉननें गोलंदाजी घेतली. पण गोलंदाजी करतांना तो पाय घसरून पडला व त्याला पुढें या सामन्यांत खेळतां आलें नाहीं. ब्रॅडमनचा पाय बराच दुखाविल्याचें कळतांच इंग्लंडचे माजी पंतप्रधान स्टॅन्ले बाल्डवीन यांनीं त्याला पुढील प्रेमळ पत्र लिहिलें :

" प्रिय डॉन ",

" ही बातमी कळल्यावर मला किती दुःख झालें हें शब्दांनीं सांगतां येत नाहीं. तुझ्या ठिकाणीं धीरोदात्त वृत्ति आहे, ती लक्षांत घेतां तूं या वेदना सहन करशील यांत शंका नाहीं. पण एकंदरींत हा अपघात निष्ठुर आहे

" क्रिकेटपटू ब्रॅडमन हा सर्व इंग्लिश भाषा बोलणाऱ्या देशांना परिचित आहे. पण ब्रॅडमन या व्यक्तीला मी माझा मित्र म्हणूं शकतो कां?"

तुझा,

स्टॅनले बाल्डवीन

पाय दुखाविल्यामुळे डॉन फलंदाजी करूं शकला नाहीं. त्याचप्रमाणें फिंग्लटनलाहि या सामन्यांत मार लागल्यामुळें तोहि खेळूं शकला नाहीं.

ऑस्ट्रेलियन संघाच फक्त ९ च खेळाडू खेळले व दोन्ही डावांत २०१ व १२३ धांवा होऊन ऑस्ट्रेलियाचा एक डाव आणि ५७९ धांवांनीं पराभव झाला. या सामन्यात डॉन ब्रॅडमननें फलंदाजी केली असती तर सामन्याचा शेवट कसा झाला असता, याचा तर्क करीत बसणें हेंहि मनोरंजक आहे.

या कसोटी सामन्यांत लेन हटननें डॉन ब्रॅडमनचा उच्चांक मोडला ( हटनचा हा उच्चांक पुढें वेस्ट इंडिजचा गारफिल्ड सोबर्स यानें मोडला. ) एवढींच या सामन्यांतील वैशिष्ठ्यपूर्ण घटना नव्हे. इतरहि अनेक उल्लेखनीय घटना या सामन्यांत घडल्या.

१ इंग्लंडच्या ९०३ धांवा हा एका डावांतील धांवांचा उच्चांक होता.

२ लेन, हटन सतत १३ तास २० मिनिटें खेळला. हाहि एक उच्चांक आहे. ( वेस्ट इंडिजविरुद्ध हनिफ महंमद यापेक्षां जास्त वेळ खेळला, पण त्याला हटनचा धांवाचा उच्चांक मोडता आला नाहीं.)

३ हटन व लीलँड यांनीं दुसऱ्या विकेटवर केलेल्या ३८२ धांवा, हा इंग्लंडचा दुसऱ्या विकेटवरील उच्चांक आहे.

४ हटन आणि हार्डस्टाफ यांनीं सहाव्या विकेटवर केलेल्या २१५ धांवा हा इंग्लंडचा सहाव्या विकेटवरील उच्चांक आहे.

याच सामन्यांत इंग्लंडच्या पहिल्या डावांत एड्रिचची पहिली विकेट घेऊन ओरेलीनें आपल्या कसोटी सामन्यांतील १०० विकेटी पुऱ्या केल्या.

या पांचहि कसोटी सामन्यांच्या मध्यंतरी व नंतर डॉन ब्रॅडमननें इंग्लंडमध्यें पुढीलप्रमाणें धांवा केल्या. जंटलमेन संघाविरुद्ध १०४, लँकेशायर विरुद्ध १२ व नाबाद १०१, यॉर्कशायर विरुद्ध ५९ व ४२, वॉरविकशायर विरुद्ध १३५, नॉटस विरुद्ध ५६ व १४४, सॉमरसेट विरुद्ध २०२, ग्लॅमोर्गन विरुद्ध १७ व केंटविरुद्ध ६७ धांवा.

डॉन ब्रॅडमननें याहि दौऱ्यांत पुनः एकदां मे महिन्यांतच १००० धांवा पुऱ्या केल्या. तसेंच त्यानें एकंदर २० सामन्यांतील २६ डावांत खेळून २४२९ धांवा केल्या. सरासरी ११५·६६. यांत १३ शतकें होतीं. एका दौऱ्यांत तेरा शतकें आणि ११५·६६ सरासरी हाहि इंग्लंडमधील एक उच्चांक होता. कसोटी

सामन्यांतील त्याची सरासरी १०८·५० होती. फरक एवढाच कीं यावेळीं त्यानं कसोटी सामन्यांत द्विशतकें किंवा त्रिशतक केलीं नाहींत.

इंग्लंडच्या या दौऱ्यांत डॉन ब्रॅडमनची पत्नी जेसी हीहि बरोबर होती. यावेळीं यूरोपांत युद्धाचें वातावरण निर्माण झालें होतें. मध्यंतरी इंग्लंडचे पंत-प्रधान श्री. चेंबरलेन यांनीं चेकोस्लाव्हियाच्या प्रश्नावर समेट घडवून आणला होता. पण हा समेट म्हणजे वादळापूर्वीची शांतता होती. युद्धाची तयारी जोरांत चालू होती. इंग्लंडमध्यें विमान हल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठीं खंदक खणले जात होते. हिटलर जगावर आपलें साम्राज्य प्रस्थापित करण्याची आसुरी महत्त्वा-कांक्षा बाळगून असून तो दुसऱ्या महायुद्धाच्या भीषण खाईत जगाला गुरफटणार हें स्वच्छ दिसत होतें. यावेळीं यूरोपांत प्रवास करणें धोक्याचें होतें. तरीहि ब्रॅडमन दांपत्यानें त्यांच्या प्रवासी एजंटांच्या सल्ल्याविरुद्ध मधल्या समेटाचा फायदा घेऊन यूरोपचा प्रवास केला. युद्धाच्या पावित्र्यांत उभ्या असलेल्या यूरोपचा त्यांचा हा प्रवास रोमांचकारी होता.

# ११ लागोपाठ सहा शतकें

सन १९३९ मध्ये दुसरें महायुद्ध सुरू झालें व तें सन १९४५ पर्यंत चाललें. या सहा वर्षांच्या काळांत आंतरराष्ट्रीय क्रिकेटला जवळजवळ विराम मिळाला. आंतरराष्ट्रीय क्रिकेटपैकीं विशेषतः इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यामधील कसोटी सामने अत्यंत चुरशीचे होत. सन १८७६ पासून हे सामने सतत चालू होते. त्यांत फक्त पहिल्या महायुद्धाच्या काळांत काय तो खंड पडला होता. साहजिकच क्रिकेटप्रेमी रसिकांना हे नियमित रोमांचकारी सामने बंद पडल्याबद्दल वाईट वाटलें.

अर्थात् आंतरराष्ट्रीय सामने बंद पडले तरी देशांतल्या देशांत चढाओढीचे सामने खेळले जात होतेच, इंग्लंडमध्यें कौंटी क्रिकेट सामने खेळले जातात. वरून बाँब पडत असतांहि इंग्लिश लोक धैर्यानें क्रिकेट खेळत होते. ऑस्ट्रेलियावर जपानी हल्ल्याचें संकट भेडसावीत असतांहि तेथें शेफिल्ड शील्ड सामने खेळलेच जात होते. आणि आतां आंतरराष्ट्रीय कसोटी सामने बंद पडल्यामुळें शेफिल्ड शील्ड सामन्यांना गर्दीहि खूप होई.

सन १९३८ व ३९ चे शेफिल्ड सामने डॉन ब्रॅडमननें असेच गाजविले. डॉन हा द. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार होता. सन १९३८-३९ मध्यें डॉनच्या नांवावर आणखी एक उच्चांक चढला

सन १९३८ च्या शेवटीं एम्. सी. सी. या संस्थेची सावंत्सरी साजरी झाली. या सावंत्सरीनिमित्त ऑस्ट्रेलियांत जो क्रिकेटचा सामना झाला, त्यांत डॉननें ११८ धांवा केल्या. त्यानंतर शेफिल्ड सामन्यापैकीं न्यु साऊथ वेल्स

बरोबर ॲडेलेड येथें झालेल्या सामन्यांत त्यानें १४३ धांवा केल्या. पण या सामन्यांत डॉनपेक्षांहि बॅडकॉकचा खेळ अधिक सरस झाला, त्याने नाबाद २७१ धांवा केल्या.

क्विन्सलॅंड बरोबरच्या पुढच्या सामन्यांत डॉननें पुनः फटक्यांची आतषबाजी करून २२५ धांवा केल्या, त्यानंतर त्यानें लागलीच व्हिक्टोरियाविरूद्ध १०७ व पुनः क्विन्सलॅंड विरुद्ध १८६ धांवा केल्या व सिडने येथें परत न्यु साऊथ वेल्सच्या सामन्यांत त्यानें नाबाद १३५ धांवा केल्या. अशा रीतीनें लागोपाठ सहा सामन्यांत ओळीनें शतकें लावून त्यानें सी. बी. फ्रायच्या लागोपाठ सहा शतकांची बरोबरी केली.

डॉनला पुढच्या सामन्यांतहि आपण शतक झळकावूं व सी. बी. फ्रायवर ताण करू अशी खात्री वाटत होती. पण त्याच्या पांच धांवा झाल्या असतांना, फ्लिटवूड स्मिथनें जमिनीपासून एक दोन इंचावर डॉनचा अपूर्व झेल घेतला. विशेष म्हणजे फ्लिटवूड हा एक साधारण प्रतीचाच क्षेत्ररक्षक होता. मध्यंतरी क्रिकेटमधून विरंगुळा मिळावा म्हणुन डॉननें इतरहि खेळ खेळण्यास सुरुवात केली. यापैकीं एक म्हणजे स्क्वॅश. या खेळांतहि डॉननें इतकें प्राविण्य संपादन केलें कीं एकदां तर स्क्वॅशच्या आस्ट्रेलियांतील चॅम्पियनशीपच्या सामन्यांत त्यानें डेव्हिस कप जिंकलेला प्रख्यात टेनिसपट्टू डॉन टर्नबुल याचा अंतिम सामन्यांत पराभव केला. पण स्क्वॅशच्या एका तासाच्या खेळांत क्रिकेटमधील संबंध दिवसाच्या फलंदाजीपेक्षां त्याच्यावर ताण पडला व तेव्हांपासून त्यानें अशा प्रकारच्या सामन्यांत खेळण्याचें सोडून दिलें.

सन १९३९–४० च शेफिल्ड सामने सुरू झाले. या वर्षी हे सामने जिंकण्याचा मान न्यु साऊथ वेल्सनें मिळविला. दुसरें महायुद्ध सुरू झालें होतें. पण कांहीं झाल तरी क्रिकेट बंद करू नका असा ऑस्ट्रेलियन सरकारनें सल्ला दिला. लोकांतील नीतिधैर्य टिकविण्याच्या दृष्टीनें हा सल्ला योग्यच होता. दुसरी गोष्ट म्हणजे या काळांत क्रिकेटपटूंनीं क्रिकेटचे अनेक सामने करून युद्ध फंडाला बराच पैसा मिळवून दिला. अशाच एका सामन्याचें उत्पन्न तर १५०० पौंड किंवा साडेबावीस हजार रुपये झाले!

सन १९३९-४० च्या शेफिल्ड सामन्यांतहि डॉन पूर्वीच्या तेजानेंच तळपला. पहिला सामना व्हिक्टोरियाबरोबर झाला. या सामन्यांत डॉननें अनुक्रमें ७६, १६४ धांवा केल्या. डॉन सहसा कधीं रन-आऊट होत नसे. पण या सामन्यांत तो पहिल्या डावांत रनआऊट झाला.

दुसरा सामना न्यु साऊथ वेल्सबरोबर झाला. वस्तुतः डॉन पूर्वी न्यु साऊथ वेल्समधून खेळे. पण आतां द. ऑस्ट्रेलियांत त्यानें स्थलांतर केलें असल्यामुळें तो न्यु साऊथ वेल्सविरुद्ध खेळत होता. न्यु साऊथ वेल्सकडून ओरेली हा विख्यात गोलंदाज होता. ओरेली त्या वर्षी भलताच फॉर्मात होता. सरासरी १३ ५ धांवा देऊन त्यानें ५२ विकेटी घेतल्या होत्या. या विख्यात गोलंदाजाबरोबर पुनः एकदां डॉनची चुरस झाली व त्याला आपल्या क्रिकेट जीवनाच्या सुरुवातीस ओरेलीबरोबर झालेल्या चुरशीची आठवण झाली.

हा सामना ॲडेलेडच्या मैदानावर झाला. न्यु साऊथ वेल्स संघानें ३३६ धांवा केल्या. द. ऑस्ट्रेलियाची फलंदाजी सुरू झाली. ओरेलीची गोलंदाजी फारच मारक पडत होती. त्याला तोंड देणें द. ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंना जड जात होते. द. ऑस्ट्रेलियाचे भरंवशाचे फलंदाज कोसळले होते. डॉन ब्रॅडमन एका बाजूनें निकरानें बचाव करीत होता आठ खेळाडू बाद झाले दहावा खेळाडू वॉर्ड आला. वॉर्ड हा कांहीं फलंदाज नव्हता. पण शेवटच्या चेंडूवर धांव घ्यावी आणि पुनः ओरेलीच्या भयंकर माऱ्यास तोंड देण्यास यावे, असा डॉननें क्रम सुरू करून अनेक बहुमोल धांवांची भर घातली. नंतर वॉर्ड बाद झाला व ग्रिमेट हा शेवटचा फलंदाज आला. त्यावेळींहि डॉननें हाच क्रम ठेवून धांवा वाढविण्यास सुरुवात केली. शेवटच्या विकेटवर डॉन ब्रॅडमन आणि ग्रिमेट या जोडीनें ११३ धांवा केल्या! त्यापैकीं डॉनच्या ८७ धांवा होत्या. डॉननें अशा रीतिनें या डावांत नाबाद २५१ धांवा केल्या. दुसऱ्या डावांत द. ऑस्ट्रेलियाचे ३ बाद १५६ धांवा झाल्या. त्यापैकीं डॉनच्या नाबाद ९० होत्या.

डॉननें या हंगामांत क्विन्सलँड विरुद्ध पहिल्या सामन्यांत १३८, व्हिक्टोरीया विरुद्ध २६७, क्विन्सलँड विरुद्धच्या दुसऱ्या सामन्यांत ० व ९७, न्यु

साऊथ वेल्स बरोबरच्या दुसऱ्या सामन्यांत ३९ व ४०, प. ऑस्ट्रेलिया विरुद्ध-च्या पहिल्या सामन्यांत नाबाद ४२ व २०९, प. ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या सामन्यांत १३५ धांवा केल्या. सन १९४०–४१ च्या हंगामांत डॉन एकच सामना खेळला व त्यानें ० व ६ धांवा केल्या.

दुसऱ्या महायुद्धाला आतां अधिक व्यापक आणि भयंकर स्वरूप येत चालले होते. डॉननें देशकार्य करावयाचें असें ठरविलें. त्यानें वैमानिक दलांत नांव नोंदविलें. पण विमानदलातील विमानांची संख्या नोंदविलेल्या लोकांपेक्षां कमी असल्यामुळें त्याला ताबडतोब कामावर हजर राहावे लागले नाहीं. अधिकाऱ्यांनीं त्याच्याकडे देशांतल्या देशांत इतर कामें सोंपविलीं.

अशाच एका युद्ध–कार्यात डॉन गुंतलेला असतांना तेथें त्याचा शोध करीत एक डोळ्यांचा तज्ज्ञ डॉक्टर आला. डॉनची दृष्टि अत्यंत तीक्ष्ण आहे व म्हणून तो इतक्या धांवा करू शकतो अशी त्यानें डॉनची कीर्ति ऐकली होती. तो दृष्टीसंबंधीचे खास संशोधन करीत होता. त्यानें डॉनचें डोळे तपासण्याचें ठरविलें. पण डॉनचें डोळे तपासल्यावर वेगळाच प्रकार उघडकीस आला. डॉन हा आजारी असल्याचें त्याला आढळून आले. त्याला अपचनाचा व वाताचा विकार बरेच दिवसांपासून जडलेला होता. त्यानें आतां गंभीर स्वरूप धारण केलें होतें. पुढें पुढें तर त्याला इतका त्रास होऊं लागला कीं कांहीं दिवस त्याला इस्पितळांत ठेवावे लागले. त्याची पत्नी स्वतःच्या प्रकृतीची पर्वा न करतां त्याची शुश्रुषा करीत होती. त्याला तात्पुरता आराम वाटला. पण पूर्ण विकार गेला नाहीं. अखेर एका मित्राच्या सल्ल्यावरून तो प्रख्यात मसाजतज्ज्ञ अर्न सॉंडर्स याजकडे मेलबोर्न येथें गेला.

डॉन म्हणतो, " सॉन्डर्सचें नांव मेलबोर्न शहरांत विशेषतः दुखापती झालेल्या खेळाडूंत सर्वतोमुखी झालें होतें. त्याच्या हातून माझा पोटांतील विकार बरा होईल कीं नाहीं, याची मला शंका वाटत होती. आशेपेक्षां श्रद्धेनेंच मी त्यांचेकडे गेलों. त्याची पोलादी बोटें माझ्या स्नायूंवरून फिरूं लागली आणि त्यांनीं एखाद्या चमत्काराप्रमाणें माझ्या आजाराचें ठिकाण शोधून काढलें. "

" सॉन्डर्सची निसर्गावर श्रद्धा आहे. तो भूल न देतां आपली उपाययोजना

करतो, त्याच्याकडे जाण्यापूर्वी हें मला माहीत नव्हते. पुढे अनेक लोक त्याच्याकडे जाऊन, केवळ श्रद्धेनें त्याच्या प्राथमिक उपचाराच्या वेदना सहन करीत असल्याचें मला आढळून आलें. त्याच्याकडे जाऊन आल्यानंतर मला जो आराम वाटला तो म्हणजे उष्णतेच्या लाटेवर बर्फाप्रमाणें थंड गार पाण्याच्या माऱ्याप्रमाणें वाटला. सॉंडर्सनें मी तुझा विकार नाहिंसा करून, तुझे स्नायू पूर्वीप्रमाणें बळकट करतो असें सांगितलें, आणि त्यानें तें खरें करून दाखविलें. डॉनची प्रकृति पूर्वपदावर आली व आपण पुनः क्रिकेट खेळूं कीं नाहीं, अशी जी त्याला धास्ती वाटत होती ती दूर झाली.

डॉनच्या प्रकृतींत मसाजनें घडवून आणलेल्या क्रांतीचा परिणाम म्हणून कीं काय पुढे परदेशी जाणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघाबरोबर एकेक मसाजतज्ञ पाठविण्यांत येऊं लागला व लौकरच इंग्लंडनें ऑस्ट्रेलियाचें या बाबतींत अनुकरण केलें.

मध्यंतरी डॉनचें समाजकार्य चालूंच होतें या कार्यांत त्याला त्याची पत्नी जसा हिचाहि मनःपूर्वक साहाय्य देत असे. त्याच्या या समाजकार्यामुळें त्याला कमिटी ऑफ कॉमनवेल्थ क्लब ऑफ ॲडेलेड या संस्थेचें अध्यक्षपद देण्यांत आलें. लॉर्ड मॉंटगोमेरी आणि ॲंथनी इडन यांनीं या कमिटीस पुढे भेट दिली.

सन १९४५ मध्यें महायुद्ध संपलें. जगाची सुटका झाली. नेहमींचे सर्वसाधारण व्यवहार सुरू झाले. आस्ट्रेलियांत युद्ध काळांतहि क्रिकेट चालूं होतेंच. पण आतां त्याला अधिक चालना मिळाली. डिसेंबर महिना उजाडला व परदेशी युद्धावर गेलेले आस्ट्रेलियन सैनिक परतले युद्धावर गेलेल्या सैनिकांत कांहीं नामांकित खेळाडू हे असून त्यांचा एक सैनिकी संघ होता. या संघांत हॅसेट, कीथ मिलर, पेटीफर्ड कारमॉडी, सेसाल पेपर, वर्कमन, व्हिटिंगटन, यांच्यासारखे नामांकित खेळाडू होते. या सैनिकी संघाचे इंग्लंडमध्यें अनेक सामने झाले व परत आस्ट्रेलियांत जातांना संघाचे भारतांतहि कांहीं सामने व तीन अनाधिकृत कसोटी सामने झाले आस्ट्रेलियन क्रिकेटला पुनः जोराची चालना देण्यासाठीं या संघाचे आस्ट्रेलियांत असलेल्या खेळाडूंबरोबर सामने व्हावेत अशी कल्पना काढण्यांत आली. या सामन्याचे उत्पन्न मदतनिधीला देण्यांत येणार होतें.

डॉनची प्रकृति संपूर्णपणें सुधारली नव्हती. पण तो खेळला तर सामन्यांस चांगलें उत्पन्न मिळणार होतें. म्हणून त्याहि परिस्थितींत त्यानें कर्तव्यबुद्धीनें खेळण्याचें कबूल केलें.

पण सैनिकी संघाबरोबर खेळण्यापूर्वी थोडेसे प्रॅक्टिस असावें, यासाठीं तो त्यापूर्वींच्या द. ऑस्ट्रेलिया विरुद्ध क्विन्सलॅंड या सामन्यांत खेळला. या सामन्यांत त्यानें ६८ व नाबाद ५२ धांवा काढल्या. पहिल्याच सामन्यांतील धांवसंख्या या दृष्टीनें ती वाईट नव्हती पण इतक्या धांवा करतांनाहि डॉनला सायास पडले.

यानंतर तो सैनिकी संघाविरुद्ध खेळला व त्यानें यावेळीं ११२ धांवा केल्या. त्यानें शतक ठोकलें होतें. स्वतः डॉनलाच या शतकांत समाधान वाटलें नाहीं. हाहि त्याचा डाव कंटाळवाणा झाला होता. सैनिकी संघाचाहि डाव चांगला झाला नाहीं. सतत सामने खेळत असल्यामुळें त्याच्यांत आलेला शीण या सामन्यांत व्यक्त झाला होता.

सन १९४६ च्या उन्हाळयांत ऑस्ट्रेलियाचा संघ न्युझीलंडला जाण्याचें ठरलें. डॉनची या सुंदर देशाचा दौरा करण्याची इच्छा असूनहि त्याला प्रकृतीसाठीं जातां आलें नाहीं. सन १९२८ प्रमाणें त्याचा हाहि न्युझीलंडचा दौरा अर्थात वेगळ्या कारणाकरितां चुकला.

डॉनच्या बाबतींत एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे, तो खुद्द ऑस्ट्रेलियांत इंग्लंड, द. आफ्रिका, वेस्ट इंडिज, भारत आदिकरून संघाविरुद्ध खेळला पण कांहीं ना कांहीं कारणानें त्याला इंग्लंडशिवाय इतर कोणत्याहि देशाचा दौरा करतां आला नाहीं. सन १९३८ मध्यें इंग्लंडला जातांना डॉनची पत्नी मुंबईत कांहीं वेळ थांबली होती. त्यावेळीं मुंबइचे ब्रेबोर्न स्टेडियम पाहून तिनें असें उद्‌गार काढलें कीं "या मखमालीसारख्या हिरवळीवर डॉनला खेळणें फार आवडेल." पण भारतांतील हजारों क्रिकेट षौकिनांच्या दृष्टीनें हा योग कधींच आला नाहीं. व जगांतील या सर्वश्रेष्ठ क्रिकेटपटूचा खेळ भारतीयांना पाहतां आला नाहीं. त्यानंतर डॉनला तो क्रिकेटमधून निवृत्त झाल्यावर अनाधिकृतरित्या आणण्याचेंहि अनेक प्रयत्न झाले. पण आपण आतां क्रिकेटमधून निवृत्त झालों आहोंत असें सांगून डॉननें नकार दिला.

# १२ अखेर भूत जीवंत झालें!

सन १९४६ च्या हिवाळ्यांत डॉननें आपली प्रकृति सुधारण्याकडे लक्ष दिलें. तरीहि आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्याइतकी ताकद आपल्यांत आलेली आहे, असें डॉनला वाटत नव्हतें. पण त्याबरोबरच युद्ध संपल्यामुळें आंतरराष्ट्रीय क्रिकेटला जोराची चालना देण्याचें प्रयत्न चालू होते. विशेषत: इंग्लंड व ऑस्ट्रेलिया यांच्यामधले कसोटी सामने कधीं सुरू होतात, इकडे क्रिकेट षौकिनांचें लक्ष लागून राहिलें होतें आणि डॉन या बाबतींत मदत करण्यास उत्सुक होता. त्याच्यासारखा महान् क्रिकेटपटू या बाबतींत आघाडीवर पाहिजे होता. पण प्रकृतिसाठीं तो कचरत होता. मधूनमधून आपण आतां आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त व्हावें, असें त्याला वाटे. पण जेसीनें त्याला निवृत्त होण्यापासून परावृत्त केलें. उलट तिचें त्याला क्रिकेट खेळण्यास उत्तेजन होतें. ती म्हणे, "आपल्या मुलानें तुम्हांला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्यें खेळतांना कधीं पाहिलेलें नाहीं, अशा स्थितींत तुम्ही क्रिकेटमधून निवृत्त होणें ही दुर्दैवी घटना ठरेल."


लौकरच इंग्लिश संघ ऑस्ट्रेलियांत येऊन दाखल होणार होता आणि वृत्तपत्रांनीं "डॉन ब्रॅडमननें आपण कसोटी सामन्यांत खेळणार कीं नाहीं, हें नक्की जाहीर करावें," असा जोराचा तगादा लाविला. डॉनची मोठी पंचाईत झाली. नक्की कांहींच सांगतां येत नव्हतें. त्यानें डॉक्टरांचा सल्ला विचारला. डॉक्टरांनी सल्ला दिला कीं निदान इंग्लंडबरोबरच्या द. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या सामन्यांत खेळूं नकोस. नंतर दोन तज्ज्ञ डॉक्टरांचा विचार घेऊन काय ते ठरवूं. डॉनला पेच पडला. त्यानें डॉक्टरांना स्पष्ट विचारलें, "मी जर क्रिकेट

खेळलों, तर प्रकृति कायमचीच बिघडेल कां ?" डॉक्टरांनीं उत्तर दिलें, "तसेंच कांहीं नाहीं. पण तूं प्रकृतीला जादा ताण देतां कामा नयेस" डॉननें पत्नीशी विचारविनिमय केला. जेसीलाहि प्रश्न पडला. मुलासाठीं नवऱ्यानें क्रिकेट खेळावें, असें तिला वाटे, पण त्याबरोबरच त्यानें भलता धोका पत्करणें बरें नव्हे, असें तिला वाटलें. अखेर डॉननेंच निर्णय घेतला कीं आरंभीच्या सामन्यात खेळावें आणि त्यांत निभावून नेतां आलें तर पुढच्या मोठ्या सामन्यांत खेळावें.


इंग्लंडचा संघ ॲडेलेडला येऊन दाखल झाला. या संघाचा कर्णधार वॉल्टर हॅमंड असून, संघांत हटन, वॉशब्रुक, एड्रीच, कॉम्प्टन, यार्डले, आमकिन, बेडसर, एव्हन्स, गिब, होस, राईट आदिकरून खेळाडू होते.

या संघाचा पहिला सामना डॉनच्या नेतृत्वाखाली द. ऑस्ट्रेलियाशी झाला. हॅमंडनें पांच बाद ५०६ धांवा झाल्यावर आपला पहिला डाव पुरा झाल्याचें जाहीर केलें. द. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत २६६ व दुसऱ्या डावांत आठ बाद २७६ धांवा होऊन हा सामना अनिर्णित राहिला. डॉननें पहिल्या डावांत मोठ्या मिनतवारीनें ७६ धांवा काढल्या. दुसऱ्या डावांत तर तो तीन धांवांवरच बाद झाला. स्वतः डॉनलाच आत्मविश्वास वाटत नव्हता. एका पत्रकारानें लिहिलें, "आज मी एका महान् क्रिकेटपटूचें भूत क्रीडांगणावर खेळतांना पाहिलें, आणि भुतें क्वचितच जीवंत होतात !"

डॉन इंग्लंडविरुद्धचा दुसरा सामना ऑस्ट्रेलियन संघाचा कर्णधार या नात्यानें खेळला. या सामन्यांत डॉनच्या खेळांत खूप सुधारणा दिसली. ऑस्ट्रेलियाच्या दृष्टीनें हा सामना म्हणजे कसोटी सामन्याची चांचणीच होता. पावसामुळें पहिल्या व चौथ्या दिवशीं खेळ होऊं शकला नाहीं पण तरीहि हा सामना वैशिष्ट्यपूर्ण होता. प्रथम इंग्लंडचा डाव होऊन ३१८ धांवा झाल्या. ऑस्ट्रेलियन एलेव्हननें ५ बाद ३२७ धांवा केल्या. डॉननें या सामन्यांत शतक ठोकलें. विसडेन या क्रिकेटपटूच्या वार्षिक संदर्भग्रंथांत नमूद केलें, "ब्रॅडमननें आपलें या खेळावर अद्यापहि प्रभुत्व आहे, असें दाखवून दिलें. इतकेंच नव्हे तर त्यानें या सामन्यात प्रथमच इंग्लंडविरुद्ध खेळत असलेल्या डावखुऱ्या मॉरीसला शतक ठोकण्यास स्फूर्ति दिली." पण याच सामन्यात डॉनचा खेळतांना पाय लचकला आणि त्याला त्यांत पुढे खेळणें अशक्य झालें.



डॉन ब्रॅडमन आपला आवडता 'पुल' हा फटका शैलीदारपणें ठोकी.




मुलांना क्रिकेट शिकविण्यांत डॉनला मनापासून आनंद वाटतो.

यानंतर डॉन व्हिक्टोरिया विरुद्ध शेफिल्ड सामन्यांत खेळला व त्यानें ४३ व ११९ धांवा केल्या.

डॉन विचार करू लागला कीं क्रिकेट पुढें चालू ठेवावयाचें काय? पण त्याला फार विचार करावा लागला नाहीं. याच वेळीं बिल ओरेली या ऑस्ट्रेलियाच्या प्रख्यात गोलंदाजानें कसोटी सामन्यांतून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आणि डॉननें असें ठरविलें कीं ऑस्ट्रेलियन क्रिकेटला यावेळींच आपली अधिक जरूरी आहे. डॉननें सर्व अडचणी बाजूला ठवून ऑस्ट्रेलियाच्यासाठीं क्रिकेट खेळावयाचें असा निर्धार जाहीर केला व ब्रिस्बेन येथें होणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्याकरितां निवडावयाच्या खेळाडूंत आपलें नांव घालण्यास संमति दिली. डॉन म्हणतो, "अखेर भूत जीवंत झालें आणि अनुभवांती माझा निर्णय योग्यच असल्याचें सिद्ध झालें."

पहिला कसोटी सामना ब्रिस्बेन येथें ता. २९, ३० नोव्हेंबर व २, ३, ४, ५ डिसेंबर १९४६ रोजीं झाला. या सामन्यांत दोन्ही बाजूंच्या संघांत पुढीलप्रमाणें खेळाडू होते.

ऑस्ट्रेलिया—बार्नस, मॉरीस, ब्रॅडमन, हॅसेट, मिलर, मॅकूल, इआन जॉन्सन, टॅलन, लिंडवाल, ट्राईब व टोशॅक.

इंग्लंड—हटन, वॉशब्रुक, एड्रिच, कॉम्प्टन, हॅमंड, आयकिन, यार्डले, गिब, होस, बेडसर व राईट.

इंग्लंडच्या संघांत सहा जुने खेळाडू होते तर ऑस्ट्रेलियाच्या संघांत फक्त तीन खेळाडू होते.

डॉननें टॉस जिंकून फलंदाजी पत्करली. मॉरीस व सिड बार्नस यांनीं सुरुवात केली. पण मॉरीसच्या फक्त दोन धांवा झाल्या असतांना हॅमंडनें त्याचा स्लीपमध्यें प्रेक्षणीय झेल घेतला. हॅमंड हा स्लीपमधील सर्व काळांतील एक सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक समजला जाई. आणि त्यानें यावेळीं त्याची प्रचिती आणून दिली. तारुण्याचा ऐन बहर ओसरल्यानंतरहि त्यानें आपली तडफ कमी झालेली नाहीं हें यावेळीं दाखवून दिलें. मॉरीस बाद झाल्यावर डॉन ब्रॅडमन खेळावयास आला आणि लागलीच ज्यावर खूप वादळ माजलें असा एक निर्णय अंपायरनें

दिला. इंग्लिश गोलंदाज होस याने टाकलेला एक चेंडू जवळजवळ यॉर्कर होता. डॉननें तो स्लीपच्या बाजूनें मारताना बॅटीनें दाबला आणि चेंडू आयकिनच्या हातांत गेला. सर्व क्षेत्ररक्षकांनीं थोडया उशीरांच डॉनला बाद करण्याकरितां अंपायरकडे अपील केल. पण अंपायर वॉरविक यानें शांतपणें नाबाद असा निकाल दिला. वस्तुत: तो बंप बॉल होता. पण त्यावर बरेंच वादळ माजलें. नभोवाणीवरील समालोचकांनीं एकमतानें झेल नव्हता, असें जाहीर केलें तर वर्तमानपत्रांनीं त्यावर परस्परविरुद्ध मतें दिलीं. या सामन्यांतील दुसरा अंपायर स्कॉट यानेंहि पुढें वर्तमानपत्रांत लेख लिहून झेल गेला नव्हता असें जाहीर केलें. विशेषत: त्यानंतर डॉन ब्रॅडमननें १८७ धांवा केल्यामुळेंच या निर्णयाचा विशेष गाजावाजा झाला. डॉन म्हणतो, "अंपायरना अशा प्रसंगीं निर्णय देणें सोपें नसतें. लॉर्डस येथील एका सामन्यांत फ्रॅंक चेस्टर यानें एकदां हॅमंडला 'नाबाद' ठरविलें होतें आणि ग्रिमेटनें झेल घेतला आहे अशी माझी बालंबाल खात्री होती. प्रेक्षक स्त्रियांना तर बंप बॉलला झेल म्हणून ओरडण्याची संवय असते आणि त्यांच्या मताप्रमाणें वागावयाचें झाल्यास, सर्वांनाच बंप बॉलवर बाद करावे लागेल."

डॉनच्या शतकाशिवाय हॅसेट (१२८), मिलर (७९), मॅकूल (९५) यांनीं तडाखेबंद फलंदाजी करून धांवांचा आकडा ६४५ वर नेऊन भिडविला. इंग्लंडच्या दोन्ही डावांत अनुक्रमें १४१ व १७२ धांवा झाल्या. ऑस्ट्रेलियाचा जलदगति गोलंदाज मिलर यानें पहिल्या डावांत ६० धांवांत ७ आणि दुसऱ्या डावांत १७ धावांत २ खेळाडू बाद केलें. टॉशॅकनें पहिल्या डावांत १७ धांवांत ३ बाद आणि दुसऱ्या डावांत ८२ धांवांत ६ खेळाडू बाद केलें. इंग्लंडचा भावी काळांत गाजलेला व आंतरराष्ट्रीय कसोटी सामन्यांत २३६ विकेटी घेऊन उच्चांक केलेला अॅलेक बेडसर हा गोलंदाजहि या सामन्यांत अधिक प्रसिद्ध झाला. मात्र कांजण्या आल्यामुळें रे लिंडवॉल हा ऑस्ट्रेलियाचा जलदगति गोलंदाज या व दुसऱ्या सामन्यांत खेळूं शकला नाहीं.

दुसरा कसोटी सामना सिडने येथें ता. १३, १४ १६, १७, १८ व १९ डिसेंबर १९४६ रोजीं झाला. या सामन्यांत भावी काळांतील सर्वोत्कृष्ट

यष्टिरक्षक म्हणून गाजलेला गॉडफ्रे एव्हन्स याचा प्रथमच इंग्लिश संघांत समावेश करण्यांत आला.

पहिल्या कसोटी सामन्याप्रमाणें हाहि सामना गाजला. इंग्लंडचा कर्णधार वॉल्टर हॅमंड यानें टॉस जिंकून फलंदाजी घेतली. पण टॉस जिंकल्याचा इंग्लंडला फायदा मिळाला नाहीं. एड्रिच (६०), हटन (३९) व आयकिन (६०) यांच्याशिवाय कोणीच टिकाव धरूं शकले नाहीं व बलाढ्य इंग्लिश संघ अवघ्या २५५ धांवांत कोसळला. इआन जॉन्सननें उत्कृष्ट गोलंदाजी टाकून ४२ धावांत ६ खेळाडू बाद केले. या सामन्यांत ऑस्ट्रेलियाचा यष्टिरक्षक टॅलन यानें घेतलेला एक झेल रोमांचकारी होता. चेंडू फर्स्ट स्लिपमध्यें क्षेत्ररक्षण करीत असलेल्या जॉनसनकडे उडून त्याच्या छातीवर आदळला आणि टॅलननें सुरकांडी मारून त्याच्या छातीवरून उसळी मारून आलेला चेंडू झेलला.

या सामन्यांतहि डॉनच्या बाबतींत अंपायरनें दिलेल्या एका निर्णयावर बरीच चर्चा झाली. डॉननें मारलेला एक बंप बॉल शॉर्ट लेगवरच्या क्षेत्ररक्षकानें झेलला; आणि गोलंदाज बेडसरनें अर्धवट कचरत विचारलें, “ नाबाद नाहीं कां ?” अंपायरनें विचारलें, “ तुला अपील करावयाचें आहे कां ?” बेडसर उत्तरला, “ हो. ” अंपायरनें निकाल दिला, “ नाबाद.”

हा प्रसंग घडल्यावर डॉन ब्रॅडमन व सिड बार्नस यांनीं फारच बहारीनें खेळून पांचव्या विकेटीवर ४०५ धांवा करून नवीन उच्चांक निर्माण केला. डॉन आणि बार्नस संबंध दिवस खेळत होते आणि सिडनेच्या मैदानावर पूर्वी कधींहि नव्हते एवढे म्हणजे एकावन्न हजारांवर प्रेक्षक त्यांचा चमकदार खेळ पाहण्यास उपस्थित होते डॉनच्या पायाला मार बसला होता, तो लंगडत होता. पण त्या दिवशीं त्यानें अत्यंत प्रेक्षणीय फलंदाजी केली. दुसऱ्या दिवशीं २९४ धांवा झाल्या असतांना यार्डलेनें डॉनची विकेट घेतली व धांवा तेवढ्याच असतांना बार्नसलाहि बेडसरनें बाद केलें. स्वतः सिड बार्नस या प्रसंगाला उद्देशून म्हणतो, “ वस्तुतः मी यावेळीं बाद झालों नसतो. माझा जम बसला होता, आणि मी कदाचित् वैयक्तिक [illegible] उच्चांक केला असता. पण डॉन इतक्याच धांवा करून त्याच्याबरोबर [illegible] इतिहासांत

दिला. इंग्लिश गोलंदाज होस याने टाकलेला एक चेंडू जवळजवळ यॉर्कर होता. डॉननें तो स्लीपच्या बाजूनें मारताना बॅटीनें दाबला आणि चेंडू आयकिनच्या हातांत गेला. सर्व क्षेत्ररक्षकांनीं थोडया उशीरांच डॉनला बाद करण्याकरितां अंपायरकडे अपील केल. पण अंपायर वॉरविक यानें शांतपणें नाबाद असा निकाल दिला. वस्तुतः तो बंप बॉल होता. पण त्यावर बरेंच वादळ माजलें. नभोवाणीवरील समालोचकांनीं एकमतानें झेल नव्हता, असें जाहीर केलें तर वर्तमानपत्रांनीं त्यावर परस्परविरुद्ध मतें दिलीं. या सामन्यांतील दुसरा अंपायर स्कॉट यानेंहि पुढें वर्तमानपत्रांत लेख लिहून झेल गेला नव्हता असें जाहीर केलें. विशेषतः त्यानंतर डॉन ब्रॅडमननें १८७ धांवा केल्यामुळेंच या निर्णयाचा विशेष गाजावाजा झाला. डॉन म्हणतो, " अंपायरना अशा प्रसंगीं निर्णय देणें सोपें नसतें. लॉर्डस येथील एका सामन्यांत फ्रँक चेस्टर यानें एकदां हॅमंडला ' नाबाद ' ठरविलें होतें आणि ग्रिमेटनें झेल घेतला आहे अशी माझी बालंबाल खात्री होती. प्रेक्षक स्त्रियांना तर बंप बॉलला झेल म्हणून ओरडण्याची संवय असते आणि त्यांच्या मताप्रमाणें वागावयाचें झाल्यास, सर्वांनाच बंप बॉलवर बाद करावे लागेल. "

डॉनच्या शतकाशिवाय हॅसेट (१२८), मिलर (७९), मॅकूल (९५) यांनीं तडाखेबंद फलंदाजी करून धांवांचा आंकडा ६४५ वर नेऊन भिडविला. इंग्लंडच्या दोन्ही डावांत अनुक्रमें १४१ व १७२ धांवा झाल्या. ऑस्ट्रेलियाचा जलदगति गोलंदाज मिलर यानें पहिल्या डावांत ६० धांवांत ७ आणि दुसऱ्या डावांत १७ धावांत २ खेळाडू बाद केलें. टॉशॅकनें पहिल्या डावांत १७ धांवांत ३ बाद आणि दुसऱ्या डावांत ८२ धांवांत ६ खेळाडू बाद केलें. इंग्लंडचा भावी काळांत गाजलेला व आंतरराष्ट्रीय कसोटी सामन्यांत २३६ विकेटी घेऊन उच्चांक केलेला ॲलेक बेडसर हा गोलंदाजहि या सामन्यांत अधिक प्रसिद्ध झाला. मात्र कांजण्या आल्यामुळें रे लिंडवॉल हा ऑस्ट्रेलियाचा जलदगति गोलंदाज या व दुसऱ्या सामन्यांत खेळूं शकला नाहीं.

दुसरा कसोटी सामना सिडने येथें ता. १३, १४ १६, १७, १८ व १९ डिसेंबर १९४६ रोजीं झाला. या सामन्यांत भावी काळांतील सर्वोत्कृष्ट

यष्टिरक्षक म्हणून गाजलेला गॉडफ्रे एव्हन्स याचा प्रथमच इंग्लिश संघांत समावेश करण्यांत आला.

पहिल्या कसोटी सामन्याप्रमाणें हाहि सामना गाजला. इंग्लंडचा कर्णधार वॉल्टर हॅमंड यानें टॉस जिंकून फलंदाजी घेतली. पण टॉस जिंकल्याचा इंग्लंडला फायदा मिळाला नाहीं. एड्रिच (६०), हटन (३९) व आयकिन (६०) यांच्याशिवाय कोणीच टिकाव धरूं शकले नाहीं व बलाढ्य इंग्लिश संघ अवघ्या २५५ धांवांत कोसळला. इआन जॉन्सननें उत्कृष्ट गोलंदाजी टाकून ४२ धावांत ६ खेळाडू बाद केले. या सामन्यांत ऑस्ट्रेलियाचा यष्टिरक्षक टॅलन यानें घेतलेला एक झेल रोमांचकारी होता. चेंडू फर्स्ट स्लिपमध्यें क्षेत्ररक्षण करीत असलेल्या जॉनसनकडे उडून त्याच्या छातीवर आदळला आणि टॅलननें सुरकांडी मारून त्याच्या छातीवरून उसळी मारून आलेला चेंडू झेलला.

या सामन्यांतहि डॉनच्या बाबतींत अंपायरनें दिलेल्या एका निर्णयावर बरीच चर्चा झाली. डॉननें मारलेला एक बंप बॉल शॉर्ट लेगवरच्या क्षेत्ररक्षकानें झेलला; आणि गोलंदाज बेडसरनें अर्धवट कचरत विचारलें, "नाबाद नाहीं कां?" अंपायरनें विचारलें, "तुला अपील करावयाचें आहे कां?" बेडसर उत्तरला, "हो." अंपायरनें निकाल दिला, "नाबाद."

हा प्रसंग घडल्यावर डॉन ब्रॅडमन व सिड बार्नेस यांनीं फारच बहारीनें खेळून पांचव्या विकेटीवर ४०५ धांवा करून नवीन उच्चांक निर्माण केला. डॉन आणि बार्नेस सबंध दिवस खेळत होते आणि सिडनेच्या मैदानावर पूर्वीं कधींहि नव्हते एवढे म्हणजे एकावन्न हजारांवर प्रेक्षक त्यांचा चमकदार खेळ पाहण्यास उपस्थित होते डॉनच्या पायाला मार बसला होता, तो लंगडत होता. पण त्या दिवशीं त्यानें अत्यंत प्रेक्षणीय फलंदाजी केली. दुसऱ्या दिवशीं २९४ धांवा झाल्या असतांना यार्डलेनें डॉनची विकेट घेतली व धांवा तेवढ्याच असतांना बार्नेसलाहि बेडसरनें बाद केलं. स्वतः सिड बार्नेस या प्रसंगाला उद्देशून म्हणतो, "वस्तुतः मी यावेळीं बाद झालों नसतो. माझा जम बसला होता, आणि मी कदाचित् वैयक्तिक [illegible] उच्चांक केला असता. पण डॉन इतक्याच धांवा करून त्याच्याबरोबर [illegible] इतिहासांत

नांव करण्याचें मी पसंत केलें. " स्वतः सिड बार्नस हाहि झपाट्यानें धांवा करण्याबद्दल प्रसिद्ध आहे. पण डॉनपुढें तो त्या दिवशीं फिका पडला. डॉननें २३४ धांवा करण्याकरितां साडेसहा तास घेऊन चाराचे चोवीस फटके मारले, तर सिड बार्नसनें आपल्या २३४ धांवांना दहा तास घेऊन चाराचे सतरा फटके मारले.

डॉन व बार्नस बाद झाल्यावर ऑस्ट्रेलियन फलंदाजांनीं टोलेबाजी करून धांवसंख्या ६५९ ( आठ बाद ) वर नेली. डॉननें ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव पुरा झाल्याचें जाहीर केलें. इंग्लंडच्या दुसऱ्या डावांत ३७१ धांवा झाल्या. ऑस्ट्रेलियाचा एक डाव व ३३ धांवांनीं विजय झाला.

तिसरा कसोटी सामना ता. १, २, ३, ४, ६ व ७ जानेवारी १९४७ रोजीं मेलबोर्न येथें झाला. ऑस्ट्रेलियानें पहिले दोन सामने जिंकले होते. अशा स्थितींत सामन्यांबद्दल लोकांत औत्सुक्य राखण्याकरितां इंग्लंडला हा सामना जिंकणेंच भाग होते. उलट ऑस्ट्रेलियानें हा सामना अनिर्णित ठेवला तरी ॲशीस ऑस्ट्रेलियाकडे राहणार होत्या.

डॉननें टॉस जिंकला व फलंदाजी पत्करली, पण ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ३६५ धांवा झाल्या. त्यांत डॉनच्या ७९ धांवा होत्या. ऑस्ट्रेलियाचे मोठमोठे फलंदाज थोड्या धांवांत बाद झाले असतांना मॅकूलनें १०४ धांवा केल्या, हें वैशिष्ट्य आहे. इंग्लंडच्या पहिल्या डावांत ऑस्ट्रेलियापेक्षां चौदा धांवा कमी झाल्या (३५१).ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावांत ५३६ धांवा झाल्या. त्यांत मॉरीसच्या १५५ व लिंडवॉलच्या १०० धांवा केल्या. याशिवाय टॅलनच्या ९२ व डॉनच्या ४९ धांवा होत्या. विशेष म्हणजे लिंडवॉल आणि टॅलन यांनीं ८७ मिनिटांत १५४ धांवा केल्या. टॅलनचे ड्राईव्ह, स्क्वेअर कट आणि हूक आणि लिंडवॉलचे सणसणीत सरळ ड्राईव्हज हे या खेळाचे वैशिष्ट्य होते. इंग्लंडला सामना जिंकण्याकरिता ५५१ धावा पाहिजे असून वेळ सात तास होता. सामना जिंकणें अशक्य असल्यामुळें इंग्लंडनें बचावाचा खेळ खेळून सात तासांत ७ बाद ३१० धांवा करून सामना अनिर्णित राखला.

मेलबोर्नच्या मैदानावर सामना अनिर्णित राहण्याची घटना ऑस्ट्रेलियांत पूर्वी ६५ वर्षांत घडली नाहीं. ऑस्ट्रेलियांत कसोटी सामने पूर्वी निकाली खेळण्यांत येत. पण सन १९४६–४७ पासून कसोटी सामने सहा दिवसाचे खेळावेत, अशी मर्यादा घालण्यांत आली. तसेच मेलबोर्न येथें कसोटी सामन्यांत डॉनचें शतक न होण्याचा हा पहिलाच प्रसंग होता.

मेलबोर्नचा सामना सहा दिवसांत ३४३६७५ लोकांनीं पाहिला व त्यांत ४४०६३ पौंड नफा झाला व हे उत्पन्न म्हणजेहि एक उच्चांक होता.

चौथा कसोटी सामना ॲडेलेड येथें ता. ३१ जानेवारी, १, ३, ४, ५ व ६ फेब्रुवारी १९४७ रोजीं झाला. या सामन्यांत इंग्लंडनें टॉस जिंकून फलंदाजी घेतली व पहिल्या डावांत ४६० धांवा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ४८७ धांवा झाल्या. विशेष म्हणजे पहिल्या डावांत बेडसरनें डॉनची विकेट शून्यावर उडविली. इंग्लंडच्या दुसऱ्या डावांत ३४० धांवा झाल्या. आणि खेळ संपेपर्यंत ऑस्ट्रेलियानें दुसऱ्या डावांत एक बाद २१५ धांवा केल्या व सामना अनिर्णित राहिला. दुसऱ्या डावांत डॉन ब्रॅडमनच्या नाबाद ५६ धांवा होत्या.

या सामन्यांत अनेक वैशिष्ट्यपूर्ण घटना घडल्या. पहिली गोष्ट म्हणजे हा सामना १०५ डिग्री उष्णतेंत झाला. लिंडवॉलनें इंग्लंडच्या पहिल्या डावांत शेवटचे तीन खेळाडू फक्त चार चेंडूंत बाद केले. आणि त्याहिपेक्षां वैशिष्ट्य म्हणजे इंग्लंडतर्फे डेनिस कॉम्प्टन आणि ऑस्ट्रेलियातर्फे ऑर्थर मॉरीस यांनीं या सामन्यांतील दोन्ही डावांत अलग अलग शतकें ठोकण्याचा विक्रम केला. कॉम्प्टननें १४७ व नाबाद १०३ धांवा केल्या. तर मॉरीसनें १२२ व नाबाद १२४ धांवा केल्या. खुद्द ऑस्ट्रेलियांत हा विक्रम करणारा मॉरीस हाच पहिला ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू होता.

दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या कसोटी सामन्यांचें वैशिष्ट्य म्हणजे यष्टिरक्षक गॉडफ्रे एव्हन्स यानें या तिन्ही कसोटी सामन्यांत एकहि बाय–रन दिली नाहीं.

पहिले दोन कसोटी सामने ऑस्ट्रेलियानें जिंकले होते आणि नंतरचे दोन अनिर्णित राहिले होते. ॲशीस ऑस्ट्रेलियाकडे राहिल्या होत्या. तरीहि सिडने

दिला. इंग्लिश गोलंदाज होस यानें टाकलेला एक चेंडू जवळजवळ यॉर्कर होता. डॉननें तो स्लीपच्या बाजूनें मारताना बॅटीनें दाबला आणि चेंडू आयकिनच्या हातांत गेला. सर्व क्षेत्ररक्षकांनीं थोडया उशीरांच डॉनला बाद करण्याकरितां अंपायरकडे अपील केल. पण अंपायर वॉरविक यानें शांतपणें नाबाद असा निकाल दिला. वस्तुत: तो बंप बॉल होता. पण त्यावर बरेंच वादळ माजलें. नभोवाणीवरील समालोचकांनीं एकमतानें झेंल नव्हता, असें जाहीर केलें तर वर्तमानपत्रांनीं त्यावर परस्परविरुद्ध मतें दिलीं. या सामन्यांतील दुसरा अंपायर स्कॉट यानेंहि पुढें वर्तमानपत्रांत लेख लिहून झेंल गेला नव्हता असें जाहीर केलें. विशेषत: त्यानंतर डॉन ब्रॅडमननें १८७ धांवा केल्यामुळेंच या निर्णयाचा विशेष गाजावाजा झाला. डॉन म्हणतो, "अंपायरना अशा प्रसंगीं निर्णय देणें सोपें नसतें. लॉर्डस येथील एका सामन्यांत फ्रॅंक चेस्टर यानें एकदां हॅमंडला 'नाबाद' ठरविलें होतें आणि ग्रिमेटनें झेंल घेतला आहे अशी माझी बालंबाल खात्री होती. प्रेक्षक स्त्रियांना तर बंप बॉलला झेंल म्हणून ओरडण्याची संवय असते आणि त्यांच्या मताप्रमाणें वागावयाचें झाल्यास, सर्वांनाच बंप बॉलवर बाद करावे लागेल."

डॉनच्या शतकाशिवाय हॅसेट (१२८), मिलर (७९), मॅकूल (९५) यांनीं तडाखेबंद फलंदाजी करून धांवांचा आंकडा ६४५ वर नेऊन भिडविला. इंग्लंडच्या दोन्ही डावांत अनुक्रमें १४१ व १७२ धांवा झाल्या. ऑस्ट्रेलियाचा जलदगति गोलंदाज मिलर यानें पहिल्या डावांत ६० धांवांत ७ आणि दुसऱ्या डावांत १७ धावांत २ खेळाडू बाद केलें. टॉशॅकनें पहिल्या डावांत १७ धांवांत ३ बाद आणि दुसऱ्या डावांत ८२ धांवांत ६ खेळाडू बाद केलें. इंग्लंडचा भावी काळांत गाजलेला व आंतरराष्ट्रीय कसोटी सामन्यांत २३६ विकेटी घेऊन उच्चांक केलेला ॲलेक बेडसर हा गोलंदाजहि या सामन्यांत अधिक प्रसिद्ध झाला. मात्र कांजण्या आल्यामुळें रे लिंडवॉल हा ऑस्ट्रेलियाचा जलदगति गोलंदाज या व दुसऱ्या सामन्यांत खेळूं शकला नाहीं.

दुसरा कसोटी सामना सिडने येथें ता. १३, १४ १६, १७, १८ व १९ डिसेंबर १९४६ रोजीं झाला. या सामन्यांत भावी काळांतील सर्वोत्कृष्ट

यष्टिरक्षक म्हणून गाजलेला गॉडफ्रे एव्हन्स याचा प्रथमच इंग्लिश संघांत समावेश करण्यांत आला.

पहिल्या कसोटी सामन्याप्रमाणें हाहि सामना गाजला. इंग्लंडचा कर्णधार वॉल्टर हॅमंड यानें टॉस जिंकून फलंदाजी घेतली. पण टॉस जिंकल्याचा इंग्लंडला फायदा मिळाला नाहीं. एड्रिच (६०), इटन (३९) व आयकिन (६०) यांच्याशिवाय कोणीच टिकाव धरूं शकले नाहीं व बलाढ्य इंग्लिश संघ अवघ्या २५५ धांवांत कोसळला. इआन जॉन्सननें उत्कृष्ट गोलंदाजी टाकून ४२ धावांत ६ खेळाडू बाद केले. या सामन्यांत ऑस्ट्रेलियाचा यष्टिरक्षक टॅलन यानें घेतलेला एक झेल रोमांचकारी होता. चेंडू फर्स्ट स्लिपमध्यें क्षेत्ररक्षण करीत असलेल्या जॉनसनकडे उडून त्याच्या छातीवर आदळला आणि टॅलननें सुरकांडी मारून त्याच्या छातीवरून उसळी मारून आलेला चेंडू झेलला.

या सामन्यांतहि डॉनच्या बाबतींत अंपायरनें दिलेल्या एका निर्णयावर बरीच चर्चा झाली. डॉननें मारलेला एक बंप बॉल शॉर्ट लेगवरच्या क्षेत्ररक्षकानें झेलला; आणि गोलंदाज बेडसरनें अर्धवट कचरत विचारलें, "नाबाद नाहीं कां?" अंपायरनें विचारलें, "तुला अपील करावयाचें आहे कां?" बेडसर उत्तरला, "हो." अंपायरनें निकाल दिला, "नाबाद."

हा प्रसंग घडल्यावर डॉन ब्रॅडमन व सिड बार्नस यांनीं फारच बहारीनें खेळून पांचव्या विकेटीवर ४०५ धांवा करून नवीन उच्चांक निर्माण केला. डॉन आणि बार्नस सबंध दिवस खेळत होते आणि सिडनेच्या मैदानावर पूर्वी कधींहि नव्हते एवढे म्हणजे एकावन्न हजारांवर प्रेक्षक त्यांचा चमकदार खेळ पाहण्यास उपस्थित होते डॉनच्या पायाला मार बसला होता, तो लंगडत होता, पण त्या दिवशीं त्यानें अत्यंत प्रेक्षणीय फलंदाजी केली. दुसऱ्या दिवशीं २९४ धांवा झाल्या असतांना यार्डलेनें डॉनची विकेट घेतली व धांवा तेवढ्याच असतांना बार्नसलाहि बेडसरनें बाद केलें. स्वतः सिड बार्नस या प्रसंगाला उद्देशून म्हणतो, 'वस्तुतः मी यावेळीं बाद झालों नसतो. माझा जम बसला होता, आणि मी कदाचित् वैयक्तिक [illegible] उच्चांक केला असता. पण डॉन इतक्याच धांवा करून त्याच्याबरोबर [illegible] इतिहासांत

नांव करण्याचें मी पसंत केलें. " स्वतः सिड बार्नेस हाहि झपाट्यानें धांवा करण्याबद्दल प्रसिद्ध आहे. पण डॉनपुढें तो त्या दिवशीं फिक्का पडला. डॉननें २३४ धांवा करण्याकरितां साडेसहा तास घेऊन चाराचे चोवीस फटके मारले, तर सिड बार्नेसनें आपल्या २३४ धांवांना दहा तास घेऊन चाराचे सतरा फटके मारले.

डॉन व बार्नेस बाद झाल्यावर ऑस्ट्रेलियन फलंदाजांनीं टोलेबाजी करून धांवसंख्या ६५९ ( आठ बाद ) वर नेली. डॉननें ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव पुरा झाल्याचें जाहीर केलें. इंग्लंडच्या दुसऱ्या डावांत ३७१ धांवा झाल्या. ऑस्ट्रेलियाचा एक डाव व ३३ धांवांनीं विजय झाला.

तिसरा कसोटी सामना ता. १, २, ३, ४, ६ व ७ जानेवारी १९४७ रोजीं मेलबोर्न येथें झाला. ऑस्ट्रेलियानें पहिले दोन सामने जिंकले होते. अशा स्थितीत सामन्यांबद्दल लोकांत औत्सुक्य राखण्याकरितां इंग्लंडला हा सामना जिंकणेंच भाग होते. उलट ऑस्ट्रेलियानें हा सामना अनिर्णित ठेवला तरी ॲशीस ऑस्ट्रेलियाकडे राहणार होत्या.

डॉननें टॉस जिंकला व फलंदाजी पत्करली. पण ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ३६५ धांवा झाल्या. त्यांत डॉनच्या ७९ धांवा होत्या. ऑस्ट्रेलियाचे मोठमोठे फलंदाज थोड्या धांवांत बाद झाले असतांना मॅकूलनें १०४ धांवा केल्या, हें वैशिष्ट्य आहे. इंग्लंडच्या पहिल्या डावांत ऑस्ट्रेलियापेक्षां चौदा धांवा कमी झाल्या (३५१). ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावांत ५३६ धांवा झाल्या. त्यांत मॉरीसच्या १५५ व लिंडवॉलच्या १०० धांवा केल्या. याशिवाय टॅलनच्या ९२ व डॉनच्या ४९ धांवा होत्या. विशेष म्हणजे लिंडवॉल आणि टॅलन यांनीं ८७ मिनिटांत १५४ धांवा केल्या. टॅलनचे ड्राईव्ह, स्क्वेअर कट आणि हूक आणि लिंडवॉलचे सणसणीत सरळ ड्राईव्हज हे या खेळाचे वैशिष्ट्य होते. इंग्लंडला सामना जिंकण्याकरिता ५५१ धावा पाहिजे असून वेळ सात तास होता. सामना जिंकणें अशक्य असल्यामुळें इंग्लंडनें बचावाचा खेळ खेळून सात तासांत ७ बाद ३१० धांवा करून सामना अनिर्णित राखला.

मेलबोर्नच्या मैदानावर सामना अनिर्णीत राहण्याची घटना ऑस्ट्रेलियांत पूर्वी ६५ वर्षांत घडली नाहीं. ऑस्ट्रेलियांत कसोटी सामने पूर्वी निकाली खेळ-ण्यांत येत. पण सन १९४६-४७ पासून कसोटी सामने सहा दिवसाचे खेळावेत, अशी मर्यादा घालण्यांत आली. तसेच मेलबोर्न येथें कसोटी सामन्यांत डॉनचें शतक न होण्याचा हा पहिलाच प्रसंग होता.

मेलबोर्नचा सामना सहा दिवसांत ३४३६७५ लोकांनीं पाहिला व त्यांत ४४०६३ पौंड नफा झाला व हे उत्पन्न म्हणजेहि एक उच्चांक होता.

चौथा कसोटी सामना ॲडेलेड येथें ता. ३१ जानेवारी, १, ३, ४, ५ व ६ फेब्रुवारी १९४७ रोजीं झाला. या सामन्यांत इंग्लंडनें टॉस जिंकून फलंदाजी घेतली व पहिल्या डावांत ४६० धांवा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ४८७ धांवा झाल्या. विशेष म्हणजे पहिल्या डावांत बेडसरनें डॉनची विकेट शून्या-वर उडविली. इंग्लंडच्या दुसऱ्या डावांत ३४० धांवा झाल्या. आणि खेळ संपे-पर्यंत ऑस्ट्रेलियानें दुसऱ्या डावांत एक बाद २१५ धांवा केल्या व सामना अनिर्णीत राहिला. दुसऱ्या डावांत डॉन ब्रॅडमनच्या नाबाद ५६ धांवा होत्या.

या सामन्यांत अनेक वैशिष्ट्यपूर्ण घटना घडल्या. पहिली गोष्ट म्हणजे हा सामना १०५ डिग्री उष्णतेंत झाला. लिंडवॉलनें इंग्लंडच्या पहिल्या डावांत शेवटचे तीन खेळाडू फक्त चार चेंडूंत बाद केलें. आणि त्याहिपेक्षां वैशिष्ट्य म्हणजे इंग्लंडतर्फे डेनिस कॉम्प्टन आणि ऑस्ट्रेलियातर्फे ऑर्थर मॉरीस यांनीं या सामन्यांतील दोन्ही डावांत अलग अलग शतकें ठोकण्याचा विक्रम केला. कॉम्प्टननें १४७ व नाबाद १०३ धांवा केल्या. तर मॉरीसनें १२२ व नाबाद १२४ धांवा केल्या. खुद्द ऑस्ट्रेलियांत हा विक्रम करणारा मॉरीस हाच पहिला ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू होता.

दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या कसोटी सामन्यांचें वैशिष्ट्य म्हणजे यष्टिरक्षक गॉडफ्रे एव्हन्स यानें या तिन्ही कसोटी सामन्यांत एकहि बाय-रन दिली नाहीं.

पहिले दोन कसोटी सामने ऑस्ट्रेलियानें जिंकले होते आणि नंतरचे दोन अनिर्णीत राहिले होते. ॲशीस ऑस्ट्रेलियाकडे राहिल्या होत्या. तरीहि सिडने

येथें ता. २८ फेब्रुवारी, १, ३, ४ व ५ मार्च १९४७ रोजीं झालेल्या पांचव्या कसोटी सामन्याला विलक्षण रंग चढला.

इंग्लंडचा कर्णधार वॉल्टर हॅमंड यानें टॉस जिंकून फलंदाजी पत्करली. पण रे लिंडवॉलनें फक्त ६३ धांवांत ७ खेळाडू बाद करून इंग्लिश फलंदाजीचा कणाच मोडला. लेन हटनशिवाय कोणीहि त्याला तोंड देऊं शकला नाहीं. लेन हटननें या पहिल्या डावांत १२२ धांवा काढल्या. या सामन्यांतील हें एकमेव शतक होतें. हटन खेळतांनाच एकाएका आजारी झाल्यामुळें त्याला रिटायर व्हावें लागले. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत तर इंग्लंडपेक्षांहि कमी म्हणजे २५३ धांवा झाल्या. त्यांत बार्नसच्या ७१, मॉरीसच्या ५२ धांवा होत्या. डॉननें फक्त १२ धांवा केल्या इंग्लंडच्या राईट या गोलंदाजानें १०५ धांवांत ७ खेळाडू बाद केलें.

पण दुसऱ्या डावांत इंग्लंडच्या अवघ्या १८६ धांवा झाल्या. मॅकूलनें इंग्लंडच्या दुसऱ्या डावांत ४४ धांवांत ५ खेळाडू बाद केलें.

शेवटचा दिवस नाट्यमय होता. ऑस्ट्रेलियाला सामना जिंकण्यास २१४ धांवा पाहिजे होत्या. विकेट गोलंदाजांना अनुकूल होती. तरीहि बार्नस आणि मॉरीस यानीं सुरुवात छान केली होती. पंचेचाळीस धांवा झाल्या आणि मॉरीस रन-आऊट झाला. डॉन ब्रॅडमन खेळण्यास गेला. आणखी सहा धांवा झाल्या व ऑस्ट्रेलियाची दुसरी विकेट गेली (बार्नस ३०). हॅसेट डॉनच्या जोडीला गेला. डॉनच्याहि दोन धांवा झाल्या असतांना झेल गेला होता. पण तो एड्रिचनें सोडला आणि सामन्याला निराळें वळण लागलें. त्यानंतर डॉननें ६३ व हॅसेटनें ३४ धांवा करून तिसऱ्या विकेटवर १४९ धांवांची भर घातली आणि ऑस्ट्रेलियाला पराभवांतून निभावून नेलें. ऑस्ट्रेलियानें हा सामना पांच विकेटीनें जिंकला.

महायुद्धानंतर प्रथमच सुरू झालेलें हे कसोटी सामने पाहण्यास क्रिकेट-षौकिनांची चिकार गर्दी होई. यावेळीं पांचहि कसोटी सामने साडे आठ लक्ष लोकांनीं पाहिले. लोक अक्षरशः खेळ आणि करमणूक यांचे भुकेलेले होते.

●●●

# १३ भारताचा ऑस्ट्रेलियांतील दौरा

सन १९४७-४८ मध्यें भारतीय संघ आस्ट्रेलियांत गेला. डॉनवर इंग्लंडबरोबरच्या झालेल्या कसोटी सामन्यांचा मोठा ताण पडला होता. तरीहि ऑस्ट्रेलियांत प्रथमच येणाऱ्या भारतीय खेळाडूंची निराशा होऊं नये, यासाठीं त्यानें कसोटी सामन्यांत खेळण्याचें ठरविलें.

ऑस्ट्रेलियांत जाणाऱ्या या भारतीय संघाचे नेतृत्व प्रथम विजय मर्चंट याच्याकडे देण्यांत आले होते. विजय मर्चंटनें एक महान् फलंदाज म्हणून नांव कमाविलें होतें. पण पुढें जखम झाल्यामुळें त्यानें आपलें नांव मागें घेतलें. मर्चंटप्रमाणेंच रुसी मोदी, मुस्ताक अली व फाजल महंमद यांनाहि ऑस्ट्रेलियाची सफर करणें कांहीं ना कांहीं कारणामुळ अशक्य झालें, डॉन म्हणतो, " या प्रमुख खेळाडूंच्या नकारामुळें भारतीय संघावर प्रतिकूल परिणाम झाला. पण विशेषतः मर्चंटच्या अभावामुळेंच भारताचा कसोटी सामन्यांत निराशजनक खेळ झाला, असें मला वाटते. "

मर्चंटच्या अभावीं लाला अमरनाथ याजकडे भारतीय संघाचे नेतृत्व आलें. अमरनाथशिवाय या संघांत विजय हजारे, वि मनकड, अधिकारी, फडकर, सोहोनी, अमीर इलाहि, किसनचंद, गुलमहंमद, सरवटे, इराणी, सेन, रंगाचारी, रांगणेकर, रामसिंग, सी. एस. नायडू हे खेळाडू होते. ऑस्ट्रेलिया व भारत यांच्यामधील या कसोटी सामन्यांबद्दल लोकांत खूप उत्साह होता. सामने पाहण्यास खूप गर्दीहि होई. पण या सामन्यांत ऑस्ट्रेलियन संघ वरचढ असल्याचें प्रथमपासून दिसत होते. डॉन ब्रॅडमननें त्यांची कारणमिमांसा पुढील-

प्रमाणें केली. " पहिली गोष्ट म्हणजे भारतीय संघाची गोलंदाजी चांगली असली तरी त्यांच्यांत जलद्गति गोलंदाज कोणी नव्हता. तसेंच अगदीं वरच्या दर्जाचा फिरकी गोलंदाज कोणी नव्हता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे भारतीय खेळाडूंचें क्षेत्र-रक्षण कमकुवत होतें. कॉन्स्टन्टाईनसारख्या वेस्ट इंडिजमधील खेळाडूचें चापल्य पाहिल्यावर मला असें वाटलें कीं क्षेत्ररक्षणाच्या बाबतींत आमचे पाहुणे प्रबळ ठरतील. पण त्यांतच ते सर्वांत कमकुवत ठरले. "

या भारतीय संघाचा पहिला सामना डॉन ब्रॅडमनच्या द. ऑस्ट्रेलियन संघाशी ता. २४, २५, २७ व २८ ऑक्टोबर १९४७ रोजीं ॲडेलेड येथ झाला. डॉननें टॉस जिंकून फलंदाजी स्वीकारली. द. ऑस्ट्रेलिया संघाच्या ८ बाद ५१८ धांवा झाल्यावर डॉननें आपला पहिला डाव पुरा झाल्याचें जाहीर केलें. दक्षिण ऑस्ट्रेलियाच्या निहस, क्रेग आणि डॉन या तिघांहि फलंदाजांनीं शतकें ठोकलीं ! डॉननें १५६ धांवा केल्या त्यात चाराचे बावीस फटके होते !

भारताच्या पहिल्या डावांत ४५१ धांवा झाल्या. त्यांत लाला अमर-नाथच्या १४४ धांवा होत्या. द. ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावांत आठ बाद २११ धांवा झाल्या. भारताला सामना जिंकण्याकरितां २८७ धांवा पाहिजे होत्या. भारताच्या पहिल्या चार विकेटी जलद पडल्या. अवघ्या साठ धांवा झाल्या होत्या. पण त्यानंतर विनू मनकड (११६) व लाला अमरनाथ ( नाबाद ९४ ) यांनीं तडफदार खेळून हा सामना वाचविला.

यानंतर डॉनच्या दृष्टीनें उल्लेखनीय सामना म्हणजे भारत विरुद्ध ऑस्ट्रे-लियन एलव्हेन हा होय. हा सामना सिडने येथें ता. १४, १५, १७ व १८ नोव्हेंबर १९४७ रोजीं झाला.

यापूर्वी डॉननें पहिल्या दर्जाच्या सामन्यांत ९९ शतकें ठोकलीं होतीं. भारतानें टॉस जिंकून फलंदाजी घेतली व पहिल्या डावांत ३२६ धांवा केल्या. ऑस्ट्रेलियन एलव्हनची पहिली विकेट लौकर पडली व डॉनला बचावाचा खळ खेळावा लागत होता. डॉनचा जोडीदार कीथ मिलर होता. भारताची गोलंदाजी उत्तम व अचूक पडत होती. या सामन्यांत डॉन शंभरावें शतक ठोकणार, असें वर्तमानपत्रांनीं जाहीर करण्यामुळें क्रीडांगणावर लोकांची तुफान गर्दी जमली होती.

हळुहळू डॉननें ९० धांवा केल्या. आपल्या आवडत्या सिडनेच्या मैदानावरच आपलें शंभरावें शतक व्हावें, असें त्याला मनापासून वाटत असल्यामुळें त्याचा खेळ बाजवीपेक्षां सावधगिरीचा होऊं लागला. त्यानंतर त्यानें स्क्वेअर लेगला फटका मारून एक धांव घेतली आणि पुनः दुसरी धांव घेण्यासाठीं तो धांवूं लागला. लोकांना ही दुसरी धाव घेणें धोक्याचें वाटलें. सर्व प्रेक्षक एकदम बेभान होऊन उभे राहिले. डॉन म्हणतो, " कसोटी सामन्यांतहि मला इतका रोमांचकारी अनुभव कधीं आला नव्हता. लोक उन्मादून गेले होते व क्रीडांगणावरील वातावरण भारून गेलें होतें. "

डॉनच्या ९९ धांवा झाल्या. अमरनाथनें सीमेवर क्षेत्ररक्षण करीत असलेल्या किसनचंदला बोलावून गोलंदाजी दिली. डॉनला किसनचंदच्या गोलंदाजीची कांहींच कल्पना नसल्यामुळें तो त्याच्या गोलंदाजीवर सावधगिरीनें खेळूं लागला. लोकांत खूप हंशा पिकला. अखेर मिड-ऑनला एक चेंडू टोलावून डॉननें शंभरावी धांव घेऊन पहिल्या दर्जाच्या सामन्यांतील आपलें शंभरावें शतक पुरें केलें. कै. दुलिपसिंह यांनीं आपल्या एका लेखांत या वेळच्या लोकांच्या मनःस्थितीचें छान वर्णन केलें आहे. दुलिपसिंग म्हणतात, " ऑर्थर मेली व मी प्रेस गॅलरींत बसलों होतों. लोकांचा उत्साह कोणत्या शीगेला पोहोंचला आहे, हें पाहण्यासाठीं मी प्रेस गॅलरीच्या खिडकीचें दार उघडलें आणि त्यानंतर टाळयांचा कानठळ्या बसविण्याइतका आवाज येऊं लागला. वाटलें कीं, त्यामुळें वरचें छप्पर कोसळून पडणार ! " डॉननें हीं शंभर शतकें फक्त २९५ डावांत पुरी केलीं. जॅक हॉब्जनें पहिल्या दर्जाच्या सामन्यांत १९७ शतकें ठोकलीं होतीं. पण त्याकरितां त्याला १३१५ डाव खेळावे लागले होते. जॅक हॉब्जला कौंटी सामन्यामुळें इतके डाव खेळतां आले. पण आस्ट्रेलियांत इंग्लंडच्या मानानें क्रिकेट कमी काळ व मर्यादित चालत असल्यामुळें डॉनचा हा पराक्रम उल्लेखनीय होता. शतक पुरें झाल्यावर लोकांना खूष करण्यासाठीं त्यानें चौफेर टोलेबाजी सुरू करून १७२ धांवा केल्या. मिलरनें त्याला सुंदर साथ देऊन स्वतःच्या ८६ धांवा केल्या. पण ब्रॅडमन व मिलर यांच्यानंतर कोणीहि ऑस्ट्रेलियन फलंदाज फारसा टीकाव

धरूं शकला नाहीं व ऑस्ट्रेलियन एलेव्हन हा संघ ३८० धांवांत बाद झाला. भारतानें आपला दुसरा डाव ९ बाद २०४ धांवा झाल्यावर पुरा केला. ऑस्ट्रेलियन एलेव्हनच्या दुसऱ्या डावांत २०३ धांवा झाल्या व भारताचा ४७ धांवांनीं विजय झाला.

पहिला कसोटी सामना बिस्बेन येथें ता. २८, २९ नोव्हेंबर व १, २, ३ व ४ डिसेंबर १९४७ रोजीं झाला. डॉननें टॉस जिंकून फलंदाजी पत्करली. ऑस्ट्रेलियाची पहिली विकेट ३८ वर पडली ( ब्राऊन ११ ) व डॉन खेळण्यास आला व आपल्या आयुष्यांतील आणखी एक बहारीचा डाव तो खेळला. पहिल्या दिवशीं ऑस्ट्रेलियाच्या ३ बाद २७३ धांवा झाल्या. त्यापैकीं डॉनच्या १६० ( नाबाद ) धांवा होत्या. दुसऱ्या दिवशीं पाऊस पडून फक्त संध्याकाळीं एक तास खेळ झाला. तरीहि मैदानावर ११ हजार प्रेक्षक हजर होते ! पाऊस पडल्याचा फायदा घेऊन डॉननें ८ बाद ३८२ धांवावर आपला पहिला डाव पुरा झाल्याचें जाहीर केलें ( डॉन १८५ ). पण या दमट विकेटवर खेळणें भारताला अशक्य झालें आणि भारताच्या दोन्ही डावांत अनुक्रमें ५८ व ९८ धांवा होऊन ऑस्ट्रेलियाचा एक डाव २२६ धांवांनी विजय झाला.

या सामन्यांत ऑस्ट्रेलियन गोलंदाज तोशॅक याची गोलंदाजी अभूतपूर्व पडली. त्यानें पहिल्या डावांत फक्त दोन धांवांत पांच खेळाडू बाद केलें तर दुसऱ्या डावांत २९ धांवांत सहा खेळाडू बाद केलें !

दुसरा कसोटी सामना सिडने येथें होता. पण सहा दिवसांच्या काळांत पावसामुळें फक्त दहा तास खेळ होऊं शकला. भारतानें पहिल्या डावांत १८८ व दुसऱ्या डावांत ७ बाद ६१ धांवा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत १०७ धांवा झाल्या. ऑस्टेलियाच्या बाजूनें लिंडवॉल आणि मिलर या तुफानी गोलदाजांनीं भारताचा खुर्दा केला तर भारताच्या वतीनें अमरनाथ आणि मनकड या फिरकी गोलंदाजांनीं ऑस्ट्रेलियाचा धुव्वा उडविला. खुद्द डॉन ब्रॅडमनची विकेट विजय हजारेन फक्त १३ धांवांवर घेतली

पाऊस पडून कसोटी सामन्यांत फक्त दोनच दिवस खेळ झाल्याचें हें पहिलेंच उदाहरण होतें.

तिसरा कसोटी सामना मेलबोर्न येथें ता. १, २, ३ व ५ जानेवारी १९४८ रोजीं होऊन ऑस्टेलियानें तो २३३ धांवांनीं जिकला. हा सामनाहि पुनः डॉन ब्रॅडमननें गाजविला. दोन्हीं डावांत शतकें ठोकून त्यानें असा पराक्रम करणाऱ्या मोजक्या खेळाडूंत स्थान मिळविले.

डॉननें टॉस जिंकला व प्रथम फलंदाजी पत्करली. ऑस्ट्रेलियाच्या ३९४ धांवा झाल्या. त्यांत डॉनच्या १३२ धावा होत्या.

भारताच्या पहिल्या डावांत २९१ धांवा झाल्या. त्यांत विनू मनकडच्या ११६ धांवा होत्या.

ऑस्ट्रेलियानें आपला दुसरा डाव ४ बाद २५५ धांवा झाल्यावर पुरा केला. त्यांत डॉनच्या नाबाद १२७ धांवा होत्या. पण दुसऱ्या डावांत भारताच्या अवघ्या १२५ धांवा झाल्या व ऑस्ट्रेलियाचा २३३ धांवांनीं विजय झाला.

चौथा कसोटी सामना ॲडेलेड येथें ता. २३, २४, २६, २७ व २८ जानेवारी रोजीं झाला. हा सामनाहि ऑस्ट्रेलियानें एक डाव व १६ धांवांनीं जिंकला.

डॉन ब्रॅडमननें पुनः टॉस जिंकला. ऑस्ट्रेलियाची पहिली विकेट २० वर पडली (मॉरीस ७). त्यानंतर डॉन ब्रॅडमन आणि बार्नेस यांनीं दुसऱ्या विकेटवर २३६ धांवांची भर घालून धांवांचा आंकडा २५६ वर नेला. बार्नेस बाद झाला व हॅसेट आला. डॉननें हॅसेटच्या मदतीनें धांवांची संख्या ३६१ वर नेली. या दिवशीं डॉनचें जणूं काय क्रीडांगणावर प्रभुत्व होतें. पहिल्या दिवशीं ३४१ धांवांपैकीं त्याच्याच २०१ धांवा होत्या. या सामन्यांत डॉन ब्रॅडमनच्या द्वि-शतकाशिवाय, हॅसेटच्या १९८, बार्नेस याच्या ११२ व मिलर याच्या ६७ धांवा होत्या. ऑस्ट्रेलियाच्या एकंदर ६७४ धांवा झाल्या. भारताच्या पहिल्या डावांत ३८१ व दुसऱ्या डावांत २७७ धांवा झाल्या. पण भारताच्या दृष्टीनं अभिमानाची गोष्ट म्हणजे विजय हजारे यानें या सामन्यांत दोन अलग अलग शतकें ठोकलीं. पहिल्या डावांत त्यानें ११६ धांवा केल्या, तर दुसऱ्या डावांत १४५ धांवा केल्या. फडकर यानेंहि या सामन्यांत शतक ठोकलें.

खुद डॉननहि या सामन्यांत आणखी एका उच्चांक केला. त्यानें या सामन्यांत द्विशतक ठोकून इतर कोणाहि क्रिकेटपटूपेक्षां पहिल्या दर्जाच्या सामन्यांत अधिक द्विशतकें ठोकण्याचा मान संपादन केला. यापूर्वी हॅमंडची छत्तीस द्विशतकें हा उच्चांक होता. डॉननें ३७ द्विशतकें करून त्याचा उच्चांक मोडला.

पांचवा कसोटी सामना पुनः मेलबोर्न येथें ता. ६, ७, ९ व १० फेब्रुवारी १९४८ रोजी झाला.

याहि खेपेस डॉननें टॉस जिंकला व फलंदाजी पत्करली. ऑस्ट्रेलियाच्या (८ बाद) ५७५ धांवा झाल्या. कसोटी सामन्यांत प्रथम प्रवेश करीत असलेल्या नील हार्वेनें या सामन्यांत १५३ धांवा केल्या. स्वतः डॉन प्रभुत्वानें खेळत होता. पण खेळतां खेळतां त्याचा पाय लचकला आणि तो या सामन्यांतून निवृत्त झाला.

भारताच्या पहिल्या डावांत ३३१ धांवा झाल्या. त्यापैकीं विनू मनकड याच्या १११ धांवा असून विजय हजारेच्या ७४ धांवा होत्या. पण दुसऱ्या डावांत भारताच्या सर्व बाद अवघ्या ६७ धांवा होऊन, हाहि सामना ऑस्ट्रेलियानें एक डाव व १७७ धांवांनीं जिंकला.

भारताबरोबरचा पांचवा कसोटी सामना सुरू होण्यापूर्वी डॉननें वृत्तपत्र प्रतिनिधींची बैठक घेऊन पुढील निवेदन केलें.

"इंग्लंडमध्यें ऑस्ट्रेलियाचा जो संघ जाईल, त्यांतून जाण्याची माझी तयारी आहे, असें मी निवड समितीला कळविलें आहे. त्याबरोबरच मी हेंहि सांगू इच्छितो कीं भारताबरोबरचा हा सामना म्हटजे ऑस्ट्रेलियांतील माझा शेवटचा पहिल्या दर्जाचा सामना होय."

भारताबरोबर ऑस्ट्रेलियाचे जे कसोटी सामने झाले त्या अनुरोधानें डॉननें भारतीय खेळाडूंविषयीं जीं मतें व्यक्त केलीं आहेत, तीं उद्बोधक आहेत... "भारताचा संघ ऑस्ट्रेलियाच्या तोडीचा नव्हता, भारताचा प्रथम निवडलेला संघ आला असता तर कदाचित् वेगळा प्रकार दिसला असता," असें नमूद करून डॉन म्हणतो,

"आम्ही भारताबरोबरच्या पहिल्या कसोटी सामन्याकरितां जमलों, तेव्हां फलंदाज या नात्यानें हजारे श्रेष्ठ कीं अमरनाथ श्रेष्ठ याबद्दल माझी माझ्या

सहकाऱ्याबरोबर खूप चर्चा झाली. अमरनाथ ऑस्ट्रेलियांतील एकदोन राज्या-बरोबरच्या सामन्यांत उत्कृष्ट खेळला होता पण माझ्यावर हजारेची भरंवश्याची आणि त्याचा अचूक फटके यांचा परिणाम झाला...... अमरनाथ हा भराभर धांवा करीत असे...आणि त्याचा व्हिक्टोरियाविरुद्धचा खेळ म्हणजे मेलबोर्नच्या मैदानावर पाहिलेल्या सर्वोत्कृष्ट खेळांपैकीं होता.

" पण कसोटी सामन्यांत मात्र अमरनाथपेक्षां हजारेचेंच तेज पडलें. कदाचित् कर्णधाराच्या जबाबदारीचा अमरनाथच्या मनावर ताण पडला असावा. पण मला असें वाटतें कीं अमरनाथ आपली दृष्टि आणि कर्तृत्व यावर वाजवी-पेक्षां फाजील विश्वास बाळगून नको ते चेंडू फटकाविण्याचा प्रयत्न करी आणि अनाठायीं साहस करी. यामुळें अनेक वेळां तो बाद झाला.

" हजारे असें धाडस करीत नसें. पण सामना जिंकू पाहणाऱ्या फलंदाजांत जी आक्रमकता लागते, तिचा हजारेंत अभाव होता. माझ्या दृष्टीनें त्याच्यात हाच एक दोष होता. "

यानंतर " फलंदाजीच्या बाबतींत अमरनाथ आणि हजारे हे चांगलेच चमकले आणि जगांतील नामांकित क्रिकेटपटूंत त्यांची गणना करावयास हरकत नाहीं, " असें मत प्रदर्शित करून डॉन ब्रॅडमन म्हणतो:

" मनकडनें फलंदाजीच्या बाबतींत आश्चर्यकारकरित्या कामगिरी केली. तसेंच त्याला गोलंदाजीच्या बाबतींत वाजवीपेक्षां जादा ताण सहन करावा लागला.

" या दौऱ्यांत खूप सुधारणा झालेला व शेवटीं शेवटीं छान कामगिरी केलेला खेळाडू म्हणजे फडकर. तो जलद मध्यमगति गोलंदाजी टाकतो, त्याचे गोलंदाजीवर चांगलेच नियंत्रण असून विविधता आहे. तो लढवय्या फलंदाज आहे."

या दौऱ्यांत डॉननें भारतीय खेळाडूंना सर्वतोपरी मदत केली. भारताच्या या दौऱ्याला उद्देशून तो म्हणतो, " इंग्लंड आणि ऑस्टेलिया यांच्यामधील कसोटी सामने अद्यापहि सर्वांत श्रेष्ठ दर्जाचे आहेत. पण ते तसे कायमचे राहूं शकणार नाहींत. आणि इतर राष्ट्रांनीं त्यांत जर कौशल्य दाखविलें तर त्यामुळें इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यांतील टेस्ट क्रिकेटहि सुधारेल."

●●●

# १४ इंग्लंडचा अभूतपूर्व दौरा

सन १९४८ सुरू झाले. डॉन ब्रॅडमन हा क्रिकेटपटू या नात्यानें इंग्लंडची शेवटची सफर करणार हें नक्की झालें. आस्ट्रेलियांत साधारणतः क्रिकेटपटु हे ३५–३६ वर्षांपर्यंत क्रिकेटजीवनांतून निवृत्त होतात. डॉनची इच्छाहि सन १९४६ मध्येंच निवृत्त होण्याची होती. पण डॉन हा असाधारण क्रिकेटपटु होता आणि क्रिकेटच्या खेळांतील लोकांचें औत्सुक्य वाढविण्याकरितां विशेषतः युद्धोत्तर काळांत क्रिकेटला पुनः जोराची चालना देण्याकरितां, त्याला क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा बेत लांबणीवर टाकावा लागला होता.

डॉन ब्रॅडमनला पुनः इंग्लंडला जाणाऱ्या संघाचा कर्णधार निवडण्यांत आले. लौकरच संघांतील इतर खेळाडूंचीहि निवड झाली. हा संघ सर्वत्र दृष्टीनें सर्वोत्कृष्ट होता. सिड बॉर्नेस व ऑर्थर मॉरीस हे आघाडीचे फलंदाज होते. यापैकीं बॉर्नेसनें तर तर यापूर्वींच जागतिक दर्जाचे आघाडीचे फलंदाज आहोंत हें दाखवून दिलें होतें आणि ऑर्थर मॉरीस हा ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेट क्षितिजावर उगवलेला नवा तेजस्वी तारा होता. याशिवाय जिब्राल्टरच्या खडका-प्रमाणें एक बाजू लढविणारा बिल ब्राऊन हा राखीव आघाडीचा फलंदाजहि घेण्यांत आला.

या आघाडीच्या फलंदाजानंतर स्वतः डॉन ब्रॅडमन, लिंडसे हॅसेट, हॅमेन्स आणि नवोदित तेजस्वी नील हार्वे हे फलंदाज होते. कीथ मिलर आणि लॉक्सटन यांचा सर्वांगिण खेळाडू म्हणून समावेश करण्यांत आला. मिलर हा आक्रमक

जलदगति गोलंदाज व उत्कृष्ट क्षेत्ररक्षक असून लॉक्स्टन हा लढवय्या फलंदाज होता. लॉक्स्टन हा जगांतील एक धोकेबाज क्षेत्ररक्षक समजला जाई. त्यांच्या बहिरी ससाण्याच्या झेपामुळें कोणता फलंदाज कधीं झेलबाद किंवा रन-आऊट जाईल, याची खात्री नसे.

त्यानंतर इआन जॉन्सन, मॅकूल आणि लिंडवॉल हे नामवंत गोलंदाज - पण सर्वांगिण खेळाडूंत बसणारे क्रिकेटपटू होते. याशिवाय डग्लस रिंग आणि बिन जॉन्स्टन या नामवंत गोलदांजांचाहि समावेश करण्यांत आला.

यष्टिरक्षक म्हणून टॅलन आणि सॅगर्स या दोन महान् यष्टिरक्षकांना घेण्यांत आलें. ते दोघे चांगले फलंदाजहि होते.

डॉनच्या मानानें हे सर्व क्रिकेटपटू तरुण होते. त्यांना डॉनविषयीं अतिशय आदर होता. ४० वर्षांचा डॉन ब्रॅडमन हा कांहींजणांना तर वडलांप्रमाणें होता. तसच डॉनच्या असामान्यत्वामुळें तो सर्वांचाच 'हिरो' होता. त्यामुळे या संघात शिस्त राहण्यासहि कांहीं अडचण नव्हती. स्वत: डॉनहि त्यांना विश्वासांत घेऊन इंग्लंडात गेल्यावर कोणते तंत्र अनुसरावयाचे याची खुल्या दिलाने चर्चा करी. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्यें खेळतांना कोणतें दोष टाळलें पाहिजत, याची त्यानें त्यांना जाणीव करून दिली. डॉननें सर्वच खेळाडूंत आपला संघ इंग्लंडमध्यें अजिंक्य राहणार, असा आत्मविश्वास निर्माण केला.

इंग्लंडला जाण्याकरितां डॉननें ता. ३ मार्च १९४८ रोजीं घर सोडले आणि त्यानंतर त्यानें पर्थ येथील अपंग मुलांच्या इस्पितळाला भेट दिली. डॉन हा विख्यात क्रिकेटपटू म्हणून गाजला, पण त्याबरोबर त्याच्या जीवनाला इतरहि अनेक रमणीय पैलू होते. डॉनला लहान मुलें फार प्रिय आहेत विशेषत: अनाथ आणि अपंग मुलांविषयीं कांहींतरी करावें, असें त्याला वाटतें. याचकरितां इंग्लंडच्या दौऱ्यावर निघतांना त्यानें वेळांत वेळ काढून अपंग मुलांच्या इस्पितळाला भेट दिली, त्यांच्यांत कांहीं वेळ घालविला आणि त्यांना उल्हासित केलें. लहान मुलांचा आशीर्वाद हाच आपल्या यशाचा मुख्य आधार आहे असें डॉन ब्रॅडमनला वाटतें कीं काय कोण जाणें !

ता. १९ मार्च १९४८ रोजीं डॉन ब्रॅडमनचा हा संघ स्ट्रॅथाईर्ड या

बोटीनें इंग्लंडला जाण्याकरितां निघाला. ऑर्थर मेली हा सुप्रसिद्ध माजी क्रिकेटपटूहि या संघाबरोबर जाण्यास निघाला. तो म्हणाला, " ही माझी शेवटची सफर " खेळाडूंना निरोप देण्यासाठीं बरोबर लोकांची तुफान गर्दी जमली होती. त्यांतच एका दांपत्याचें जोरांत भांडण सुरू झालें. शेवटीं बायको संतापली व म्हणाली, " मला यापेक्षां जास्त काय करतां आलें असतें ? "

ऑर्थर मलीचे " ही माझी शेवटची सफर " आणि त्यानंतर त्या बाईचे वरील शब्द डॉनच्या कानांत बराच वेळ घुमत राहिले. सन १९४६-४७ मध्यें डॉक्टरांचा सल्ला धुडकावून त्यानें पुनः क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली होती आणि तो इंग्लंडला जाण्याचा धोका पत्करत होता. आपण या दौऱ्यांत वैयक्तिक यश संपादन करूं कीं नाहीं, याचीं त्याला काहींच कल्पना नव्हती.

पण डॉनचें मन स्वच्छ होते. आपण क्रिकेट आणि क्रिकेटचें असंख्य रसिक याच्याविषयींचें शेवटचें कर्तव्य पार पाडत आहोंत, असें त्याचें मन त्याला ग्वाही देत होतें.

बोट कोलंबो येथें लागली. बोटीच्या येथील एक दिवसाच्या मुक्कामांत जो सामना झाला, तो पाहण्यास पंचवीस हजार लोक हजर होते व त्या दिवशींचे उत्पन्न पंचेचाळीस हजार रुपये झालें. सिलोनसारख्या छोट्या देशांत हा उच्चांक होता. सिलोननंतर मुंबई येथेंहि थोडा वेळ बोट थांबली. ऑस्ट्रेलियन खेळाडूंच्या विशेषतः डॉन ब्रॅडमनच्या सन्मानार्थ यावेळीं भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्डानें एक समारंभ घडवून आणून सर्व खेळाडूंना स्मृतिचिन्हें दिलीं. यावेळीं क्रिकेट कंट्रोल बोर्डाचे अध्यक्ष श्री. डीमेलो आणि प्रसिद्ध भारतीय क्रिकेटपटू श्री. विजय मर्चंट यांनीं गौरवपर भाषणें केलीं. पण बोट सुटावयाची वेळ झाल्यामुळे डॉनला घाईघाईनें चालत चालतच उत्तराचें भाषण करावें लागले !

एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात हा संघ इंग्लंडला पोहोंचला. आणि नेहमींप्रमाणेंच या संघाचा पहिला सामना वुर्सेस्टर संघाबरोबर झाला. यापूर्वी १९३०, १९३४ व १९३८ या तिन्ही दौऱ्यांत डॉननें वुर्सेस्टरबरोबरच्या सामन्यांत द्विशतकें झळकावलीं होतीं. पण या वेळेसहि डॉन आपल्या पूर्वीच्या

पराक्रमाची पुनरावृत्ति करील काय, याबद्दल लोकांत उत्सुकता होती. पण १०७ धांवा केल्यावर डॉन बाद झाला नव्हे त्यानें मुद्दाम होऊन आपली विकेट दिली. डॉन फॉर्ममध्यें होता, पण संघांतून तरुण खेळाडूंना संधि द्यावी म्हणून त्यानें मुद्दाम हें धोरण स्वीकारलें. हा सामना ऑस्ट्रेलियनांनीं एक डाव ११७ धांवांनीं जिंकला.

दुसरा सामना लिसेस्टरशॉयर विरुद्ध झाला. या सामन्यांत डॉन ब्रॅडमननें ८१ धांवा केल्या पण हा सामना प्रामुख्यानें कीथ मिलर यानें गाजविला. त्यानें नाबाद २०२ धांवा केल्या. ऑस्ट्रेलियातर्फे रिंग व जॉन्सन यांनीं उत्तम गोलंदाजी टाकली. रिंगनें लिसेस्टरशायरच्या पहिल्या डावांत ४५ धांवा देऊन पांच खेळाडू बाद केले, तर जॉन्सननें दुसऱ्या डावांत ४२ धांवांत ७ खेळाडू बाद केले. ऑस्ट्रेलियानें हा सामना एक डाव व १७१ धांवांनीं जिंकला.

डॉन या नंतरचा सामनासेरे या बलाढ्य परगण्याबरोबर खेळला. डॉननें पुनः एकदां चमकदार खेळून पावणेतीन तासांत १४६ धांवा केल्या. बार्नसचाहि खेळ या सामन्यांत छान होऊन त्यानें १७६ धांवा केल्या. ऑस्ट्रेलिनांनीं हा सामना एक डाव व २९६ धांवांनीं जिंकला.

इसेक्सविरुद्धचा ऑस्ट्रेलियन संघाचा सामना तर अभूतपूर्व होता. इसेक्स संघांत ट्रेव्हॉर बेली, स्मिथ, प्राईस असे चांगले गोलंदाज असूनहि त्यांची गोलंदाजी ऑस्ट्रेलियन खेळाडूंनीं फोडून काढून ६ तासांत ७२१ धांवा केल्या ! एका दिवसांत इतक्या धांवा पूर्वी कधींच कोणत्या संघानें केल्या नव्हत्या. या सामन्यांत डॉननें १८७ धांवा केल्या. त्याशिवाय ब्राऊन, लॉक्स्टन आणि सॅगर्स यांनींहि शतकें झळकविलीं. पण उल्लेखनीय गोष्ट म्हणजे कीथ मिलर मात्र शून्यावर बाद झाला. असें म्हणतात कीं त्या दिवशीं फलंदाजी करण्याची मिलरची इच्छा नव्हती. तो म्हणाला, " इतकी दांडगी धांवसंख्या झाल्यावर खेळून धांवा करण्यांत काय वैशिष्ट्य ? " पण कर्णधाराची आज्ञा म्हणून तो फलंदाजी करण्यासाठीं गेला आणि पहिल्याच चेंडूवर विकेट देऊन परतला ! इसेक्स विरुद्धचा सामना तर ऑस्ट्रेलियन संघानें एक डाव व ४५१ धांवांनीं जिंकला.

इसेक्सनंतर डॉननें एम्. सी. सी. विरुद्ध ९८, लँकाशायर विरुद्ध ११ व ४३, नॉटिंगहॅमशायरविरुद्ध ८६ व ससेक्स विरुद्ध १०९ धांवा केल्या.

पहिला कसोटी सामना ता. १०, ११, १२, १४ व १५ जून रोजीं नॉटिंगहॅम येथें झाला. या सामन्यांत दोन्ही बाजूचे खेळाडू पुढीलप्रमाणें होते.

ऑस्ट्रेलिया—बार्नेस, मॉरीस, ब्रॅडमन, मिलर, ब्राऊन, हॅसेट, जॉनसन, टॅलन, लिंडवॉल, जॉन्स्टन व तोशॅक.

इंग्लंड—हटन, वॉशब्रुक, एड्रिच, कॉम्प्टन, हार्डस्टाफ, बार्नेट, यॉर्डले, एव्हन्स, लेकर, बेडसर आणि यंग.

इंग्लंडचा कर्णधार, नॉर्मन यॉर्डले यान टॉस जिंकला. डॉननें उद्‌गार काढले, “ मी टॉस हरलो, हें नशीब ! ” विकेट छान होती. पण पाऊस केव्हां पडेल, याचा नेम नव्हता. यॉर्डलेपुढें समस्या उभी राहिली. अखेर त्यानें फलंदाजी घेतली आणि डॉनची अपेक्षा खरी ठरली. इंग्लंडच्या आठ खेळाडू बाद होऊन फळ्यावर फक्त ७४ धांवा लागल्या. हटन, वॉशब्रुक, एड्रिच, कॉम्प्टन, हॅर्डिस्टाफ, बार्नेट, यॉर्डले, एव्हन्स हे बाद येऊन तंबूंत येऊन बसले होते. पण त्यानंतर विशेष म्हणजे लेकर ( ६३ ) व बेडसर ( २२ ) या दोघां गोलंदाजांनीं धैर्यानें प्रतिकार करून नवव्या विकेटवर ८९ धांवांची भर घालून धांवांचा आंकडा १६३ वर नेला. इंग्लंडच्या सव बाद १६५ धांवा केल्या.

ऑस्ट्रेलियाच्या या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावांत ५०९ धांवा झाल्या. डॉननें इंग्लंडच्या शेवटच्या सफरींतील आपल्या पहिल्याच कसोटी सामन्यांत शतक [१३८] झळकाविलें. कसोटी सामन्यांतील डॉनचें हें २८ वें शतक होतें. पण हें शतक ठोकतांना त्याला जितकें धिम्मेपणानें खेळावें लागलें, तेवढें पूर्वी कधींच खेळावें लागलें नाहीं. शंभर धांवा करायला त्याला साडेतीन तास लागलें, आणि शेवटच्या २९ धांवा करावयास तर त्याला ७० मिनिटें लागली. पण याच सामन्यांत त्यानें १९४८ च्या हंगामांतील सर्वांत अगोदर १००० धांवा करण्याचा मान मिळविला.

इंग्लंडचा दुसरा डाव चांगला झाला. डेनिस कॉम्प्टननें १८४ धांवा करून धांवांचा आंकडा ४४१ पर्यंत नेऊन मिडविण्यास बहुमोल मदत केली. पण

सामना जिंकण्याकरितां फक्त ९८ धांवा ऑस्ट्रेलियाला पाहिजे होत्या. ऑस्ट्रेलियानें दोन बाद ९८ धांवा करून हा पहिला कसोटी सामना ८ विकेटींनी जिंकला. दुसऱ्या डावांतील एक उल्लेखनीय प्रकार म्हणजे डॉनची विकेट बेडसरनें शून्यावर घेतली.

पहिल्या कसोटी सामन्यानंतर डॉन ता. १९, २१ व २२ जून १९४८ रोजीं यॉर्कशायरविरुद्ध खेळला. हा सामना अनिर्णित राहिला. डॉननें दोन्ही डावांत अनुक्रमें ५४ व ८६ धांवा केल्या.

दुसरा कसोटी सामना लॉर्डसच्या मैदानावर २४, २५, २६, २८ व २९ जून १९४८ रोजीं झाला. टॉस करण्यापूर्वी डॉन ब्रॅडमन आणि यॉर्डले यांनीं विकेटची पाहणी केली. पण डावपेंचाचा भाग म्हणून दोघांनींहि विकेटविषयीं मत दिलें नाहीं. विकेटविषयीं दोघांच्याहि मनांत धागधूग होती. विकेट संपूर्णतः वाळली नव्हती. पण तरीहि टॉस जिंकणाऱ्याला दुसऱ्याला फलंदाजी प्रथम देण्याचें धाडस होणार नव्हतें.

टॉस डॉननें जिंकला व फलंदाजी पत्करली. डॉनची धास्ती खरी ठरली, बार्नस शून्यावर बाद झाला. डॉन मॉरीसच्या जोडीला खेळावयाला गेला. दोघांनीं जपून खेळून धांवांची संख्या ८७ वर नेली. पण उपहारानंतर डॉन बाद झाला. ऑस्ट्रेलियाचा डाव पुनः घसरणार असें वाटूं लागलें, पण त्यानंतर मॉरीस व हॅसेट यांनीं सावधागिरीनें खेळून धांवसंख्या १६६ वर नेली. मॉरीस व हॅसेट-नंतर बाकीच्या ऑस्ट्रेलियन खेळाडूंनीं कशीबशी ३५० वर धांवसंख्या नेली.

पण इंग्लंडचा डाव अगदींच घसरला. इंग्लंडच्या पहिल्या डावांत २१५ धांवा झाल्या. आजारी स्थितींतहि लिंडवॉलनें अप्रतिम गोलंदाजी करून ७० धांवांत ५ खेळाडू बाद केले.

ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावांत ७ बाद ४६० धांवा झाल्यावर डाव पुरा झाल्याचें जाहीर करण्यांत आले. सिड बार्नस यानें १४१ धांवा केल्या डॉनच्या ८९ धांवा झाल्या. त्यानें व बार्नसनें दुसऱ्या विकेटवर १७४ धांवांची भर घातली. लॉर्डस मैदानावरील आपल्या शेवटच्या सामन्यांत डॉन शतक ठोकणार असें वाटत होतें, पण शतकाला फक्त अकरा धांवा असतांना डॉनचा एड्रिचनें

कोलांटी उडी मारून एका हातानें प्रेक्षणीय झेल घेतला. गोलंदाज बेडसर होता. पांच लागोपाठ डावांत डॉनची विकेट घेण्याचें श्रेय बेडसरनें घेतलें.

इंग्लंडला सामना जिंकण्याकरितां ५९६ धांवा पाहिजे असून नऊ तासांचा अवधी होता. पण इंग्लंडच्या फक्त १८६ धांवा झाल्या. तोशॅकनें ४० धांवांत पांच खेळाडू बाद केले. ऑस्ट्रेलियानें हा सामना ४०९ धांवांनीं जिंकला.

दुसऱ्या कसोटी सामन्यानंतर डॉननें सरेविरुद्ध १२८ धांवा केल्या. याच बलाढ्य परगण्याविरुद्ध डॉननें १९३० मध्यें नाबाद २५२, १९३४ मध्यें ७७ व १९३८ मध्यें १४३ धांवा केल्या होत्या.

सरेविरुद्धचा सामना लौकर आटोपण्याची ऑस्ट्रेलियन खेळाडूंना घाई लागली होती. कारण त्यावेळीं विंबलडन येथें टेनिसमधील जागतिक अजिंक्य पदासाठीं शेवटचा सामना होणार होता, त्यासाठीं ऑस्ट्रेलियन खेळाडूंना खास निमंत्रण होतें. हा पुरुषांचा अंतिम सामना ऑस्ट्रेलियाचा जॉन ब्रॉमविच आणि अमेरिकेचा फाल्कन बर्ग यांच्यांत होणार होता. पण विंबलडनला जाण्यांत व्यत्यय येणार असें वाटूं लागले. खेळाच्या आरंभीच दोन साधे झेल व तेहि मिलरसारख्या निष्णात क्षेत्ररक्षकानें सोडले होते.

ऑस्ट्रेलियाला १२२ धांवा करावयाच्या होत्या. विंबलडनचा अपूर्व टेनिसचा सामना चुकणार असें वाटूं लागले. पण नील हार्वे आणि लॉक्स्टन यांनीं ५८ मिनिटांत १२२ धांवा केल्या. यापैकीं हार्वेच्या नाबाद ७३ धांवा असून त्यांत सहाचे दोन व ४ चे आठ फटके होते. लॉक्स्टननें नाबाद ४३ धांवा केल्या.

विंबलडन येथें राजघराण्यांतील लोकांकरितां राखून ठेविण्यांत आलेल्या स्थानावर डॉनला सन्मानानें बसविण्यांत आलें होतें.

हा अंतिम टेनिसचा सामना ब्रॉमविच हरला. डॉननें त्याला सहानुभूति दाखविण्यासाठीं हात हालविला. ब्रॉमविचनें "सामन्यांत कोणीतरी हरणारच" असा तोंडावर भाव दर्शविला!

तिसरा कसोटी सामना मँचेस्टर येथें ता. ८, ९, १०, १२ व १३ जुलै १९४८ रोजीं झाला.

इंग्लंडच्या संघांतून या सामन्यांत लेन हटनला वगळण्यांत आले, त्यामुळें

क्र. ११०९५

बरीच खळबळ उडाली. लेन हटन हा एक श्रेष्ठ प्रतीचा खेळाडू होता. पण लोकांत अशी वदंता उठली होती कीं, त्याचें पूर्वीच्या सामन्यांतील वर्तन चांगलें नसल्यामुळें निवड समितीनें त्याला वगळलें. ही वदंता कितपत खरी होती यांत न शिरतां डॉननें आपल्या आत्मचरित्रांत पुढील मत नमूद केलें आहे.

"एखादा खेळाडू चांगला खेळतो, असें वाटलें तरी त्या परिस्थितींत त्याला गाळावे काय ?"

"मी निःसंदिग्धपणें होय म्हणेन."

डॉन हा शिस्तीचा भोक्ता असून खेळाडूचें वर्तन निष्कलंक असले पाहिजे, असें त्याचें मत आहे.

हा तिसरा कसोटी सामना पावसामुळें अनिर्णित राहिला. इंग्लंडच्या पहिल्या डावांत ३९३ धांवा झाल्या. त्यांत डेनिस कॉम्प्टनच्या १४५ धांवा होत्या. ऑस्टेलियाच्या पहिल्या डावांत २२१ धांवा झाल्या. डॉन ब्रॅडमनची विकेट पोलार्डनें अवघ्या ७ धांवावर घेतली. इंग्लंडनें आपला दुसरा डाव तीन बाद १७४ धांवांवर पुरा झाल्याचें जाहीर केलें. ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावांत १ बाद ९२ धांवा झाल्या. त्यांत डॉनच्या नाबाद ३० धांवा होत्या.

चौथा कसोटी सामना लीडस येथें ता. २२, २३, २४, २६ व २७ जुलै १९४८ रोजीं झाला. "आज मी माझ्या आयुष्यांतील सर्वोत्कृष्ट सामना पाहिला," असें ज्या सामन्याचें चार्लस ब्रे यानें वर्णन केलें, तो हाच सामना. या सामन्याला सुरुवातीपासून शेवटच्या क्षणापर्यंत अपूर्व रंग चढला होता. तिसऱ्या सामन्यांत वगळलेल्या लेन हटनला या सामन्याकरितां पुनः इंग्लिश संघांत घेण्यांत आलें.

इंग्लंडचा संघ या सामन्यांकरितां पुढीलप्रमाणें होता.

हटन, वॉशब्रुक, एड्रिच, बेडसर, कॉम्प्टन, क्रॅप, यॉर्डले, क्रॅन्स्टन, एव्हन्स, लेकर व पोलार्ड.

ऑस्ट्रेलियन संघांतहि या सामन्याकरितां एक दोन बदल करावे लागले. टॅलन व बार्नेस हे अगोदरच्या सामन्यांत जखमी झाले होते. म्हणून टॅलनच्या बदली सॅगर्सला व बार्नेसच्या बदली नील हार्वे याला घेण्यांत आलें.

हार्वेचा समावेश कां केला, याबाबत डॉन ब्रॅडमननें आपल्या आत्मचरित्रांत पुढील मनोरंजक उल्लेख केला आहे. " आमच्या संघांतील बाळ नील हार्वे हा आपल्या चमकदार खेळानें कसोटी सामन्याचे दरवाजे ठोठावूं लागला होता. त्याला कसोटी सामन्यांपासून दूर ठेविणें म्हणजे त्याच्यावर व क्रिकेटवर अन्याय करण्यासारखे होते. "

या सामन्यांत इंग्लंडचा कर्णधार यॉर्डले यानें टॉस जिंकला. इंग्लंडची सुरुवात लेन हटन आणि वॉशब्रुक यांनीं उत्तम केली. त्यांनीं पहिल्या विकेटवर १६८ धांवांची भर घातली. हटन (८१) बाद झाल्यावर एड्रिच आला. एड्रिच-वॉशब्रुक या जोडीनें दुसऱ्या विकेटीवर धांवसंख्या २६८ वर नेऊन भिडविली. वॉशब्रुक (१४३) बाद झाला, तेव्हां पहिल्या दिवसाचा खेळ संपत आला होता. गोलंदाजानें चार चेंडू टाकण्याचे बाकी राहिले होते. म्हणून " रात्रींचा पहारेकरी " या नात्यानें बेडसरला खेळण्यास पाठविण्यांत आले. पण या " रात्रीच्या पहारेकऱ्यां"नें पट्टीच्या फलंदाजासारखी कामगिरी करून एड्रिचला तिसऱ्या विकेटवर धांवसंख्या ४२३ वर नेऊन भिडविण्यास मदत केली. स्वतः बेडसरनें यावेळीं ७० धांवा केल्या व एड्रिचच्या १११ धांवा झाल्या. पण तिसरी विकेट पडल्यावर इंग्लंडचा डाव घसरला व तीन बाद ४२३ ऐवजीं सर्व बाद ४९६ असा धांवांचा आंकडा झळकला.

ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावास कांहीं चांगली सुरुवात झाली नाहीं. मॉरीस ६ धांवांवर बाद झाला, हॅसेटच्या फक्त १३ धांवा झाल्या. खुद्द डॉन ब्रॅडमनचा ३३ धांवांवर त्रिफळा उडाला. तीन बाद फक्त ६८ धांवा झाल्या होत्या. पण त्यानंतर मिलर व १९ वर्षांचा हॉर्वे ही जोडी जमली. या जोडीनें सणसणीत व प्रेक्षणीय टोलेबाजी करून फक्त दीड तासांत १२१ धांवा केल्या व धांवसंख्या १८९ वर नेली. मिलर ५८ धांवांवर बाद झाला व लॉक्स्टन हा हार्वेच्या जोडीला आला. या जोडीनें ९५ मिनिटांत १०५ धांवांची भर घालून धांवसंख्या ५ व्या विकेटीवर २९४ पर्यंत नेली. नील हार्वेनें ११२ धांवा केल्या. त्यांत ४ चें १७ फटके होते तर लॉक्स्टनच्या ९३ धांवांत ६ चे पांच व ४ चे ९ फटके होते ! हार्वेनें शतक ठोकलें तेव्हां त्याचें अभिनंदन

करण्याची लॉक्स्टनला इतकी घाई झाली कीं त्यांत तो रन-आऊटच व्हावयाचा पण थोडक्यांत बचावला. ऑस्ट्रेलियाच्या सर्व बाद ४५८ धांवा झाल्या.

इंग्लंडनें दुसऱ्या डावांत ८ खेळाडू बाद होऊन ३६५ धांवा झाल्यावर आपला डाव पुरा केल्याचें जाहीर केलें.

ऑस्ट्रेलियाला सामना जिंकण्याकरितां ३४५ मिनिटांत ४०४ धांवा करावयाच्या होत्या. त्या रात्रीं डॉननें आपल्या डायरींत लिहिलें, " सामना जिंकण्याकरितां ४० धांवा करावयाच्या आहेत, आणि मला वाटते आमचा पराभव होणार ! "

पांचवा दिवस होता. विकेट खराब झाली. असून फिरकी गोलंदाजांना अनुकूल होती. पण अशा स्थितींत सामना अनिर्णित ठेवण्यापेक्षां जिंकण्याच्या हिरीरीनें खेळावयाचा ऑस्ट्रेलियानें निश्चय केला होता.

मॉरीस व हॅसेट यांनीं ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजीला उत्तम आरंभ केला. त्यांनीं सत्तावन धांवा केल्या. हॅसेटच्या १७ धांवा झाल्या होत्या. इतक्यांत यॉर्डलनें गोलंदाजींत बदल करून डेनिस कॉम्प्टनला गोलंदाजी दिली व त्याच्या फिरकी गोलंदाजीला हॅसेटची विकेट मिळाली.

हॅसेटच्या जागीं डॉन ब्रॅडमन खेळावयास गला आणि पुनः एकदां अवर्णनीय चमकदार फलंदाजीचा आविष्कार प्रेक्षकांना पाहावयास मिळाला. ब्रॅडमन आणि मॉरीस या जोडीनें अत्यंत वेगानें धांवा करण्यास सुरुवात केली. धांवफलक जणूं काय उड्या मारीतच पुढें सरकत होता ! त्यांनीं दुसऱ्या विकेटीवर ३०१ धांवांची भर घातली. धांवसंख्या ३५८ वर गेली व मॉरीस १८२ धांवांवर बाद झाला.डॉन व मिलर यांनीं धांवसंख्या ३९६ वर नेली व मिलर(१२) बाद झाला. मिलरनंतर हार्वे आला व त्यानें चाराचा सणसणीत विजयी फटका मारण्याचे श्रेय घेतलें. डॉन १७३ धांवा करून नाबाद राहिला. ऑस्ट्रेलियानें अशा रीतीनें ७ विकेटींनीं सामना जिंकला.

या दिवशीं ऑस्ट्रेलियन खेळाडूंनीं चाराचे सहासष्ट फटके मारले. त्यांत मॉरीसचे ३३ व ब्रॅडमनचे २९ फटके होते. ऑस्ट्रेलियाच्या तडफदार खेळाची यावरून कल्पना येईल.

पांचवा कसोटी सामना १४, १६, १७ व १८ ऑगस्ट १९४८ रोजीं ओव्हल मैदानावर झाला. डॉन ब्रॅडमनच्या क्रिकेट जीवनांतील हा शेवटचा कसोटी सामना.

इंग्लंडचा कर्णधार नॉर्मन यॉर्डले यानें टॉस जिंकला. डॉनला या खेपेसहि आपण टॉस हरलो, याचें वाईट वाटलें नाहीं. पिच्‌ची परिस्थिति अनिश्चित होती आणि पाऊस पडण्याचा संभव होता. पण यॉर्डलेनें धोका पत्करून फलंदाजी स्वीकारली. ( डॉननेंहि तेंच केलें असतें. )

लेन हटन आणि ड्यू यांनीं फलंदाजी सुरु केली. पण मिलरच्या एका अप्रतिम चेंडूनें ड्यूजचा सपशेल त्रिफळा उडविला. यावेळीं फळ्यावर फक्त दोन धांवा लागल्या. यानंतर इंग्लिश फलंदाजांची स्मशानयात्राच सुरू झाली. एड्रीच ३ धांवांवर झेल देऊन परतला. इंग्लंड दोन बाद १०, कॉम्प्टनची विकेट लिंडवॉलन ४ धांवावर घेतली. इंग्लंड ३ बाद १७, क्रॅप शून्यावर गेला. इंग्लंड ४ बाद २३. यॉर्डलेनें फक्त सात धांवा केल्या. इंग्लंड ५ बाद ३५ धांवा. वॉटकिन्स ०, इंग्लंड ६ बाद ४२. एव्हन्स १. इंग्लंड ७ बाद ४५. बेडसर ० इंग्लंड ८ बाद ४५. यंग ०. इंग्लंड ८ बाद ४७. आणि यावेळपर्यंत चिकाटीनें खेळून ३० धांवा केलेला लेन हटन १० व्या विकेटीवर बाद होऊन इंग्लंडच्या फक्त ५२ धांवा झाल्या. ओव्हल मैदानावरच्या इंग्लंडच्या या सर्वांत कमी धांवा. लिंडवॉलनें यावेळीं २० धांवांत ६ विकेटी घेतली.

ऑस्ट्रेलियानें सुरुवात सुंदर केली. सिड बार्नस व मॉरीस यांनीं पहिल्या विकेटीवर ११७ धांवांची भर घातली. मॉरीस रन-आऊट झाला. डॉन ब्रॅडमन प्रेक्षकांचा लाडका ब्रॅडमन-खेळावयास निघाला. क्रीडांगणावरचें त्यावेळचें दृश्य रोमांचकारी होते. प्ॅव्हेलियनपासून पिचवर डॉन जाऊन पोहोंचेपर्यंत टाळ्यांचा कडकडाट होत होता. इंग्लिश खेळाडूंनींहि त्याच्याभोंवती जमून त्याचा त्रिवार जयजयकार केला. डॉन भारावून गेला. त्यानें टोपी उंच करून अभिवादनाचा स्वीकार केला. होलीजचा पहिला चेंडू तो कसाबसा खेळला. पण होलीजच्या दुसऱ्या चेंडूवर त्याची सपशेल दांडी उडाली. असें म्हणतात कीं एरव्ही कधींहि विचल न होणारा डॉन या अपूर्व स्वागतामुळें इतका भारा-

चून गेला होता कीं होलीजचें चेंडू त्याला दिसतच नव्हते. अशा रीतीनें शेवटच्या कसोटी सामन्यांत डॉन शून्यावर गेला. पण तो परत फिरला, तेव्हांहि प्रेक्षकांनीं टाळयांचा गजर करून, त्याला पुनः अभिवादन केलें.

ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ३८९ धांवा झाल्या. यापैकीं मॉरीसच्या १९६ धांवा होत्या. इंग्लंडचा दुसरा डावहि १८८ धांवांत कोसळला व ऑस्ट्रेलियाचा एक डाव व १४९ धांवांनीं विजय झाला.

कसोटी सामना संपल्यानंतर डॉननें केंट विरुद्ध ६५, जंटलमेन संघाविरुद्ध १५०, साऊथ ऑफ इंग्लंड विरुद्ध १४३, लेव्हिसन गोव्हर संघाविरुद्ध १५३, स्कॉटलंडविरुद्ध नाबाद धावा केल्या या दौऱ्यांत डॉननें अकरा शतकें झळकाविली

डॉनच्या नेतृत्वाखालीं गेलेल्या. या ऑस्ट्रेलियन संघानें पूर्वी कोणत्याहि संघानें केला नव्हता, एवढा पराक्रम केला. त्यांनीं ३४ सामन्यांपैकीं १७ सामने एका डावानें, दोन दहा विकेटींनीं, एक नऊ विकेटींनें, दोन आठ विकेटींनी व एक ४०९ धांवांनीं जिंकला. या दौऱ्यांत ऑस्ट्रेलियाच्या ११ फलंदाजांनीं ५० शतकें झळकाविली व सात फलंदाजांनीं या दौऱ्यांत प्रत्येकी १००० वर धांवा केल्या. एका गोलंदाजानें १०० विकेटी घेण्याचा पराक्रम केला.

यावेळीं कसोटी सामन्यांतील धांवांच्या सरासरींत जरी मॉरीस अग्रेसर असला तरी एकंदर दौऱ्यांतील धांवांच्या सरासरीत डॉन ब्रॅडमन हाच अग्रेसर होता.

●●●

स्थळप्रत

# १५ लोकप्रियतेचा कळस

डॉन ब्रॅडमन आपल्या असामान्य क्रिकेटपटूत्वामुळें जेथें जेथें क्रिकेटचा खेळ खेळला जातो, तेथें तेथें लोकप्रिय झाला होता. क्रिकेट म्हणजे डॉन ब्रॅडमन असें समीकरण होऊन बसले आहे. डॉन हा सर्वसामान्य क्रिकेट रसिकांतच लोकप्रिय होता असें नव्हें तर थोरथोर व्यक्तीहि त्याच्या चहात्या होत्या. इंग्लंडचे माजी पंत-प्रधान बाल्डवीन त्याला आपला मित्र मानीत तर इंग्लंडचे दुसरे माजी पंत-प्रधान ॲटली त्याचें एक चहाते होते. ऑस्ट्रेलियाचे माजी पंतप्रधान इव्हॅट, ऑस्ट्रेलियाचें सध्यांचे पंतप्रधान मि. मेन्झीस हे त्याला अतिशय चाहतात. मेन्झीस यांनीं तर डॉनच्या फलंदाजीचा एक रोमांचकारी चित्रपट जवळ बाळगला असून, हा चित्रपट वारंवार पाहणें ही त्यांची मोठी करमणूक आहे.

सन १९२८ पासून ते १९४८ पर्यंत त्याच्या लोकप्रियतेपुढें इतर क्रिकेटपटू फिके पडत. डॉनच्या सत्कार समारंभांत भाग घेण्याकरितां चढाओढ लागे. त्याच्या नांवाचा उपयोग करून व्यापारी आपला माल खपवीत. एकदां एका ब्रिटिश व्यापाऱ्यानें आपल्या मोटारींची विक्री करण्याकरितां पुढील अर्थाची जाहीरात केली होती.

" जर जोन्स यांच्या मोटार–गराजमध्यें डॉन ब्रॅडमन आला तर त्याला एक ऑस्टीन मोटारगाडी बक्षीस देण्यांत येईल. "

सूचना–( आमच्याकडे एक डझन ऑस्टीन गाड्या आहेत. )

सन १९४८ च्या या दौऱ्यांत तर डॉन ब्रॅडमनवर क्रिकेटबरोबर सत्काराचा खूपच ताण पडला होता. आर. सी. रॉबटर्सन यांनीं लिहिलें : " सन

" एकदां एका नावेंतून एक भांडवलवाला, एक कम्युनिस्ट, एक फॅसिस्ट आणि एक कामगार पुढारी असे चौघेजण प्रवास करीत होते. ही नांव बुडत आहे, असें दिसल्यावर चौघांनींहि नावेंतून उड्या टाकल्या व पोहण्यास सुरुवात केली. भांडवलवाल्याच्या अंगावर बरेंच भांडवल असल्यामुळें त्याला पोहतां आलें नाही, म्हणून तो बुडाला. कम्युनिस्ट सारख्या घोषणा देत असल्यामुळें त्याच्या पोटांत खूप पाणी गेलें व तोहि बुडाला. फॅसिस्टनें एक हात सलामीसाठीं सारखा वर धरला होता, त्याला एका हातानें पोहतां येईना व तोहि दमून बुडाला. कामगार पुढारी जोरजोरानें पोहत होता, तो किनाऱ्याला सुखरुप पोहोंचणार असें वाटत होतें, पण अचानक त्यानें आनंदातिशयानें आरोळ्या ठोकावयास सुरुवात केली व तोहि बुडाला." डॉन म्हणतो " बेव्हिनची राजकीय पार्श्वभूमि माहीत असल्यामुळे हा चुटका आम्हांला भारी आवडला."

डॉनला गांठून त्याच्या स्वाक्षऱ्या घेण्याचें उद्योग केवळ मुलांचेंच नव्हे तर प्रौढांचेहि चालत. एकदां एका ठिकाणीं ऑस्ट्रेलियन संघाला मेजवानी देण्यांत येत असतांना एक पाहुणा त्याच्याजवळ येऊन म्हणाला, " मि. ब्रॅडमन, तुम्ही मला जर आतां स्वाक्षरी दिलीत तर मी तुम्ही सांगाल त्या संस्थेला पंचवीस पौंड देणगी देईन." ब्रॅडमननें त्याला स्वाक्षरी देऊन ही देणगी त्याला ॲडेलेड येथील अपंग मुलांच्या इस्तिपळाला पाठविण्यांस सांगितलें. (त्याच इस्पितळांत डॉनची मुलगी बरी झाली होती.) आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यानें खरोखरीच त्या इस्पितळाला पंचवीस पौंड देणगी पाठविली. तसेंच दुसऱ्या एका गृहस्थानें त्याला स्वाक्षरीकरितां दहा पौंड दिले, तेहि त्यानें त्या इस्पितळाला पाठविलें.

ता. २७ ऑगष्ट १९४८ रोजीं जंटलमेन संघाविरुद्धचा सामना चालू असतांना ब्रॅडमनचा जन्मदिन आला. यानिमित्त त्याला एक थाटाची मेजवानी देण्यांत आली. डॉनला यावेळीं सर पेल्हॅम वॉर्नरच्या पुस्तकाची प्रत आणि उघडया पुस्तकाच्या आकाराचा अठरा इंच चौरस असा सुदर केक भेट म्हणून देण्यांत आली, केकच्या एका पानावर पुढील अक्षरें होतीं.

" To Don Bradman.
Many Happy Returns of the Dad.
From all at Lord's "

१९४८ मध्यें विन्स्टन चर्चिल यांच्यानंतर डॉन ब्रॅडमन हाच सर्वांत प्रसिद्ध पुरुष होता." यावेळीं कर्णधार या नात्यानें त्याला खुप भाषणें करावी लागलीं. डॉन म्हणतो, "सामान्यतः खेळाडूला त्याचा खेळ शांतपणें चालू ठेवतां येतो. त्याला भाषणें करावी लागत नाहींत. पण कर्णधार झाल्यावर त्याचा मोठमोठ्या नेत्यांशीं संबंध येतो. आणि उत्कृष्ट वक्ते असलेल्या मोठमोठ्या सभांतून मुख्य पाहुणा किंवा वक्ता म्हणून भाषणें करावी लागतात."

पण उद्बोधक गोष्ट म्हणजे क्रिकेटपटू म्हणून तळपणाऱ्या डॉन ब्रॅडमननें उत्तम भाषणें करून वक्तृत्वाबद्दलहि कीर्ति मिळविली. इंग्लंडमधील पत्रकारांचें "जर्नल" हे प्रसिद्ध वर्तमानपत्र १९४८ च्या आपल्या एका अंकांत म्हणते, "सन १९३८ मध्यें वीर डॉन ब्रॅडमननें वक्ता या नात्यानें आपल्यांतील प्राविण्य व्यक्त करून आपल्या श्रोत्यांना थक्क आणि आनंदित करून सोडलें होतें. आजहि त्यानें त्याच आनंदी मनःस्थितींत भाषण केलें आणि जणुं काय मधल्या काळांत कांहींच घडलें नाहीं अशा वृत्तीनें क्रिकेट मैदानावरील आपल्या चौफेर खेळाप्रमाणें आपल्या वक्तृत्वाचीहि चौफेर आतषबाजी दाखविली.

"निर्भय डॉन जितक्या सहजसुंदर आकर्षतेनें लॉर्डस किंवा ओव्हल मैदानावर आपल्या बॅटीची चमक दाखवितो तितक्याच लीलेनें तो तो आज भाषण करून चुटके आणि विनोद यांचें चागचे आणि सट्टाचे फटके ठोकत होता"

डॉननें हे भाषण केल्यावर सर सी. बी. फ्राय हा नामांकित क्रिकेटपटू व नंतरच्या काळांतील एक ब्रिटिश नेता म्हणाला, "डॉन ब्रॅडमन हा एक सराईत वक्ता आहे, हें मला माहीत होतें. पण आज तो वक्तृत्वांत इतका पटाईत झाला आहे कीं त्याला ब्रिटिश साम्राज्याचा पहिल्या दर्जाचा वकील समजावयास हरकत नाहीं."

डॉनच्या नेतृत्वाखालील ऑस्ट्रेलियन संघाच्या एका स्वागत. समारंभाला ब्रिटनचें माजी परराष्ट्र मंत्रि अर्नेस्ट बेव्हिन हे हजर होते. त्यांनीं भाषण करतांना पुढील मनोरंजक आठवण सांगितली.

केकच्या दुसऱ्या पानावर सुंदर फुलांच्या गुच्छांत डॉनचा फोटो बसविला होता.

यॉर्कशायर कौंटि क्रिकेट क्लबानेंहि त्याला सुंदर तबक देऊन त्याला आपल्या क्लबाचे सन्माननीय सभासद करून घेतलें. या तबकावर पुढील आशयाचा मजकूर होता.

डॉन ब्रॅडमन यांस

त्याच्या लीडस येथील कसोटी सामन्यातील अपूर्व पराक्रमाबद्दल १९३० = ३३४ : १९३४=३०४ : १९३८=१०३ व १६ : १९४८ = ३३ आणि नाबाद १७३

पण या सर्वांत वैभवशाली देणगी म्हणजे त्याला 'पिपल' या वर्तमानपत्रानें निधी उभारून या निधींतून ऐतिहासिक महत्वाचें सन १७७० चें एक नक्षीदार भव्य भांडें नजर केलें. हे भांडें संपूर्ण चांदीचें भरीव असून तें एकवीस इंच उंच आहे. या भांड्यावर पुढील अक्षरें कोरण्यांत आलेलीं आहेत.

डॉन ब्रॅडमन यांस

ब्रिटिश क्रिकेट रसिकांकडून भेट.

ही देणगी देण्याकरितां जो मेजवानीचा समारंभ घडवून आणण्यांत आला त्याला इंग्लंडचे माजी सात कर्णधार व नऊ परगण्यांतील संघनायक हजर होते. तसेंच या निधीकरितां ज्यांनीं देणग्या दिल्या, त्यांचे प्रतिनिधी म्हणून देशाच्या निरनिराळ्या भागांतून दहा मुलें प्रतिनिधी म्हणून आलीं होतीं देणगी देणाऱ्यांत अनेक मुलेंहि असून, त्यांच्यापैकीं कांहींनीं डॉनला आपल्या देणगीबरोबरच विनोदी पत्रे लिहिलीं होतीं. एका मुलानें लिहिलें:

"प्रिय डॉन, तूं आतां निवृत्त होत आहेस हें किती छान आहे ! निदान आतां तरी आम्हांला संधि मिळेल. मी त्यासाठीं कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं सोबत एक शिलिंग देणगी पाठवीत आहे."

इंग्लंडमध्यें असतांना डॉनला दररोज सुमारें शंभर पत्रें येत असत. एकदां एकानें जें पत्र पाठविलें त्यावर नाव वगैरे कांहींच न लिहितां, फक्त डॉनचा फोटो चिकटवून, "इंग्लंडमध्यें कोठेंतरी खेळत असलेल्या यास"

एवढेंच त्यावर लिहिलें. तरीहि डॉनला हें पत्र मिळालें.

कांहीं पत्रें जिव्हाळ्यानें ओथंबलेलीं असत. एका इंग्लिश कामगारानें त्याला लिहिलें, "तुमचा आणि तुमच्या संघाचा ट्रेन्ट ब्रिज आणि लॉर्डस् मैदानावर खेळ पाहण्याचें भाग्य लाभलेल्या भाग्यवंतापैकीं मी एक आहे. सध्यांच्या या खडतर काळांत हा खेळ म्हणजे करमणुकीची मेजवानी आणि टॉनिकच होय.

"त्याचप्रमाणें दिवसभर काबाडकष्ट करून घरीं येऊन सामन्याचें वृत्त ऐकत बसतो तेव्हां चहांत आज साखर कमी आहे, किंवा देशांत मांसाचा तुटवडा आहे, यासारख्या प्रापंचिक विवंचनेचा आम्हांला विसर पडतो."

ब्रिटिश मंत्रिमंडळांतील एक मंत्री श्री. फिलिप नोअेल बेकर यांनीं लिहिलें : "ऑस्ट्रेलियांतून कोणत्याहि संघाला असें अखंड आणि आश्चर्यकारक यश मिळालें नव्हतें.

"पण तुमचें हें यश केवळ क्रीडांगणावरच दिसलें नाहीं. तुमच्या संघाइतकी लोकप्रियताहि यापूर्वी कोणी मिळविली नव्हती."

"कोणत्याहि संघानें सदिच्छा निर्माण करण्याकरितां इतकें कार्य केलें नव्हतें."

इंग्लंडचा सन १९४८ चा दौरा संपवून डॉन ब्रॅडमन परत आला. त्यावेळीं त्याच्या सत्काराकरितां त्याची पत्नी, त्याचा मुलगा जॉन आणि मुलगी बंदरावर आलीं होतीच, पण लोकांची तुफान गर्दी उसळली होती. यावेळपर्यंत अशीहि वदंता उठली होती कीं डॉन हा ऑस्ट्रेलियन पार्लमेंटच्या निवडणुकीकरितां उभा राहणार आहे. ही वदंता ऐकलेला एक कामगार डॉन दिसतांच मोठ्यानें ओरडलाः "डॉन, तूं जर पार्लमेंटला उभा राहणार असशील तर मजूर पक्षातर्फे उभा राहा."

पण त्याचे हे शब्द विरतात न विरतात तोंच डॉनच्या पत्नीनें तिला आलेली एक तार त्याच्या हातात ठेवलीः

"तूं आपल्या माननीय नवऱ्याला राजकारणांत पडूं देऊं नकोस. ज्या लोकांनीं विन्स्टन चर्चिलसारख्या जगद्प्रसिद्ध नेत्याला आपल्या हातचें बाहुलें केलें तेच लोक तुझ्या नवऱ्याला चिरडून टाकतील."

ता. १ जानेवारी रोजीं डॉनला त्याच्या क्रिकेटविषयक कामगिरीबद्दल ब्रिटनच्या राजानें ' सर ' ही पदवी दिली. त्यापूर्वी जॅक हॉब्ज या क्रिकेटपटूला हा मान मिळाला होता. डॉनला ही पदवी मिळाल्यावर त्याच्या अभिनंदनार्थ अनेक समारंभ झाले. पृथ्वीच्या कोनाकोंपऱ्यांतून त्याला अभिनंदनपर संदेश गेले. आसाममधल्या एका मुलानेंहि त्याला एक अभिनंदनपर पत्र लिहिलें:

" सर डोनाल्ड ब्रॅडमन यांना,

मी भारत देशांतील आसाममधील एक लहान मुलगा आहे. माझें वय ८ वर्षांचें आहे. तुम्हांला हें पत्र लिहावें कीं नाहीं हेंच मला कळेना. माझें चुकलें असेल तर मला क्षमा करा. तुम्हांला सर हा किताब मिळाला, हें वांचून आनंद झाला. त्याबद्दल मी तुमचें अभिनंदन करतो. "

पत्राच्या शेवटीं त्यानें डॉनला स्वाक्षरी पाठविण्याची विनंति केली व डॉननें अगत्यपूर्वक स्वाक्षरी पाठविली.

डॉनला क्रिकेटप्रेमी लोकांकडून क्रिकेटसंबंधी पत्रें येत असें नव्हे. तर इतर अनेक प्रकारचींहि पत्रें येत. एका साठ वर्षांच्या म्हातारीनें त्याला लिहिलें: " माझा नवरा एका चाळीस वर्षांच्या बाईशीं लग्न करायला निघाला आहे. तरी त्याला या लग्नापासून परावृत्त कर ! " आपलें क्रिकेटविषयक ज्ञान वैवाहिक गुंतागुंती सोडविण्यास कसें उपयोगी पडणार हेंच डॉनला कळेना.

डॉन परत आल्यावर द. ऑस्ट्रेलिया क्रिकेट असोशिएशननें त्यांच्या गौरवार्थ एक क्रिकेट सामना घडवून आणण्याचें ठरविलें. बाकीच्या राज्यांनीं या कल्पनेला पाठिंबा दिला. व ख्यातनाम खेळाडूंनीं या सामन्यांत खेळण्याचें कबूल केलें. हा सामना मेलबोर्नच्या भव्य क्रीडांगणावर करण्याचें ठरलें. या सामन्याला पूर्वीच्या कोणत्याहि खेळाडूकरितां जमले नव्हते एवढे-म्हणजे सुमारें पन्नास हजार प्रेक्षक हजर होतें.

डॉन खेळण्यास उतरल्यावर या पन्नास हजार प्रेक्षकांनीं एक आवाजानें जयघोष करून टाळ्यांचा कडकडाट केला.

डॉननें या सामन्यांत पूर्वीच्या तडफेनें खेळून एकहि झेल न देतां सफाईनें ९७ धांवा केल्या. त्याच्या या खेळांत त्याचे पूर्वीचे सर्व फटके होते. डॉनला

शतक झळकणार असें वाटूं लागलें पण बिल जॉनस्टननें टाकलेल्या एका चेंडूवर त्यानें मारलेला फटका सदोष लागला. चेंडू मिडऑनवर उंच उडाला. मॅकूल तेथें क्षेत्ररक्षण करीत होता तो धांवला. चेंडू त्याच्या हातांत आला आणि खालीं पडला. तेवढ्यांत डॉननें तीन धांवा घेऊन शतक झळकाविलें.

मॅकूलला हा झेल घेतां आला कीं नाहीं कां त्यानें तो मुद्दामच टाकला याबद्दल कोणी विचारलें नाहीं !

पूर्वी कोणत्याहि खेळाडूच्या गौरवपर सामन्याला झालें नव्हतें एवढें उत्पन्न या सामन्याला झालें. डॉनच्या हातांत ९३४२ पौंड, १८ शिलिंग आणि ८ पेन्सचा चेक ठेवण्यांत आला!

डॉन ब्रॅडमन ज्यावेळी उदयास आला त्याचवेळीं हिटलर उदयास आला होता. ब्रिटिश एनसायक्लोपिडियानें डॉनचें कर्तृत्व आणि हिटलरचें व्यक्तित्व या दोहोंचीहि दखल घेतली. पण ती घेतांना आपल्या ग्रंथांत डॉन ब्रॅडमनच्या चरित्राला हिटलरपेक्षां अधिक जागा दिली !

●●●

# १६ अजोड फलंदाजी

डॉन ब्रॅडमनच्या क्रिकेट जीवनाचा धांवता इतिहास गेल्या पंधरा प्रकरणांत देण्यांत आलेला आहे. डॉनला क्रिकेट क्षेत्रांतील ' कलॉसस ' कां म्हणतात, हें यावरून कळून येईल.

सन १९२६ मध्यें ऑस्ट्रेलियाचे बार्डस्ली, टेलर, कॉलीन्स व पुढें कांहीं काळानें मॅकार्टनी यांच्यासारखे महान् क्रिकेटपटू निवृत्त झाले होते. क्रिकेटमधील ऑस्ट्रेलियाचें स्थान कसें टिकवितां येईल, हा ऑस्ट्रेलियापुढें प्रश्न होता. अशा वेळीं डॉन ब्रॅडमनच्या पराक्रमाच्या बातम्या येऊं लागल्या, त्याच्याकडे क्रिकेट श्रेष्ठींचें लक्ष वेधलें. ए. जी. मॉईज यांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे, " डॉनचा क्रिकेटक्षेत्रांतील प्रवेश म्हणजे, ऑस्ट्रेलियन क्रिकेटच्या इतिहासांतील हा एक शुभ दिन होता. डॉन आला, त्याला लोकांनीं पाहिलें आणि कांहीं वर्षांतच त्यानें क्रिकेटचें जग जिंकलें."

तसें पाहिलें तर डॉनला क्रिकेट कोणीच शिकविलें नव्हतें. क्रिकेटचे त्यानें कोणाकडून धडे घेतले नव्हते. क्रिकेट खेळण्याकरितां त्याला कोणी लहानपणीं सवंगडीहि मिळाले नाहींत. तो क्रिकेट एकटाच खेळत असे. कोणालाहि असें वाटलें नाहीं कीं हा मुलगा पुढें कधींतरी, त्याच्यापूर्वी होऊन गेलेल्या महान् क्रिकेटपटूंपेक्षां कसोटी सामन्यांवर आपली अधिक छाप टेवील. डॉन ऑस्ट्रेलियांत शतकें, द्विशतकें आणि त्रिशतकें ठोकीत होता, तरीहि हे आपले टीकाकार नाक मुरडीतच होते. ते म्हणत, " डॉन ऑस्ट्रेलियांत शतकांमागून शतकें ठोकीत असला तरी इंग्लंडमध्यें तो यशस्वी

ठरणार नाहीं. " मॉरीस टेटसारख्यालाहि त्याचा खेळ इंग्लंडमध्यें अपेशी ठरणार असें वाटलें. त्यानें " डॉन, इंग्लंडला येण्यापूर्वी सरळ बॅटीनें खेळण्यास शीक असा त्याला सल्ला दिला. तूं सरळ बॅटीनें खेळण्यास शिकला नाहींस तर इंग्लंडमध्यें तुला जास्त धांवा करतां येणार नाहींत. " असाहि त्यानें इशारा दिला. डॉन हा महान् क्रिकेटपटू होईल, असें कोणीतरी पर्सी फेंडर या विख्यात क्रिकेट-पटूला सांगतांच तो म्हणाला, " डॉन हा उत्कृष्ट फलंदाज होईल. पण त्याचा खेळ नेहमींच बेभरंवश्याचा राहील. तो चुका दुरुस्त करीत नाहीं किंवा तसा प्रयत्नहि करीत नाहीं. "

पण डॉन ब्रॅडमन अद्वितीय क्रिकेटपटू होता. त्याच्यासारख्या अद्विती-याला सर्वसाधारण खेळाडूंचे नियम थोडेच लागू पडणार? ज्या टेटनें त्याला तुझा खेळ यशस्वी ठरणार नाहीं, असें सांगितलें त्याच टेटविरुद्ध खेळतांना, त्यानें इंग्लंडमध्यें दोन वेळां कसोटी सामन्यांत त्रिशतकांची मर्यादा ओलांडली. मेव्हल कार्डस एके ठिकाणीं म्हणतो, " धांवफलक हा गाढव आहे. त्यावरून धांवांची संख्या कळत असली तरी खेळाचें स्वरूप कळून येत नाहीं. आंकडेवार माहिती ही कंटाळवाणी होते. पण डॉन ब्रॅडमनचें धांवांच्या बाबतींतील विक्रम थक्क करणारे असल्यामुळें त्याकडे दुर्लक्षच करतां येत नाहीं, दुलिपसिंह यांनीं म्हटल्याप्रमाणें डॉनच्या बॅटींतून एखाद्या प्रचंड कारखान्यांतून जसा माल बाहेर पडतो तशा धांवा बाहेर पडत! त्याच्याइतक्या धांवा करणारा आणि त्याहि त्यांच्याइतक्या वेगानें करणारा दुसरा फलंदाज झाला नाहीं. तो कृपणाप्रमाणें धांवा जमवीत नसे, तर कुबेराप्रमाणें धांवांची खैरात करीत असे. एकदां इंग्लंडच्या सहाव्या जॉर्ज राजानें स्कोअरर फर्ग्युसन याला विचारलें, " ब्रॅडमनच्या जलद गतीनें होणाऱ्या धांवांची मोजदाद करण्याकरितां तूं बेरजेचें यंत्र उपयोगांत आणतोस कां?" त्यानें सर्व पहिल्या दर्जाच्या सामन्यांत २८०६७ धांवा केल्या. सरासरी ९५.१४. ३३८ डावांत ११७ शतकें ठोकलीं. पहिल्या दर्जाच्या सामन्यांत त्यानें ३७ द्विशतकें ठोकलीं. कसोटी सामन्यांत त्यानें २९ शतकें ठोकलीं आणि सर्व कसोटी सामन्यांत सरासरी ९९.९९ धांवा केल्या. एका डावांत तीनशेंवर धांवा सहा

वेळां करणारा तोच एकमेव खेळाडू असून खुद्द कसोटी सामन्यांतच त्यानें २ वेळां तीनशेंची मर्यादा ओलांडली आहे. पण हे उच्चांक करतांना तो मंद गतीनें केवळ उच्चांक करण्याकरितां खेळलेला नाहीं. शेफिल्ड सामन्यांत त्यानें ४५२ धांवा ४३५ मिनिटांत केल्या. आणि सन १९३० मध्यें कसोटी सामन्यांत त्यानें लारवूड, टेट, गिअरी, हॅमंड यांना तोंड देऊन ३३४ धांवांचा वैयक्तिक उच्चांक केला तोहि ३०० मिनिटांत ! डॉननें यावेळीं खेळ सुरू झाल्यापासून उपहारापर्यंत शतक, उपहारापासून चहाच्या वेळेपर्यंत शतक आणि चहाच्या वेळेपासून खेळ संपेपर्यंत शतक झळकाविलें होतें. कसोटी सामन्यात उपहारापूर्वी शतक ठोकणारे तीनच खेळाडू व तेहि ऑस्ट्रेलियन आहेत. ते म्हणजे व्हिक्टर ट्रंपर, मॅकार्टनी व डॉन ब्रॅडमन हे होत.

जगांतील ग्रेसपासून नील हार्वेपर्यंत अनेक नामवंत खेळाडूंचा खेळ पाहिलेला क्रिकेटतज्ज्ञ नेव्हिल कॉर्डस् म्हणतो,

" ब्रॅडमनच्या हालचाली मी पाहिलेल्या इतर कोणत्याहि खेळाडूपेक्षां जलद असत. तो उंच नव्हता, तसेंच त्याची प्रकृतिहि अगदीं दणकट होती, असें नव्हें. त्याला कधीं घाई झालेली नसे, किंवा त्यांच्यात बेजबाबदारपणा नसे. पण त्याला घाई दिसत नसली तरी तो तासाला किमान ४० ते ५० धांवा करीत आलेला आहे. त्याची दृष्टि तीक्ष्ण होती. त्याच्या पायाच्या हालचाली जलद होत.''

इतर महान् क्रिकेटपटूप्रमाणेंच डॉनहि अनेक वेळां कसोटी सामन्यांत सहजासहजी बाद झाला असेल. पण त्याच्या खेळाचें सर्वसाधारण समालोचन केलें तर असें दिसून येईल कीं त्यांत बेभरंवशापेक्षां भरंवशाचीच बाजू अधिक होती. " डॉन म्हणजे अपयशाविरुद्धचा-विशेषतः घसरगुंडीविरुद्धचा विमा होता. " याचें कारण तो धांवा करीत असे एवढेंच नसून त्याचा विरोधी बाजूच्या गोलंदाजावर वचक पडे. नेव्हिल कार्डसने एकदां डॉनला विचारलें, तुझ्या फलंदाजीच्या यशाचें रहस्य काय ? "

डॉननें उत्तर केलें, " मी प्रत्येक चेंडू हा जणूं काय पहिलाच चेंडू आहे, असें समजतो. मग शून्यांतून नुकताच बाहेर पडलेला असो कीं द्विशतक केलेलें असो. ' थोडा वेळ विचार करून त्यानें पुढील आश्चर्यकारक विधान केलें.

" दुसरी गोष्ट जगांतील कोणताहि गोलंदाज मला बाद करील, असें मी कधींच समजत नाहीं. "

एक लेखक म्हणतो, " डॉन हा गोलंदाजांना बेदरकारपणें झोडपून काढी. जगांतील अत्युत्कृष्ट गोलंदाज ऐन जोमांत असतां आणा, डॉन क्षणांत त्यांची रेवडी करी. त्याला शॉर्ट पिच चेंडू टाका, तो त्यावर स्क्वेअर लेगला सणसणीत चौकार ठोकील. गोलंदाजानें त्याला बाद करण्याकरितां हुकूमी चेंडू टाकावा तर डॉन अर्ध्या पिचवर पुढे येऊन तो सीमापार करतांना दिसेल. अशक्य अशा चेंडूवर तो हूक मारतांना दिसेल आणि अचूक आलेल्या चेंडूचे हाफ व्हॉली करून त्यांना कव्हर ड्राईव्हज ठोकतांना दिसेल."

सन १९३७ ची गोष्ट. एका कसोटी सामन्यांत डॉननें ॲलन याच्या संघाविरुद्ध कसोटी सामन्यांत शतक ठोकलें होतें. त्यानें सर्व गोलंदाजांना चौफेर पिटून काढलें होतें. एकानें त्या दिवशीं गोलंदाजी टाकून दमलेल्या होर्स या इंग्लिश गोलंदाजाला विचारलें, " ब्रॅडमनला बाद करूं शकेल, असा चेंडू कोणता ? " " छट्, त्याला बाद करील, असा चेंडूच नाहीं," होर्सने उद्गार काढलें.

या शतकाच्या आरंभी सिड बार्नेस हा सर्वश्रेष्ठ गोलंदाज होता. असें म्हणतात कीं त्याच्या तोडीचा गोलंदाज झालेला नाहीं. सिडला डॉनच्या खेळा-विषयीं विचारलें असता, तो म्हणाला, " मी उत्कृष्ट फॉर्मात असतानाहि त्याला बाद करू शकलों नसतों. कदाचित् मी अत्युत्कृष्ट फॉर्मात असतांना त्याला बाद करू शकलों असतो ! "

ऱ्होडस या नामांकित डावखुरा गोलंदाजाचें मतहि नमूद करण्यासारखें आहे. ऱ्होडस हा अबोल होता.

एकानें त्याला विचारलें, " ट्रंपर हा कसा होता ? "

" ऊं. बरा होता झालें ? " ऱ्होडसने उत्तर दिलें.

" हॉब्ज कसा होता ? "

" तोहि बरा होता ? "

" डॉन ब्रॅडमन कसा आहे ? "

" फारच छान फलंदाज आहे. " होडसनें रंगांत येऊन उत्तर दिलें.

विकेट छान असेल, त्यावेळीं क्रिकेटच्या मैदानावर पूर्वी कोणी कधींहि पाहिला नसेल, अशी तुफानी फलंदाजी तो गाजवी. निर्दोष विकेटीवर डॉन ब्रॅडमन हा प्रभुत्वानें खेळे याबद्दल दुमत नाहीं. " डॉन हा निर्दोष हिरवळीवर अनाभिषिक्त राजा होता, असें त्याचा एक टीकाकार रे रॉबीन्सन म्हणतो. हर्बर्ट सटक्लिफ म्हणतो, " डॉन हा निर्दोष विकेटवर सर्वश्रेष्ठ फलंदाज होता. " वॉल्टर हॅमंड हाच सर्वश्रेष्ठ फलंदाज होता, असें म्हणणारा लन हटन्हि कबूल करतो कीं, "निर्दोष विकेटीवर तो गोलंदाजांची धूळधाण उडवी." त्याला कितीहि तुफान गोलंदाजीची धास्ती नसे. आणि मंदगती गोलंदाजाला तर तो क्रीजबाहेर–क्वचित निम्म्या पिचवर जाऊनहि झोडपून काढी. त्याच्यासारखा बॅकफूट खेळाडू झाला नाहीं. ग्रेसपासून डॉनपर्यंत सर्व नामवंत फलंदाजाविरुद्ध खेळलेला –होडस म्हणतो, "डॉन ब्रॅडमन हा क्रिकेटच्या खेळांतील सर्वांत श्रेष्ठ बॅकफूट खेळाडू होता. "

पण डॉन हा निर्दोष विकेटवर अनाभिषिक्त राजा असला तरी, त्याला दमट विकेटवर खेळतां येत नसे, असा एक प्रवाद आहे. स्वतः डॉननेंहि " सर्वसामान्यतः पांच टक्के सामने दमट विकेटवर खेळण्याची पाळी येत असल्यामुळें आपण तसा सराव केला नाहीं. " असें म्हटलें होतें. त्यामुळें तर हा समज अधिकच बळावला. डॉनच्या खेळाचें एकंदरींत सिंहावलोकन केलें तर असें आढळून येतें कीं, दमट विकेटवरहि त्यानें अनेक प्रसंगी उत्तम फलंदाजी केली आहे सन १९३२ मध्यें सिडने येथें, सन १९३८ मध्यें नॉटिंगहॅम व लॉर्डस येथील सामन्यांत, सन १९४७–४८ मध्यें भारताविरुद्धच्या कसोटी सामन्यांत, आपण दमट विकेटवरहि उत्तम रीतीनें खेळूं शकतो, असें त्यानें दाखवून दिलें. सन १९३२ मधील न्यू साऊथ वेल्स आणि एम. सी. सी. यांच्यामधील सामना ज्या आदले दिवशी खूप पाऊस पडला होता. हॅमंड आणि व्हेरिटी यांच्या फिरकी गोलंदाजीला खूपच धार आली होती. त्यांनीं सर्व न्यू साऊथ वेल्स अवघ्या १२८ धांवांत बाद केला, पण त्यांत डॉनच्या ७१ धांवा होत्या. सन १९३८ मध्यें इंग्लंडमधील एका सामन्यांत पिच अगदीं खराब झालें होतें. पण त्या खराब पिचवर डॉन संबंध दिवसभर खेळत होता. याच वर्षीच्या दुसऱ्या एका सामन्यांत ज्या

विकेटवर गोलंदाजांना चेंडू अतिशय वळवितां येत, अशा विकेटीवर त्यानें १०३ धांवा काढल्या. यावेळीं इतर फक्त तीनच खेळाडू दोन्ही डावांत प्रत्येकी वीसपेक्षां अधिक धांवा करू शकले. पण एवढें कशाला, डॉन ब्रॅडमननें इंग्लंडच्या आपल्या प्रत्येक दौऱ्यांत सर्व इंग्लिश आणि ऑस्ट्रेलियन खेळाडूंपेक्षां अधिक पराक्रम केला, याचाच अर्थ तो कोणत्याहि विकेटवर प्रभुत्वानें खेळूं शके; असा उघडच आहे. इंग्लंडच्या या चारहि दौऱ्यांत त्यानें प्रत्येक वेळीं २०००पेक्षां अधिक धांवा केल्या. सन १९३० मध्यें त्याच्या इंग्लंडमधील धांवांची सरासरी ९८.६६, १९३४ मध्यें ८४.१६, १९३८ मध्यें ११५.६६ व सन १९४८ मध्यें वयाच्या ४० व्या वर्षी ८९.९२ होती. ही सरासरी उद्बोधक आहे.

सन १९३० मध्यें डॉन ब्रॅडमननें जो असामान्य पराक्रम केला, त्यावरून इंग्लिश क्रिकेटपटूंनीं ओळखलें कीं आपल्याला ॲशीस परत मिळवावयाच्या असतील तर डॉन ब्रॅडमनच्या धांवा करण्याच्या सामर्थ्याला अवसानांत आणलें पाहिजे. जार्डीनच्या नेतृत्वाखालीं सन १९३२ मध्यें ऑस्ट्रेलियाला गेलेल्या संघांतील गोलंदाजांनीं याचकरितां बॉडीलाईन गोलंदाजीचा प्रयोग केला. डॉन ब्रॅडमन नसता तर बॉडीलाईन गोलंदाजी आली नसती हें उघड आहे. याच करितां बॉडीलाईन गोलंदाजीचा ब्रॅडमनलाईन गोलंदाजी असा उल्लेख केला जाई...पण डॉननें या प्रकारच्या गोलंदाजीला तोंड देण्याचें स्वतःचें एक तंत्र शोधून काढलें. डॉनला या तंत्रामुळें पूर्वीइतक्या विपुल धांवा करतां आल्या नाहींत, पण तो बॉडीलाईन गोलंदाजीला तोंड देण्यांत बराचसा यशस्वी झाला हें खरं आहे. दुसऱ्या बाजूला ऑस्ट्रेलियन फलंदाज या गोलंदाजीमुळें जखमी होत असतांना डॉननें मात्र या गोलंदाजीला तोंड दिलें. सन १९३२ मध्यें कसोटी सामन्यांत ब्रॅडमनची धांवांची सरासरी ५६ होती. पुष्कळांनीं लिहिलें डॉन अपेशी झाला. डॉन अपयशी झाला होता तो डॉन ब्रॅडमनच्या मापानें. पण अपेशांतहि तो फलंदाजीच्या बाबतींत दोन्ही संघांतील हर्बर्ट मटक्लिफ, हॅमंड, मॅकेब वगैरे प्रख्यात फलंदाजांपेक्षां सरासरींत अग्रेसर होता.

कांहीं क्रिकेटपटूंनीं आणि क्रिकेटतज्ज्ञांनीं डॉन ब्रॅडमनपेक्षां हॉब्ज व हॅमंड

यांना तर कांहींनी व्हिक्टर ट्रंपर हा ब्रॅडमनपेक्षां अधिक श्रेष्ठ होता, असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. पण धांवांचा वेग आणि धांवांचें प्रमाण या दोन्ही दृष्टींनीं हा प्रयत्न चुकीचा असल्याचें दिसून येतें.

हॅमंड हा ऑस्ट्रेलियाविरुद्ध ३३ कसोटी सामन्यांत ५८ डाव खेळला. त्यांत तीन वेळां तो नाबाद होता. त्यानें ऑस्ट्रेलियाविरुद्ध २८५२ धांवा केल्या. सरासरी ५१.८. सर्व ८५ कसोटी सामन्यांत १४० डावांत त्यानें ७२४९ धांवा केल्या. सरासरी ५८.४५.

हॉब्ज हा ऑस्ट्रेलिया विरुद्ध ४१ कसोटी सामन्यांत ७१ डाव खेळला. नाबाद ४ वेळां. धांवा ३६३६. सरासरी ५४.२६. सर्व ६१ कसोटी सामन्यांतील १०२ डावांत ५४१० धांवा, सरासरी ५६.९४.

व्हिक्टर ट्रंपर हा इंग्लंडविरुद्ध ४० कसोटी सामन्यांत ७४ डाव खेळला. पांच वेळां नाबाद. धांवा २२६३. सरासरी ३२.७९ सर्व ४८ कसोटी सामन्यांतील ८९ डावांत ३१६३ धांवा. सरासरी ३९.०४.

याउलट डॉन ब्रॅडमन इंग्लंडविरुद्ध ३७ कसोटी सामन्यांत ६२ डाव खेळला. नाबाद ७ वेळां. धांवा ५०२८. सरासरी ८९.७८. सर्व ५१ कसोटी सामन्यांतील ८० डावांत धांवा ६९९६. सरासरी ९९.९४.

सन १९३८ मध्यें कसोटी सामन्यांत पदार्पण केल्यापासून डॉन ब्रॅडमन हळुहळू प्रगति करीत गेला. आणि त्यानें सर्वश्रेष्ठ फलंदाजाचें स्थान कसें प्राप्त केलें याची माहिती आंकडेवारीनें करून घेणें उद्‌बोधक आहे.

१९२८--सन १९२८-२९ मध्यें इंग्लंड-ऑस्ट्रेलिया यांच्यामधील कसोटी सामन्यांत वॉल्टर हॅमंडची कसोटी सामन्यांतील धांवांची सरासरी ११३.१२ होती. हॅमंड सरासरींत दोन्हीहि संघांत अग्रेसर होता. पण इंग्लंडचा दुसऱ्या नंबरचा फलंदाज याची कसोटी सामन्यांतील सरासरी मात्र ५२.४४ किंवा हॅमंडच्या निम्याहून कमी होती.

ऑस्ट्रेलियन फलंदाजींत आर्ची जॅकसन हा अग्रेसर होता. त्याची सरासरी ६९ होती. पण तो फक्त दोन सामन्यांत खेळला, पण डॉनची सरासरी मात्र कसोटी सामन्यांत ६६.८५ होती. नव्यानें येऊनहि त्यानें रायडर, वुडफूल वगैरे नामांकित क्रिकेटपटूंवर ताण केली होती.

१९३०—सन १९३० च्या कसोटी सामन्यांत डॉन ब्रॅडमनची पांचहि कसोटी सामन्यांतील सरासरी धांवसंख्या १३९.१४ होती.

या बाबतींत तो दोन्ही संघांत अग्रेसर होता. ऑस्ट्रेलियन फलंदाजांत दुसऱ्या नंबरची सरासरी वुडफूल याची ५७.५० इतकी होती, इंग्लंडच्या फलंदाजांत हर्बर्ट सटक्लिफ यांची सरासरी सर्वांत जास्त म्हणजे ८७.२० होती.

या वर्षी इंग्लंडमधील सर्व पहिल्या दर्जाच्या सामन्यांतहि डॉन ब्रॅडमन हाच सरासरींत अग्रेसर होता. २९६० धांवा व सरासरी ९८.६६ असें हें अचाट प्रमाण होतें.

१९३०—सन १९३० मध्यें वेस्ट इंडिज संघ ऑस्ट्रेलियांत गेला. यावेळीं दोन्ही संघांच्या कसोटी सामन्यांतील फलंदाजींत पॉन्सफोर्ड हा अग्रेसर व डॉन ब्रॅडमन हा दुसरा असून त्यांच्या सरासरी धांवा अनुक्रमें ७७.८३ व ७४.५० होत्या.

सन १९३१—सन १९३१ मध्यें दक्षिण आफ्रिकेचा संघ ऑस्ट्रेलियांत गेला. यावेळीं डॉन ब्रॅडमनच्या धांवांची सरासरी तर अचाटच म्हणजे २०१.५० इतकी होती! पॉन्सफोर्ड हा सरासरींत दुसरा होता ७०.१६.

१९३२—सन १९३२ मध्यें इंग्लिश संघ ऑस्ट्रेलियांत गेला. बॉडीलाइन गोलंदाजीचे हें वादळी साल होते. या कसोटी सामन्यांत पेंटर या इंग्लिश फलंदाजाची सरासरी ६१.३३ होती. पण पेंटर हा कांहीं ब्रॅडमन, हॅमंड वगैरेंच्या तोडीचा फलंदाज समजला जात नाहीं, पेंटर सोडला तर बॉडीलाइन गोलंदाजीला तोंड देऊनहि डॉननें आपली सरासरी ५६.५७ धांवांवर नेली. हर्बर्ट सटक्लिफ आणि हॅमंड या दोघांचीहि सरासरी ५५ होती. विशेष म्हणजे त्यांना कांहीं बॉडीलाइन गोलंदाजीला तोंड द्यावें लागले नाहीं.

१९३४— सन १९३४ मध्यें ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडला गेला. यावेळीं कसोटी सामन्यांतील सरासरींत पॉन्सफोर्ड हाच दोन्ही संघांत अग्रेसर असला तरी त्याच्या आणि ब्रॅडमनच्या सरासरींत कांहीं अंशाचेंच अंतर आहे. पॉन्सफोर्डची सरासरी ९४.८३ होती तर डॉन ब्रॅडमनची सरासरी ९४.७५ होती. इंग्लंडच्या फलंदाजांत लीलँड हा अग्रेसर असुन त्याची सरासरी ६८.२८ होती.

पण याहि वर्षी इंग्लंडमधल्या सर्व पहिल्या दर्जात डॉननें पुनः अग्रेसरत्व कायम राखलें. त्यानें सर्व पहिल्या दर्जाच्या सामन्यांत सरासरी ८४.१६ धांवा केल्या.

१९३६— सन १९३६ मध्यें इंग्लिश संघ ऑस्ट्रेलियांत गेला. यावेळीं डॉन ब्रॅडमननें कसोटी सामन्यांत सरासरी ९० धांवा करून दोन्ही संघांत अग्रेसरत्व राखलें. इंग्लंडचा वॉल्टर हॅमंड हा अग्रेसर असून त्याची सरासरी ५८.५० होती.

१९३८— सन १९३८ मध्यें ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडमध्यें गेला. यावेळीं हटनची सरासरी ११८.२५ होती, तर डान ब्रॅडमनची सरासरी १०८.५० होती. पण यावरून हटन हा ब्रॅडमनपेक्षां अधिक श्रेष्ठ फलंदाज होता, असें म्हणण्याचें कोणीच धाडस करणार नाहीं.

१९४०— याहि वर्षी डॉन हा इंग्लंडमध्यें झालेल्या सर्व पहिल्या दर्जाच्या सामन्यांत अग्रेसर फलंदाज होता. त्याची सरासरी ११५.६६ होती.

१९४६— सन १९४६ मध्यें इंग्लिश संघ ऑस्ट्रेलियांत गेला आणि वयाच्या ३८ वर्षीहि डॉन ब्रॅडमननें फलंदाजींत दोन्ही संघांत अग्रेसरत्व टिकविलें. त्याची कसोटी सामन्यातील धांवांची सरासरी ९७.१४ होती, तर इंग्लंडचा पहिल्या नंबरचा फलंदाज लेन हटन याची सरासरी ५२.१२ होती.

१९४७— सन १९४७ मध्ये भारतीय संघ ऑस्ट्रेलियांत गेला. यावेळीं डॉन ब्रॅडमन याची कसोटी सामन्यांतील धांवांची सरासरी १७८.७५ होती. फडकर हा भारतीय फलंदाजींत अग्रेसर असून त्याची सरासरी ५२.३३ होती.

१९४८— सन १९४८ मध्यें ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडमध्यें गेला. यावेळीं कसोटी सामन्यांतील धांवांची मॉरीस ८७, बार्नेस ८२.२५ व ब्रॅडमन ७२.५७ अशी सरासरी होती. यांवेळीं ब्रॅडमनचें वय चाळीस होतें, हें विसरतां कामा नये.

पण यावेळींसुद्धां ब्रॅडमन हाच इंग्लंडमधील सर्व पहिल्या दर्जाच्या सामन्यांतील सरासरींत अग्रेसर राहिला. त्याची ही सरासरी ८९.९२ होती.

डॉन यांच्या सर्वश्रेष्ठत्वाचा हा साधार पुरावा आहे. सिड बार्नेस म्हणतो, “सर्व फलंदाजांपेक्षां इतकेंच काय पण रणजीपेक्षांहि डॉन ब्रॅडमन हा निर्दोष

हिरवळीवर अधिक निष्णात फलंदाज होता." डॉननें कसोटी सामन्यांत हॅमंड-पेक्षां सात शतकें अधिक ठोकलीं असून ऑस्ट्रेलियाच्या इंग्लंडविरुद्धच्या सतरा-पैकीं तेरा विजयांत त्यानें शतकें ठोकून हातभार लावला आहे.

# १७ तरुणांना आदर्श

डॉन हा धांवांचें यंत्र होता, त्यानें रणजी, व्हिक्टर ट्रंपर वगैरेंच्या क्रिकेट युगांतील सुवर्ण युगानंतर क्रिकेटमध्यें कार्यक्षमतेचें युग ( एफिसिएन्सी एज ) आणलें, हें बहुतेकजण मान्य करतात. पण त्याबरोबरच ते असे म्हणतात कीं क्रिकेट क्षेत्रांतील कलावंतांच्या मालिकेंत डॉन ब्रॅडमन बसूं शकणार नाहीं.

व्हिक्टर ट्रंपरविषयीं लिहितांना सी. बी. फ्राय यांनें पुढील गौरवपर उद्‌गार काढले होते. "ट्रंपरला शैली नव्हती. तरीहि तो म्हणजे शैली होता. त्याची खेळण्याची विशिष्ट ढब नव्हती. त्यानें खेळण्याचे सर्व नियम धाब्यावर बसविले होते. पण त्याचा प्रत्येक फटका हा किमान प्रयत्न आणि कमाल परिणाम या कसोटीला उतरणारा होता." हीच कसोटी लावली तर डॉन हा क्रिकेटमधील एक कलावंत होता, हें मान्य करावें लागेल. नेव्हल कार्डस म्हणतो, "शैलीदार या शब्दाच्या अलंकारिक अर्थानें तो शैलीदार नव्हता. पण त्याच्या भात्यांत सर्व किंवा जवळ सर्व फटके असून तो ते शास्त्रशुद्ध रीतीनें मारी. सफाईदारपेक्षां त्यांच्यांत तडफदारपणा अधिक दिसे. त्याचा खेळ निर्दोष असे. तो म्हणजे धांवांचें सुरळीत चाललेला यंत्रच होता. डॉन तासन्‌तास खेळून आल्यावरहि त्याच्या डोक्यावरचा केसन्‌केस जेथल्या तेथें असल्याचें आणि चेहऱ्यावर मुळींच शीण नसल्याचें मी अनेक वेळां पाहिलें आहे."

सन १९३४ च्या इंग्लंडच्या दौऱ्यांत डॉननें मिडलसेक्स परगण्या-बरोबरच्या सामन्यांत ७५ मिनिटांत १०० धावा केल्या व त्यांत त्यानें चाराचे १९ फटके मारले! त्याची ही फलंदाजी पाहून विल्यम पोलॅक या नामवंत क्रिकेट टीकाकारानें पुढील अभिप्राय व्यक्त केला, "गेल्या चाळीस वर्षांत मी ग्रेस, रणजी, ट्रंपर, फ्रँक वुली, मॅकार्टनी, जेसप, हॅमंड आणि हॉब्ज यांच्यासारख्या महान खेळाडूंचा खेळ पाहिला आहे. पण ब्रॅडमनच्या या वेळच्या खेळाइतका बहारीचा खेळ पूर्वी कधींच पाहिला नाहीं. हा खेळ म्हणजे फलंदाजीचा कळसच किंवा फलंदाजीचें महाकाव्य. डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच डॉन चेंडू फटकावतांना दिसत असे. चेंडू कव्हरमधून, स्लिपमधून, गोलंदाजाच्या दोन्ही बाजूंनीं, लेगला ऑफला सैरावैरा धांवत होते. त्याच्या बॅटींत जणुं काय जादूच भरली होती. सर्व फटक्यांचा तो मालक होता आणि साऱ्या क्रीडांगणावर जणुं काय त्याची हुकमत होती. त्यानें स्मिथचें वेगानें येणारे चेंडू, रॉबीन्सचें मंदगतीनें येणारे चेंडू, इआन पिबल्सचे फसवे चेंडू या सर्वांची अक्षरशः दाणादाण उडवून दिली."

डॉनच्या कसोटी सामन्यांतील फलंदाजीचें नेव्हल कार्डसनें एके ठिकाणीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे;

"असाधारण ताकद आणि भव्यतेचा खेळ अद्वितीय खेळाडूच्या अपूर्व आणि वेगवान खेळाचें प्रात्यक्षिक. डॉननें मारलेले चेंडू तुफानी वेगानें हिरवळी-वरून धांवत असतांना अंगावर रोमांच उभे राहतात. तडफदार आणि प्रत्येक फटक्यांत चैतन्य. तारुण्याच्या कळसावर असलेल्या जीवनांतील सौंदर्य त्यांत दिसत होतें. तंत्रदृष्ट्या सफाईदार." दुसऱ्या एका ठिकाणीं कार्डस म्हणतो, "व्हिक्टर ट्रंपर हा भराऱ्या मारणारा पक्षी होता, तर ब्रॅडमन म्हणजे विमान होता."

सी. बी. फ्राय म्हणतो,

"डॉनला सेकंदाच्या शेवटच्या निमिषार्धापर्यंत बॅट उचलण्याची गरज पडत नाहीं. त्याचीं मनगटें सुंदर आहेत, त्याच्या पायांची हालचाल सुरेख आणि योग्य वेळीं होते. एखाद्या निष्णात नर्तकाप्रमाणें त्याचीं पावलें पडतात. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास आहे."

रॉबर्टसन म्हणतो, " ब्रॅडमननंतर त्याच्यासारखा क्रिकेटपटू पाहावयास मिळणार नाहीं. त्याला पाहिलें हेंच भाग्य."

डॉन ब्रॅडमनचा एक सहकारी क्रिकेटपटू जॅक फिंग्लटन म्हणतो,

" ब्रॅडमनसारखा दुसरा क्रिकेटपटू मला पुनः पाहावयास मिळेल, असें वाटत नाहीं."

डॉनचा प्रत्येक फटका प्रेक्षणीय असे, आणि विशेष म्हणजे चेंडू सीमापार करूनच तो प्रामुख्यानें धांवा मिळवत असे. डॉननें किती वेळां चेंडू सीमापार केला, याची कोणी आंकडेवारी तयार केली तर ती उद्बोधक होईल. डॉनचा भर चाराच्या फटक्यांवर असे. त्याला सहाचे फटके मारणें फारसें पसंत नसे. तो म्हणतो, ' संभाव्य सहाचे फटके मारण्यापेक्षां खात्रीचे सफाईदार चारांचे फटके मारणें, हें अधिक चांगलें.' पण स्वतः डॉन मात्र आपला सर्वोत्कृष्ट फटका म्हणून एखादा चाराचा फटका सांगत नाहीं. त्याच्या मतें त्याचा सर्वोत्कृष्ट फटका हा एका धांवेचा होता. डॉन म्हणतो, " सन १९३० मध्यें लीडस येथील कसोटी सामन्यांत डिक टिल्डस्ले हा मंदगती लेकब्रेक गोलंदाज गोलंदाजी करीत होता. मी त्याच्या एका चेंडूवर फटका मारण्यासाठीं पुढें सरसावलों, पण लगेच मागें पाय घेतला. तेवढ्यांत माझा तोल जाऊन गुडघ्यावर पडलों. यावेळीं यष्टिरक्षक डकवर्थ मला " स्टंप्ड " करूं शकला असता. पण कांहींतरी प्रेरणेनेंच पडत असतांनाहि मी चेंडूला बॅट लावली व स्लिपमध्यें क्षेत्ररक्षक करीत असलेल्या हॅमंडच्या आटोक्याबाहेर चेंडू टकलला. मला एक धांव मिळाली." ज्या लिडसच्या सामन्यांत त्यानें हा फटका मारला, त्याच सामन्यांत त्यानें पुढें उच्चांक केला !

डॉन ब्रॅडमन हा असाधारण कर्तृत्वाचा आणि कलावंत फलंदाज होता. पण त्याच्या फलंदाजीच्या अचाट पार्श्वभूमिमुळेंच, तो एक असामान्य क्षेत्ररक्षक होता, ही गोष्ट ठळकपणें लक्षांत येत नाहीं. स्वतः फलंदाजी करतांना त्याला जितका आनंद होई, तितकाच क्षेत्ररक्षण करतांनाहि होई. चापल्य आणि अचूक चेंडूफेंक या बाबतींत त्याची बरोबरी करणारे फारच थोडे क्षेत्ररक्षक झाले व आहेत. आपल्या पहिल्याच कसोटी सामन्यांत त्यानें हॉब्जला रनआऊट करण्याचा असाधारण विक्रम केला होता.

सन १९२८ पासून डॉन ब्रॅडमन हा ऑस्ट्रेलियन संघाचा कर्णधार झाला. व सन १९४८ मध्यें तो क्रिकेटमधून निवृत्त होईपर्यंत त्याच्याकडेच ही जबाबदारी होती. कर्णधार या नात्यानेंहि क्रिकेटच्या इतिहासांत झालेल्या महान् कर्णधारांत त्याचा समावेश करावयास हरकत नाहीं. आर. सी. रॉबर्टसन म्हणतो,

"कर्णधार या नात्यानें ब्रॅडमनचें स्थान कोणतें?... क्रिकेट मैदानावर तो अप्रतिम कर्णधार होता. तो प्रत्येक गोष्टीचा मापून विचार करी. तो डावपेंच कुशल आणि दमदार असून क्रिकेट मैदानावर दया किंवा स्वप्नें यांत गुरफटत नसे. तो अत्यंत जागरूक असे." मॉईज म्हणतो, "डॉन ब्रॅडमन म्हणजे माझ्या पाहण्यांतील सर्वोत्कृष्ट कर्णधार झाला."

डॉनच्या यशाचें रहस्य काय? पहिली गोष्ट म्हणजे त्याच्या ठिकाणची नैसर्गिक पात्रता डॉन हा जणु काय जन्मजात क्रिकेटपटू होता. इंग्रजी काव्यांत पर्सी बिशे शेली या कवीचें जें स्थान होतें, तेंच स्थान क्रिकेटमध्यें डॉन ब्रॅडमनचें होतें. पण डॉन केवळ नैसर्गिक कौशल्यावर अवलंबून नव्हता. आपल्या नैसर्गिक कलेला त्यानें बुद्धिमत्तेची जोड दिली होती. क्रिकेटच्या बाबतींत त्याच्या ठिकाणीं असीम ध्येयवाद होता. आणि या असाधारण गुणांना त्यानें एकाग्रतेची जोड दिली होती. आणि क्रिकेटमध्येंच नव्हे तर कोणत्याहि क्षेत्रांत यशस्वी होण्यास हेच गुण यशस्वी पडतात. नेव्हल कार्डस म्हणतो. "डॉन ब्रॅडमन ही अशी व्यक्ति आहे कीं ती कोणत्याहि क्षेत्रांत यशस्वी झाली असती. ब्रॅडमन हा राजकारणांत पडला असता तर तो ऑस्ट्रेलियाचा पंतप्रधान झाला असता."

क्रिकेटसाठीं डॉननें स्वतःवर कांहीं बंधनें घालून घेतलीं होतीं. तो मद्यपान मुळींच करीत नसे. तसेंच त्याच्या मनाचा संयम किंवा तोल सुटत नसे. सन १९३४ मधीलच घटना घ्या. फक्त ३९ धांवांवर तीन विकेटी पडल्या होत्या. संध्याकाळ झाली होती. अशा वेळीं डॉन खेळावयास गेला व त्यानें निर्विकारपणें चेंडू अडविले आणि दुसऱ्या दिवशीं मैदानांत उतरल्यापासून त्यानें अगदीं पहिल्या चेंडूपासून चौफेर टोलवावयास सुरुवात केली, त्या दिवशीं एका दिवसांत त्यानें २७६ धांवा केल्या! खेळण्याकरितां पॉव्हिलियनपासून मैदानापर्यंत डॉन हळुहळू चालत जाई. त्याची मंदगतीची एवढीच काय ती हालचाल असे. पण त्यानें खेळावयास सुरुवात केली कीं तो वीजप्रमाणें तळपे. त्याचें पदलालित्य अद्भुत

आणि एखाद्या अभिजात नर्तकीला हेवा वाटेल, असें होते.

डॉननें आपला प्रत्येक फटका पूर्णत्वाला नेला होता. प्रत्येक फटक्यावर धांव मिळाली पाहिजे असा त्याचा कटाक्ष असे. पण त्याकरितां तो चूक करीत नसे. डॉनची बॅट धरण्याची शैली ऑनसाईड व स्क्वेअरकट फटक्यांना सोईस्कर असे. पण त्याचे सरळ फटकेहि वीज कडाडल्याप्रमाणें रोमाच-कारी असत. त्याचें हूक्स बहारीनें खेचलेलें असत. त्याचें ऑफ ड्राईव्हज सुरेख असत. तर त्याचें स्क्वेअर कट्स आणि लेगकट त्याच्या अप्रतिम कौशल्याचें द्योतक असत. या बाबतींत त्याच्यावर ताण करणारा क्रिकेटपटू झाला नाहीं. आणि पुल हा तर त्याचा आवडता फटका होता. डॉननें या फटक्यावर लहानपणापासून खास मेहनत घेतली होती. तो लेग ग्लान्सहि सफाईदार मारी. डॉनला इतर खेळाडूंचे सर्व फटके ज्ञात होतेच, पण याशिवाय त्याचे स्वतःचे असे खास फटके असत त्याचें सर्व फटके भुईसपाट आणि जणूं काय हिरवळ कातरत गेल्यासारखे दिसत. मैदानावर तो अत्यंत प्रतिष्ठितपणें वागे.

डॉनचा खेळ म्हणजे एक मोठें आकर्षण असे. त्याच्याइतका लोकप्रिय खेळाडू झाला नाहीं. तो स्वतः फलंदाजी निर्विकारपणें करीत असें, पण प्रेक्षकांचें अंतःकरण मात्र हेलकावे खात असे. किथ मिलरच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे तो " नॅशनल हिरो " होता. म्हणून तो निवृत्त झाल्यावर कॅनबरा टाईम्सनें त्याच्या-विषयीं पुढील गौरवपर लेख लिहिलाः

" या सर्व काळांत डॉन ब्रॅडमननें लाखो लोकांकडून टाळ्या घेतल्या. पण या टाळ्या हिंसक कृत्य किंवा दुष्ट प्रवृत्ति यांशीं संबंधित नव्हत्या. जर हिशोब केला तर हिटलरकरितां जितक्या टाळ्या मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली, त्यापेक्षां डॉन ब्रॅडमनला स्वयंस्फूर्तीनें अधिक टाळ्या मिळाल्या हिटलर हा राक्षस स्वतःच्या हातांनीं नाश पावला. आणि त्याच्या कृत्यांमुळें लाखो लोक मेले, मरत आहेत आणि लाखोंचे हाल झाले व होत आहेत.

" पण डॉन ब्रॅडमनच्या जीवनांत कोणीहि स्त्रिया, पुरुष आणि मुलें यांचे हाल झाले नाहींत, उलट त्यांना स्फूर्ति किंवा सुख मिळालें. जागतिक इतिहासां-तील महत्त्वाची हीच कसोटी आहे. "

ब्रॅडमनच्या चरित्रापासून तरुणांनीं काय बोध घ्यावा ? मॉइज लिहितो :

" कोणत्याहि क्षेत्रांतील महापुरुषाच्या जीवनापासून एक धडा शिकण्या-जोगा असतो व डॉन ब्रॅडमनच्या बाबतींतहि तेच खरें आहे. निसर्गतःच

तो कलावंत होता पण तेवढ्यावरच तो थांबला नाहीं. कारण निसर्गतः लाभलेल्या या कलासंपन्नतेच्या पायावर इमारत उभारण्याचा त्यानें कळकळीनें प्रयत्न केला...आपल्या कलेविषयीं खडतर श्रद्धा बाळगल्याशिवाय कोणीहि मनुष्य तिचें उत्तुंग शिखर गाठूं शकत नाहीं, आणि क्रिकेटच्या दीर्घ यात्रेंत डॉन ब्रॅडमनइतका पूर्णत्वाला जाण्याचा कोणीच प्रयत्न केला नाहीं."

"जर तरुणांना यशाचें शिखर गांठावयाचें असेल तर ख्यातनाम लोकांच्या जीवनयात्रेंतील मूलतत्त्वें त्यांनीं कधींच विसरतां कामा नये. त्यांनीं विचार केला पाहिजे, त्यांनीं सराव केला पाहिजे. कारण यश हें सहज मिळत नाहीं. आणि मिळालें तरी तात्काळ नाहिंसें होतें."

●●●

# १८ डॉन ब्रॅडमनचे ठळक उच्चांक

सन १९३० मध्यें डॉन ब्रॅडमननें क्विन्सलँडविरुद्ध ४५२ धांवा केल्या.

पहिल्या दर्जाच्या क्रिकेटमध्यें त्यानें सहा वेळां तीनशेंवर धांवा केल्या. त्याच्यानंतर हॅमंड आणि पॉन्सफोर्ड यांनीं प्रत्येकीं चार वेळां तीनशेंवर धांवा केल्या.

पहिल्या दर्जाच्या क्रिकेटमध्यें ११७ वर शतकें.

कसोटी सामन्यांत दोन वेळां तीनशेंवर धांवा. सन १९३२ मध्यें द. आफ्रिकेविरुद्ध त्याचें तिसरें त्रिशतक फक्त एका धांवानें हुकलें.

एका दिवसांत कसोटी सामन्यांत तीनशेंवर धांवा करणारा एकमेव खेळाडू.

इंग्लंडमध्यें एका हंगामांत २९६० धांवांचा उच्चांक व ऑस्ट्रेलियांत १६९० धांवांचा उच्चांक.

लागोपाठ सहा शतकें ठोकण्याचा विक्रम सी. बी. फ्रायनंतर डॉन ब्रॅडमननेंच केला आहे.

उपहारापूर्वी शतक करण्याचा मान व्हिक्टर ट्रंपर व मॅकार्टने यांच्यानंतर डॉन ब्रॅडमननें मिळविला.

११०९५

पहिल्या दर्जाच्या सामन्यांत ३७ द्विशतकें. दुसरा नंबर हॅमंडचा लागतो. त्यानें ३६ द्विशतकें केली.

कसोटी सामन्यांत दोन्ही डावांत शतकें करणाऱ्या शेलक्या क्रिकेटपटूंत डॉन ब्रॅडमन येतो.

सन १९३८ च्या हंगामांत इंग्लंडमध्यें तेरा शतकें करण्याचा विक्रम.

१६ वेळां एका हंगामांत हजारावर धांवा करण्याचा विक्रम. इंग्लंडमध्यें मे महिन्यांतच हजार धांवा करण्याचा पराक्रम त्यानें दोन वेळां केला आहे.

इंग्लंडच्या दौऱ्यात तीन वेळां द्विशतकानें सुरुवात. इंग्लंडच्या चार सफरींत बारा हजारावर धांवा. कसोटी सामन्यांत २९ शतकें.

सन १९३४ मध्यें डॉन ब्रॅडमन यानें पॉन्सफोर्ड याच्या भागीदारींत दुसऱ्या विकेटवर ४५१ धांवा केल्या. हा दुसऱ्या विकेटवरचा नव्हे तर कोणत्याहि विकेटवरील जागतिक उच्चांक आहे.

सन १९४६ मध्यें डॉन ब्रॅडमन आणि लिंडसे हॅसेट यांनीं ब्रिस्बेन येथें तिसऱ्या विकेटीवर २७६ धांवा केल्या.

सन १९३४ मध्यें डॉन ब्रॅडमन आणि पॉन्सफोर्ड यांनीं चौथ्या विकेटीवर ३८८ धांवा केल्या.

सन १९४६–४७ मध्यें डॉन ब्रॅडमन व सिड बार्नस यांनीं पांचव्या विकेटीवर ४०५ धांवा केल्या.

सन १९३६–३७ मध्यें डॉन ब्रॅडमन आणि जॅक फिंग्लटन यांनीं सहाव्या विकेटीवर ३४६ धांवा केल्या.

डॉनच्या धांवांची आंकडेवार माहिती पुढीलप्रमाणे आहे :

| | डाव | नाबाद | जास्तींत जास्त धांवा | एकूण | सरासरी |
|---|---|---|---|---|---|
| सर्व सामने | ६६० | १०७ | ४५२ नाबाद | ५०७३१ | ९०.२७ |
| पहिल्या दर्जाचे सामने | ३३८ | ४३ | ४५२ नाबाद | २८०६७ | ९५.१ |
| सर्व कसोटी सामने | ८० | १० | ३३४ | ६९९६ | ९९.९ |
| शेफिल्ड शील्ड सामने | ९६ | १५ | ४५२ नाबाद | ८९२६ | ११०.१९ |

**शतकांवरील धांवा**

| | |
|---|---|
| सर्व सामन्यांत | २११ शतकें |
| पहिल्या दर्जाच्या सामन्यांत | ११७ शतकें |
| सर्व कसोटी सामन्यांत | २९ शतकें |

**समाप्त.**

REFBK-0011015